: ५ :

# स्नेहाचे झरे

( आचार्य दादा धर्माधिकारी यांच्या हृदयंगम पत्रांचा संग्रह )

संपादक

**श्रीपाद जोशी**

किंमत २ रुपये

प्रकाशक
पां. रा. ढमढेरे, एम्. ए.
३२२।३ सदाशिव पेठ,
पुणें २.

३० मार्च १९५१

मुद्रक
न. वि. सरदेशपांडे
आदर्श मुद्रणालय,
३९५।५ सदाशिव, पुणें २

# निवेदन

प्रिय श्रीपाद,

मी माझ्या स्वायत्त अपत्यांना, आप्तांना, सोबत्यांना आणि स्नेही जनांना लिहिलेल्या कांहीं पत्रांचा संग्रह तुम्ही प्रसिद्ध करीत आहां. या पत्रांचा कुणाला कितपत उपयोग होईल तें मला सांगतां येत नाहीं. तीं पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याच्या बाबतींतहि माझी वृत्ति फारशी अनुकूल नाहीं. बोलून-चालून पत्रें तीं पत्रें. तीं कुणाला चटकदार किंवा उद्बोधक वाटलीं तरी त्यांचें महत्त्व अगदींच क्षणिक असतें. निदान माझ्या पत्रांच्या बाबतींत तरी मला तसें वाटतें. म्हणून तीं पुस्तकरूपानें प्रसिद्ध व्हावींत, असें मला कधींच वाटलें नाहीं. पण मी पत्रें लिहून मोकळा होतों. नंतर आपली मालकी सांगत बसत नाहीं. म्हणून तुम्हांला मनाई करीत नाहीं इतकेंच.

पत्रांत सहजगत्या आणि न कळत पुष्कळसें आत्मनिवेदन घडतें. येथें निवेदन शब्द दुहेरी अर्थानें वापरीत आहें. नैवेद्य शब्दांत निवेदनाचा जो अर्थ आहे तोहि येथें अभिप्रेत आहे. आविष्करण आणि समर्पण दोन्ही भाव त्यांत अंतर्भूत आहेत. ' There is something peculiarly ' you ' in the letter or note you write. It says, ' I think enough of you to take the trouble to sit down and try to put into words the feeling I have to word you. ' It matters not whether you have the gift of expression. If you say what is in your heart the words wo'nt matter. '

सुप्रसिद्ध तत्त्ववेत्ता ' रॅल्फ वेल्डो एमरसन ' यांच्या या शब्दांत पत्राच्या स्वरूपाचें मोठें मार्मिक वर्णन केलेलें आहे.

(**भाषांतर**— तुम्हीं जें पत्र किंवा चिठी लिहितां त्यांत तुमचा एक कांहीं तरी खास 'तुम्हीपणा' असतो. तें पत्र किंवा चिठ्ठी म्हणते, ' तुझ्याविषयीं मला जें वाटतें तें बसून शब्दांनीं व्यक्त करण्याचा त्रास घेण्याइतका तुझा विचार माझ्या मनांत घोळत असतो ' विचार व्यक्त करण्याची शक्ति तुम-

च्यांत आहे किंवा नाहीं या गोष्टीला मुळींच महत्त्व नाहीं. तुमच्या अंतःकरणांत जें आहे तें जर तुम्हीं बोलत असाल तर भाषेचें कांहीं महत्त्व उरणार नाहीं.)

पत्रांत मी आणि तूं किंवा अस्मत् युष्मत्–प्रत्यय यांच्यांत अभेद प्रस्थापित होतो. पत्रलेखकाचें नातें कांहींहि असो त्याचें हृदय ज्या व्यक्तीला तो पत्र लिहितो तिच्या हृदयाशीं बोलूं लागतें. या दोन व्यक्तींच्या परस्पर निवेदनाचें इतरांच्या दृष्टीनें किती महत्त्व आहे हें पत्रलेखकाला ठरवितां येणें शक्य नाहीं. ज्याला व्यक्तींच्या समुदायावरच प्रेम करतां येतें किंवा निष्ठा ठेवतां येते त्याला कदाचित् विशिष्ट व्यक्तिविषयक जिव्हाळ्याचीं पत्रें लिहितां येणार नाहींत. समाजहित व्यक्तिहितापेक्षां श्रेष्ठ मानणाराची देखील सगुणोपासनेची वृत्ति जर नसली तर तो मानव्यावर प्रेम करूं शकेल पण माणसांवर करूं शकणार नाहीं. त्याची भक्ति निर्गुणाविषयीं किंवा अव्यक्ताविषयीं राहील. मी व्यक्तिविषयींच्या स्नेहामधून मानव्याविषयींच्या निष्ठेकडे हळूहळू प्रगति करीत गेलों आहें. म्हणून मला माणसें आवडतात; त्यांच्या गुणदोषांसहित तीं आवडतात. आणि त्यांच्या सुखदुःखाशीं व समस्यांशीं समरस व्हावेंसें वाटतें. त्यामुळें निबंध, किंवा लेख लिहिण्यापेक्षां पत्रें लिहिणें मला अधिक मानवलें.

मी पत्रें केव्हां लिहूं लागलों तें निश्चित सांगतां येणें कठीण आहे. पण औपचारिक स्वरूपाचीं अथवा कृत्रिम स्वरूपाचीं पत्रें मात्र कधीं लिहिल्याचें आठवत नाहीं. त्यामुळेंच कांहीं महिन्यांपूर्वीं जेव्हां श्री. भाऊसाहेब ऊर्फ वि. स. खांडेकर यांनीं एका पुस्तकाकरतां एक पत्र लिहून देण्याची सूचना मला केली, तेव्हां त्यांच्याविषयीं निःसीम स्नेहभाव असूनहि मला त्यांच्या शब्दाला मान देतां आला नाहीं. कुठलीहि व्यक्ति समोर नसतांना पत्र कसें लिहायचें? व कां लिहायचें? तेंच मला कळेना त्यामुळें मला कांहीं सुचलेंच नाहीं आणि लहानपणीं वाचलेली एलिझाबेथ टर्नरची खालील कविता आठवली.

Maria intended a letter to write,
But could not begin (as she thought) to indite;
She went to her mother with pencil and slate,
Containing 'dear sister' and also a date.

" With nothing to say, my dear girl do not think,
Of wasting your time over paper and ink;
But certainly this is an excellent way,
To try with your slate to find something to say.
" I will give you a rule, " said her mother, " My dear,
Just think for a moment your sister is here,
And what would you tell her ? consider and then,
Though silent your tongue, you can speak with your pen. "

मी पत्र लिहायला सुरुवात अशाच रीतीनें केली. माझे एक आजोबा, म्हणजे माझ्या वडिलांचे चुलते कै. मुकुंदराव ऊर्फ आबाजी धर्माधिकारी यांची पत्रलेखक म्हणून ख्याति होती. साध्या कार्डांत देखील ते आपला अंतरींचा भाव थोडक्यांत पण समर्पक रीतीनें व्यक्त करीत असत. त्यांची माझ्यावर विशेष ममता होती. म्हणून वयाच्या आठव्या वर्षीच मी त्यांना पत्रें लिहूं लागलों. अर्थातच हीं पत्रें आई सांगत असे. पण त्यांत भाषा तिची असली तरी भाव माझा असे. मी तिला सांगावें आणि तिनें तें भाषाबद्ध करून परत मला सांगावें. असें त्या पत्रांचें स्वरूप असे. पुढें वयाच्या दहाव्या वर्षी जेव्हां आमचे एक मावसभाऊ श्री. मुकुंद पांडुरंग ऊर्फ आबासाहेब देशपांडे हे आमच्याबरोबर रहायला आले, तेव्हां त्यांच्या प्रेरणेनें मी इंग्रजींत पत्रें लिहायला सुरुवात केली. कारण त्यावेळीं इंग्रजीचें प्रस्थ होतें. पण हीं पत्रें जरी मी खरोखरच्या व्यक्तींना लिहीत होतों तरी तीं टपालांत टाकण्याची संधि मला क्वचितच मिळत असे. माझ्या वडलांचीहि पत्र लिहिण्याच्या बाबतींत मोठी तारीफ होती. ते नियमित व जिवंत पत्रें लिहीत असत. मी त्यांना पहिलें पत्र वयाच्या चवदाव्या वर्षी इंग्रजींत लिहिलें. ते आपल्या नोकरीच्या ठिकाणीं होते आणि मी मूळतापीला होतों त्या पत्राचें जें उत्तर वडिलांकडून आलें तें वाचून मी नाचूं लागलों. वडिलांनीं लिहिलें होतें. ' your letter was clear, correct, and written in good handwriting. It said all that you should say and nothing that you should not say. We were pleased to read it. '

आमच्या आजोबांना इंग्रजी येत नव्हतें. पण माझ्या वडलांच्या या पत्राचीं त्यांनीं अनेक सामुदायिक पारायणें माझ्याकडून करवून घेतलीं. यानंतर कितीतरी महत्त्वाचीं, जिव्हाळ्याचीं आणि रोचक पत्रें मी प्रसंगोपात्त लिहिलीं. किती लिहिलीं असतील त्याला सुमारच नाहीं.

वयाच्या चवदाव्या किंवा पंधराव्या वर्षाच्या सुमारास मला पत्रें लिहिण्याचा नादच लागला. अर्थात् हीं पत्रें इंग्रजींत असत. तीं लिहितांना मी अगदीं तल्लीन होऊन जात असे, आपलें संपूर्ण हृदय त्यांत ओतीत असे. आणि आपलें सारें भाषाप्रभुत्व प्रकट करीत असे. माझे बहुतेक सारे चुलते पदवीधर होते. कुणी वकील, कुणी डॉक्टर, कुणी विद्यार्थी. त्यांना व इतर नातलगांना पत्रें पाठविण्याचा छंदच मला लागला. बरोबरीच्या आप्तेष्टांना व मित्रांना मी हौसेनें पत्रें लिहूं लागलों. माझ्या नातलगांपैकीं जे विद्वान् व रसिक होते त्यांना माझीं पत्रें विशेष आवडत. माझे चुलते मोर्शीचे तीर्थस्वरूप नानासाहेब धर्माधिकारी यांचें इंग्रजी उत्कृष्ट व कलापूर्ण आहे. त्यांचीं पत्रें भाषेच्या दृष्टीनें सुद्धां मोठीं वाचनीय असत.त्यावर त्यांच्या व्यक्तित्वाचा ठसा उमटत असे. माझ्या वडलांचें इंग्रजीहि मोठें शुद्ध व बिनचूक असे. या दोघांनींहि माझ्या पत्रांचें भरपूर कौतुक केलें. त्यामुळें माझ्या हुरुपांत भर पडली. डॉ. गोविंदरावकाका धर्माधिकारी यांनीं नेहमीं म्हणावें, 'साधें कार्डदेखील हा एखाद्या लघुनिबंधासारखें लिहितो.' मग काय विचारतां ? माझा दिमाख अस्मानांत मावेना.

मी १९१८ पर्यंत बहुतेक सगळीं पत्रें इंग्रजींत व क्वचित् हिंदींत लिहिलीं. माझ्या आठवणीप्रमाणें मी पहिलें मराठी पत्र १९१८ सालीं नागपूरला येऊन एक वर्ष झाल्यानंतर लिहिलें. आणि तेंहि भीतभीत कचरत कचरत.

माझ्या आयुष्यांतील दरेक स्थित्यंतराच्या वेळीं आणि अन्य महत्त्वाच्या प्रसंगीं मीं माझ्या भावना व विचार व्यक्त करण्याकरतां महत्त्वाचीं पत्रें लिहिलीं आहेत. लग्नाच्या वेळीं वडलांना लिहिलेलीं इंग्रजी पत्रें, असहकारितेच्या चळवळीच्या अगोदर व नंतर भावी आयुष्याविषयीं मित्रांना लिहिलेलीं पत्रें, टिळक विद्यालयांतून रजा काढून परमपूज्य भाऊसाहेबांजवळ प्रस्थानत्रयीचा अभ्यास करायला जाण्याचा विचार ठरला त्यावेळीं विद्यालयाच्या आचार्यांना लिहिलेलें पत्र.१९३०-१९३२ सालीं चळवळीच्या पूर्वी तीर्थरूप व

पूज्य विनोबा आणि परमपूज्य भाऊसाहेब यांना लिहिलेलीं पत्रें या दृष्टीनें उल्लेखनीय आहेत. भावनोत्कटतेच्या भरांत तीर्थरूप वडलांना, माझ्या बंधूंना आणि मित्रमंडळींना लिहिलेलीं पत्रेंहि स्नेहरसानें ओथंबलेलीं आहेत. तुरुंगांतून बल्लाभाऊंना व मालकिणीला कितो तरी लांबलचक पत्रें लिहिलीं आहेत. १९३५पासून १९४०पर्यंत कोठेंहि प्रवासाला गेलों म्हणजे मालकिणीला अगदीं नियमितपणें दररोज एक पत्र पाठवीत असे. या अवधींत मी जवळ जवळ सबंध हिंदुस्थानांत फिरलों. त्यामुळें या पत्रांत निरनिराळ्या प्रांतांतील सृष्टि-सौंदर्याचें, लोकचरित्राचें व कांहीं प्रमुख व्यक्तींचें बरेंच रोचक वर्णन आढळेल. अशीं कितीतरी पत्रें मी लिहिलीं असतील. त्यांची स्थूल कल्पना देखील देतां येणें शक्य नाहीं.

आमच्या घरांत धर्माधिकारी आडनांवाचीं किमानपक्षीं शंभरावर माणसें तरी असावीत. त्यांच्यापैकीं ८० वर्षांच्या म्हाताऱ्या म्हातारीपासून तों अगदीं अल्पवयस्क मुलामुलींचा विश्वास संपादन करण्याचें भाग्य मला माझ्या अल्प-वयांतच लाभलें. घरांतील तरुण मुलगे जितक्या विश्रब्धतेनें व आपुलकीनें आपलें हृद्गत मला सांगतात तितक्याच आत्मीयतेनें व विश्वासानें घरांतील स्त्रिया व मुलीहि सांगतात. त्यामुळें माझ्या स्वभावाला एक विशिष्ट वळण लागलें. त्याचा परिणाम असा झाला कीं सामाजिक जीवनांतहि अनेक मुलां-मुलींचा, तरुणांप्रमाणेंच तरुणींचा आणि पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांचाहि स्नेहयुक्त विश्वास मी संपादन करूं शकलों. अशा रीतीनें माझा स्वायत्त परिवार विस्तार पावूं लागला. आणि व्यापक जीवनाचा पवित्र आनंद माझ्या वांट्यास आला.

या व्यापक जीवनाच्या अनुषंगानें जें पत्रलेखन घडलें त्या पत्रांपैकीं कांहीं महत्त्वाच्या पत्रांचा संग्रह करण्याचें तुम्हीं योजिलें आहे. माझी हरकत नाहीं; पण विशेष उत्साहहि वाटत नाहीं. कारण उघडच आहे. हीं पत्रें विशिष्ट व्यक्तींना विशिष्ट प्रसंगीं आणि विशिष्ट भूमिकेवरून लिहिलेलीं आहेत. कांहीं पत्रें उत्तरादाखल लिहिलेलीं आहेत. त्यामुळें संदर्भावाचून त्यांचा वास्तविक अर्थ लक्षांत येणें कठीण आहे. पण म्हणून त्या त्या व्यक्तींचीं नांवें प्रसिद्ध करणें किंवा त्यांचीं पत्रें किंवा त्यांतील उतारे प्रसिद्ध करणें मला प्रशस्त वाटत नाहीं. पत्रें प्रसिद्ध होतील या कल्पनेनें लिहिलीं

नव्हतीं. पण प्रसिद्ध झालीं आणि होत आहेत. माझ्या जीवनांत आणि माझ्या वाणींत वावगें काहीं नाहींच असें मानण्याइतका घमेंडखोर किंवा निर्बुद्ध मी नाहीं. पण भीतीमुळें किंवा प्रतिष्ठेच्या खोटया कल्पनेमुळें कांहींहि लपवून ठेवण्याचा प्रयत्न मी शक्यतों केलेला नाहीं. म्हणून जें काय बरें वाईट असेल तें या पत्रांत उतरलें आहे. त्याबद्दल जे काय समज-गैरसमज होतील त्यांचा परिणाम भोगण्यासहि मी नम्रपणें सादर आहें.

हीं पत्रें भिन्न भिन्न व्यवसायांतील व भिन्न भिन्न परिस्थितींतील लोकांना भिन्न भिन्न प्रसंगीं आणि भिन्न भिन्न प्रश्नांच्या अनुरोधानें लिहिलेलीं आहेत. त्यामुळें त्या सर्व व्यक्तींचीं नांवें प्रसिद्ध करणें शिष्टाचाराला धरून होणार नाहीं. अर्थातच तुम्हांला मी त्यामुळें नांवें प्रसिद्ध करण्याची मनाई केली. कांहीं गोष्टी गुप्त नसल्या तरी खाजगी स्वरूपाच्या असतात. आणि कांहीं अत्यंत जिव्हाळयाच्या असल्यामुळें अतिशय पवित्रहि असतात. या सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर नामनिर्देश टाळणेंच युक्त वाटलें. या पत्रांत ताई हें संबोधन देखील कमींत कमी दोन भिन्न व्यक्तींना अनुलक्षून आलेलें आहे. तरी त्याचा उलगडा करण्याची गरज मला वाटली नाहीं.

पुष्कळदां असें होतें कीं ज्या गोष्टी समक्ष बोलण्याचें आपल्याला जमत नाहीं त्या आपण पत्ररूपानें सांगतों. समोर माणसाच्या डोळयांची भीड तुटत नाहीं. कित्येकदां नमके शब्द सुचत नाहींत. म्हणून आपण पत्र लिहितों. एकाच घरांत, फार काय एकाच खोलींत, एकमेकांच्या नित्य सहवासांत राहणारीं माणसेंदेखील एकमेकांना अशीं पत्रें लिहितात. मग त्यांचें नातें पिता-पुत्रांचें असो, भाऊ-बहिणीचें असो किंवा मित्रामित्राचें असो. एका ठराविक वयापर्यंत अशीं कांहीं पत्रें मीहि लिहिलेलीं आहेत. पण पुढें पुढें माझी भीड फिटली. आणि पत्र लिहिण्यापेक्षां समक्ष बोलण्याकडेच माझा कल वाढूं लागला. विशिष्ट प्रयोजनाकरतां किंवा विशिष्ट प्रसंगीं नित्यसहवासांत अथवा सान्निध्यांत राहणाऱ्या माणसांनासुद्धां अजूनहि मी पत्रें लिहितों. पण तीं भिडेमुळें लिहीत नाहीं. विचार व भावना अधिक निश्चित आणि टिकाऊ पद्धतीनें व्यक्त करण्याच्या हेतूनें लिहितों.

माझ्या पत्रांविषयीं आणखी काय लिहूं ? तीं इतकीं आणि इतक्या विविध प्रकारचीं आहेत कीं मला स्वतःला देखील त्यांच्याविषयीं समाधानकारक

विवेचन करतां येथें शक्य नाहीं. पत्रांविषयीं सामान्यत: माझ्या काय कल्पना आहेत एवढेंच तुम्हीं जाणूं इच्छित होतां म्हणून मुद्दाम हें पत्र लिहिलें आहे.

पत्रांत अभावितपणें आत्मनिवेदन घडतें असें मी सुरुवातीला म्हटलें आहे. आणि एमर्सनचा उतारा दिला आहे. तेव्हां त्याच दार्शनिकाच्या अर्थपूर्ण शब्दांनीं या पत्राचा उपसंहारहि करणें युक्तच होईल.

Rings and Jewels are not gifts but apologies for guilt. The only gift is a portion of thyself.

माझ्या अंत:करणाचे हे उन्मेष मी अत्यंत नम्रभावानें तुम्हां माझ्या अपत्यरूप आप्तांच्या व सुहृदांच्या चरणीं अर्पण करीत आहें. ते जबजवाहिरापेक्षां कमी मोलाचे आहेत का अधिक मोलाचे आहेत हें तुम्हींच ठरवायचें आहे. माझ्याजवळ जें आहे तें मी अर्पण केलें आहे.

कळावें, हे आशीर्वाद.

धंतोली, नागपूर
ता. १५-३-५१

स्नेहांकित,
दादा

# दोन शब्द

सर्वोदय समाजाच्या कामाच्या निमित्तानें आचार्य दादा धर्माधिकारी यांच्या सान्निध्यांत दिल्लीच्या कॉन्स्टिटयूशन हाऊसमध्यें कांहीं दिवस राहण्याची संधि मला मिळाली असतां या संग्रहांतील कांहीं पत्रें माझ्या वाचनांत आलीं. मला तीं इतकीं आवडलीं कीं मी त्यांची नक्कल करून स्वत:जवळ ठेवली. यांतील एकहि पत्र प्रसिद्ध होईल अशी कल्पना दादांना पत्र लिहितेवेळीं मुळींच नव्हती. यामुळें हीं पत्रें प्रसिद्धीस देण्यापूर्वीं मला पुष्कळच विचार करावा लागला. दादांच्या कांहीं मित्रांचा व सुहृदांचाहि मी या बाबतींत सल्ला घेतला आणि सर्वांच्या विचारानें पत्रें प्रकाशित करण्याचें ठरविलें. परंतु यांतील सगळींच पत्रें कांहीं मी एकटयानें मिळविलेलीं नाहींत. त्या कामीं मला अनेक बंधु-भगिनींचें साहाय्य झालेलें आहे. परंतु त्यांचे माझे संबंध इतके निकटचे व जिव्हाळयाचे आहेत कीं त्यांचे आभार मानणें त्यांना आवडणार नाहीं.

वस्तुत: हीं पत्रें येथील कॉंटिनेंटल प्रकाशन या संस्थेतर्फे प्रकाशित व्हावयाचीं. 'मौज'-'सत्यकथे'तून हीं पत्रें प्रसिद्ध होत असतां तसें जाहीरहि करण्यांत आलें होतें, परंतु प्रकाशकांच्या अडचणींमुळें ही गोष्ट घडून येऊं शकली नाहीं. श्री. पां. रा. ढमढेरे यांना मी हीं पत्रें दाखविलीं तेव्हां त्यांनीं तीं प्रकाशित करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें तीं आतां पुस्तकरूपानें प्रकाशित होत आहेत.

ता. ३० मार्च हा कै. बच्चूचा-पूज्य दादांच्या सर्वांत धाकटया मुलाचा निर्याण-दिन. बच्चूच्यामुळेंच दादांची पत्रें प्रकाशित होऊं शकलीं व त्यानंतरच इतरांना पत्र-प्रकाशनाची कल्पना सुचली म्हणून मी संपादिलेला हा संग्रहहि मी बच्चूच्या प्रेमळ स्मृतीस अर्पण करीत आहें.

६०५ नारायण, पुणें २.
३० मार्च १९५१

श्रीपाद जोशी

कै. बच्चूच्या

प्रेमळ स्मृतीस

## भगवंताचें वात्सल्य सर्वत्र पसरलें

प्रिय...

आज स्वातंत्र्याचा वाढदिवस; दुसरा वाढदिवस. तुम्हांला विनाकारणच पत्र लिहावेंसें वाटलें.

स्वातंत्र्याच्या युद्धांत अनेकांच्या संसारांचा विध्वंस झाला. माझेंहि घरकुल मोडलें मालकीण तुरुंगांतून आली ती पागलखान्यांतच जाऊन बसली. माझें घर एका अर्थानें 'कान्तार' झालें. मी अनायासें 'वानप्रस्थ' झालों. पण या स्वातंत्र्याच्या चळवळीमुळेंच माझा परिवार केवढा वाढला! हें विश्वचि माझें घर झालें नसेल, पण जाईन तेथें माझें घर आहे. बबनचें घर होईल तेव्हां होईल. पण तुम्ही व सौ... आणि तुमच्यासारखीं इतर तरुण जोडपीं माझ्या शिणलेल्या डोक्याला विसाव्याकरितां आपापली मांडी नेहमीं सज्ज ठेवतात. 'वाघाला जाळी असते, पक्षाला घरटें असतें, सापाला देखील बिळ असतें, पण मनुष्याला डोकें ठेवायला कोठेंच जागा नाहीं!' असें येशू बोलला. पण भगवंताचें वात्सल्य सर्वत्र पसरलें, आसमंतांत व्यापलें आणि आप्तांच्या व स्नेहयांच्या मांडीवर निर्धास्तपणें डोकें ठेवण्याची सोय झाली. या वैभवाला तुलना नाहीं, या सुखाला उपमा नाहीं. तेव्हां संसार उध्वस्त झाला म्हणून शोक करावा कीं 'अवघाचि संसार' संसार झाला म्हणून धन्यता मानावी? केव्हां केव्हां दुःख-सुखें देखील दोन्ही डोळयांतील गंगायमुनांप्रमाणें एकरस होऊन जातात!

निवडणुकीच्या राजकारणांत मी तीन वर्षांपूर्वी पाऊल टाकलें. माझ्या चाहत्यांनीं दुंदुभी वाजवून माझें स्वागत केलें. आज आढावा घेतला तर मला यशापेक्षां अपयशच जास्त मिळालें. पण त्या अपयशांत उज्ज्वलता आहे, गोडवा आहे. तीन वर्षांत वैयक्तिक दृष्टीनें माझा विकासच झाला. अगदीं निकृष्ट प्रतीच्या आणि खालच्या दर्जाच्या माणसाबद्दलहि मला सहानुभूति वाटूं

लागली. त्याच्या हीन वृत्तीचा किंवा अधम शक्तीचा उपयोग करून घेण्याचा मोह मी आवरला. म्हणून मी पुष्कळांना दुखविलें असेल, अनेकांचा विरस केला असेल; पण अव्हेर कोणाचाच केला नाहीं, उपमर्दहि कोणाचा केला नाहीं. कांहीं व्यक्ति माझ्यावर रागावल्या, संतापल्या; पण त्यांच्या मनांत माझ्याबद्दल द्वेष किंवा वैर निर्माण झालें नाहीं. याचें कारण मी राजकारणांतहि माझी मर्यादा राखण्याचा इमानेंइतबारें प्रयत्न केला. त्यांत कितपत यश आलें हा प्रश्न निराळा. पण सत् प्रयत्नाचेंहि फळ मिळाल्यावांचून राहात नाहीं.

हें सगळें कशामुळें शक्य झालें ? कांहीं व्यक्तींच्या निरपेक्ष व अढळ स्नेहामुळें आणि विश्वासामुळें. ज्यांच्या महत्त्वाकांक्षा मी बिनदिक्कत कुस्करून टाकल्या त्यांनींच सख्ख्या भावापेक्षांहि जास्त शर्थीनें माझी पाठ राखली ! राजकीय कार्यभाग साधून घेण्याकरितां माणसें मिळविणें व संभाळणें मला जमलेंहि नाहीं आणि रुचलेंहि नाहीं. पण ज्यांनीं आपल्या निष्ठेचें व स्नेहाचें बळ मला दिलें त्यांच्या आकांक्षा चुरगाळूनहि त्यांच्या भरंवशावरच मी टिकलों व तगलों. त्या माणसांमध्यें तुमचीहि गणना मी करतों. म्हणून हें पत्र तुम्हांला लिहावेंसें वाटलें ! दुसरें कांहींच कारण अगर प्रयोजन नाहीं.

नवी दिल्ली स्नेहांकित,
१५–८–४९ दादा

## हें जग दुष्ट आहे काय ?

प्रिय ताई,

तुझें हृदयस्पर्शी पत्र पोंचलें. बहिणीचें हृदय तूं ह्या पत्रांतील प्रत्येक शब्दांत ओतलें आहेस. तरुणपणीं व लहानपणीं मला जवळजवळ बरोबरीच्या व धाकट्या बहिणींचा अगदीं निकटचा सहवास लाभल्यामुळेंच मनाला निर्विकारी प्रेमाचें वळण लागलें. जन्म देणाऱ्या मातेपेक्षां तुम्हीं दिलेल्या या

शीलधनामुळें तुमची योग्यता कुठल्याहि प्रकारें कमी म्हणतां येईल का ? माझ्या जीवनांत जें थोडेंफार पावित्र्य तुम्हांला दिसतें तो तुमचा–माझ्या बहिणींचाच–प्रसाद नव्हे का ? तुम्ही सर्व जणी माझ्यापेक्षां धाकट्या आहांत; पण तुमचे उपकार थोर आहेत. भाऊबीज जवळ आलेली आहे. मी अत्यंत कृतज्ञतापूर्वक तुमच्या चरणीं आपली स्नेहभावना अर्पण करतों.

ताई, हें जग दुष्ट नाहीं ग ! जग दुष्ट असतें तर त्याच्यांत राहायला आपण इतके धडपडलों असतों का ? हें जग सोडावेंसें कोणाला तरी वाटतें का ? मेल्यानंतरहि येथें 'कीर्तिरूपें' व 'स्मृतिरूपानें' उरावें असें भल्या-भल्यांना वाटतें. जगांत मतलबीपणा, स्वार्थसाधुत्व, औपचारिकता हें सारें आहे. पण निर्व्याज स्नेह, निरपेक्ष उपकारशीलता आणि अकृत्रिम सौजन्य अधिक प्रमाणांत आहे. एरव्हीं आपल्याला हें जीवित इतकें प्रिय झालें असतें का ? आपल्या ठिकाणीं काय कमी उणीवा आहेत, कमी दोष आहेत ? असें असूनहि आपण जगलों, वाढलों व पुष्ट झालों ना ? आपला संभाळ कोणी केला ? 'जीवन तयासी कोण घाली ? ' तो विश्वंभर या विश्वांत भूतमात्रां-च्या रूपानें आपलें भरणपोषण करतो. धरित्रीमाता ज्याप्रमाणें आपल्या अंकावर आपल्याला खेळविते त्याचप्रमाणें समाजदेवताहि आपलें संगोपन व संवर्धन करून आपली जीवनक्षमता वाढविते. आप्तेष्टांच्या व स्नेह्यांच्या निरपेक्ष स्नेहावांचून आपण जगलों असतों का ?

ताई, स्नेह कुणाचाहि त्याज्य किंवा अमंगळ नसतो. तो जर वासनेनें दूषित झाला किंवा मतलबीपणानें कलुषित झाला तर नासतो. मग त्याला 'गरजे'-चें हीन व व्यावहारिक स्वरूप प्राप्त होतें. जगांत असा मतलबीपणा व मायावी-पणा भरपूर आहे. पण तो आपल्याला आयुर्दान देत नसतो. आयुष्याला कान्ति व माधुर्य हीं या विकारांमुळें येत नाहींत, स्वार्थवृत्ति, विकार व वासना यांच्यामुळें कांहीं जगांत जीवन–निर्वाह होत नाहीं ही गोष्ट मनांत बिंबली म्हणजे जगांत जें सुख लाभलें त्याबद्दल समाधान वाटतें. आणि जें दुःख भोगावें लागलें त्याचा विसर पडतो. गतायुष्यांतील दुःखेंदेखील माणूस मिटक्या मारून सांगतो. कारण त्या दुःखांत आपण दगावलों नाहीं, त्यांतून सहीसलामत पार पडलों. हा जीवनाचा विजय आहे.

...यांना देखील माझ्याजवळ येऊन रहावेंसें वाटतें हें भाग्य मला तुमच्या

स्नेहामुळेंच लाभलें ना? घरच्याप्रमाणेंच बाहेरच्या नातलगांना व स्नेह्यांच्या बहिणी, बायका, मुलें यांना माझ्याबरोबर रहावेंसें वाटतें, हें मी तुमच्या भगिनीभावनेचें ल समजतों. तुला जेव्हां वेळ असेल तेव्हां तूं बिनदिक्कत माझ्यापाशीं येऊन रहा. मला नवीन शक्ति लाभेल, तुलाहि बरें वाटेल. फार चिन्ता करूंच नये, चिन्तेमुळें चित्त कमकुवत होतें, त्याचा कस नाहींसा होतो. तूं आपल्या प्रकृतीकडे मुख्य लक्ष दे. जोंपर्यंत जगावयाचें भाग्य लाभतें तोंपर्यंत मनःपूर्वक जगावें.

श्री. गोपाळराव काळे हे आतां आपल्या प्रान्ताचे अन्न-मंत्री झाले आहेत. पण त्यापूर्वी फक्त एक महिना अगोदर त्यांच्या पत्नी शांताबाई निवर्तल्या. दुःखावांचून सुखाला खमंगपणा येत नाहीं असा दैवी संकेत दिसतो. त्रासत, संतापत, कुरकुरत जगण्यांत काय हंशील आहे?

तूं स्वस्थ चित्तानें व अव्याहतपणानें आपले उपचार चालूं दे. तुझी प्रकृति चांगली झाली म्हणजे तुझी कार्यशक्ति दुप्पट वाढेल.

कळावें. अनेक उत्तम आशीर्वाद.

नवी दिल्ली — तुझा,

१६-१०-४९ — दादा

## नैसर्गिक नातीं व स्वायत्त नातीं

प्रिय.....

पुष्कळ दिवसांनीं तुमचें पत्र आलें. पत्र लहानसेंच असलें तरी आनंद मात्र अपरिमित झाला. मला वाटतें, आकाराच्या अल्पतेवरून कांहीं कोणाला आनंदाचें प्रमाण काढतां येणार नाहीं. आनंद हा नेहमींच निःसीम असतो. तो गगनांतहि मावत नाहीं.

ताई तुमच्याकडे उतरली नाहीं याबद्दल तुम्ही व मत्स्यगंधा दोघांनाहि

वाईट वाटलें हें वाचून मला मात्र फार भूषण वाटलें. कुठल्याहि सुनेला सासऱ्यानें घरींच रहावें असें वाटणें ही गोष्ट दुर्लभच आहे. पण माझ्यासारखा सासरा स्नेहसंपादित असल्यामुळें तो सासरा नसतो, बापच असतो. आणि म्हणूनच नैसर्गिक नात्यांतील बंधनें आणि भीड यांचा स्वायत्त नात्यांमध्यें अभाव असतो. मी तुमच्याकडे यावें असें जितक्या उत्कटतेनें तिला वाटतें तितक्याच उत्कटतेनें मलाहि पण वाटतें. परंतु मी विचारपूर्वक जीवनाची जी प्रणालि स्वीकारली आहे तिच्या मर्यादा न पाळल्या तर माझा टिकाव लागणार नाहीं. केवळ स्नेहाखातर कोठेंहि जाऊन राहणें मला मानवतें, आवडतें आणि पटतेंहि. पण आतां तें मला परवडत नाहीं.

कुटुंबसंस्था हा समाजाचा मुख्य घटक व्हावा असें जर वाटत असेल तर तिच्यांत सामाजिकतेचे गुण पाहिजेत, ती समाजाची अल्पशी प्रतिकृतीच बनली पाहिजे. ज्याचा रक्तसंबंध किंवा यौनसंबंध नसेल अशा एकाद्या तरी 'वानप्रस्थ' किंवा 'अनिकेत' माणसाचा समावेश अगत्यपूर्वक करण्याची वृत्ति च पात्रता ज्या कुटुंबांत असेल त्याची आकृति कितीहि अल्प असो, त्याच्यांत व्यापकतेचा गुण राहील. कुटुंबसंस्थेंत हा जर नसेल तर तो नातलगांचा किल्ला किंवा आप्तांचा 'प्रासाद' होईल. पण तें अतिथि अभ्यागतांचें-निवाऱ्याचें स्थान होणार नाहीं म्हणून पूर्वीच्या परंपरेंत आतिथ्याला व अगत्यशीलतेला फारच महत्त्वाचें स्थान होतें. एरव्हीं कुटुंबांत क्षुद्र स्वार्थ व संकुचित आप्तभावना यांचाच अमंगळ अंमल माजेल. मत्स्यगंधेच्या आमंत्रणाबद्दल मला भूषण वाटतें तें या दृष्टीनें.

ताईची प्रकृति आतां अगदींच 'जबाब देऊं' लागली आहे. ती अगदीं उसनी ऐट आणून मला लेख किंवा पत्र सांगायला आव्हान करीत असे, पण तिच्या प्रकृतींत कांहीं दम राहिलेला नव्हता. त्यापेक्षां माझें रोगजर्जर व मरतुकडें शरीर पुष्कळच जास्त काम देतें. याचें कारण मी त्याची तक्रार कधीं करीत नाहीं. उपकरणाशीं भांडत बसणें हें चांगल्या कारागीराचें लक्षण नव्हे म्हणतात ना?

कळावें, हे आशीर्वाद.

नवी दिल्ली
७–१२–४९

स्नेहांकित,
दादा

# ठेविलें अनन्तें तैसेंचि रहावें ....

प्रिय ताई,

तुझें ता. १२ चें पत्र आज पोंचलें. तुझ्या प्रकृतीनें तुझ्या व माझ्या दोघांच्याहि धैर्याची परीक्षा पाहण्याचें ठरविलेलें दिसतें.

तेथें तू तीन आठवड्यांकरितां गेलीस हें खरें आहे; पण आपल्या योजना व ईश्वरी संकेत यांचा नेहमीं मेळच असतो असें नाहीं. अशा प्रसंगीं मनांत सारखा असंतोष बाळगण्यापेक्षां 'ठेविलें अनन्तें तैसेंचि रहावें' आणि वर 'चित्तीं असो द्यावें समाधान.' प्रकृति अगदीं संपूर्ण बरी होईतों कोणाची तरी शुश्रूषा घ्यावीच लागणार, कोणाला तरी त्रास द्यावाच लागणार. ज्यांचें नैसर्गिक नातें आहे त्यांच्यावर आपण आपला उपजत हक्क मानून कोडगेपणानें व निगरगट्टपणानें त्यांची सेवा घेतोंच. त्यांना त्या कष्टांत पुष्कळदां गोडी वाटत नाहीं. तीं माणसें वैतागतातहि; तरी आपण तें सारें सहन करतों. कारण त्यांचें व आपलें नातें रक्ताचें असतें. तेव्हां त्यांचें कर्तव्य आपल्या खस्ता खाणें जसें आहे तसेंच त्यांचा राग सहन करणें आपण आपलें कर्तव्य मानतों. नैसर्गिक नात्याचा हा गुण आहे पण जीं नातीं स्नेहायत्त असतात, त्यांच्या बाबतींत आपण जरा सावध असतों. अति त्रासानें कदाचित् त्या स्नेहांत अंतर येईल अशी अव्यक्त भीति आपणांस वाटत असते. मला वाटतें, हा स्नेहाचा उपमर्द आहे. त्रास व कष्ट सहन करण्याइतका कस ज्या स्नेहांत नसेल तें तकलुपी, नाजुक व बेगडी असलें पाहिजे. . . आपल्याकरितां हाल काढण्यांतहि ज्यांना गोडी वाटते त्यांचें घर हेंच आपलें खरें निवाऱ्याचें ठिकाण.

कळावें, हे आशीर्वाद.

नवी दिल्ली
१५-१२-४९

तुझा,
**दादा.**

# ' न मे भक्तः प्रणश्यति '

२९-६-४९

चि. ताईला अनेक उत्तम आशीर्वाद.

तुझें ता. २६-६ चें आगगाडींतून धाडलेलें पत्र पोंचलें. मीहि त्याच दिवशीं तुला दिल्लीच्या पत्त्यावर पत्र पाठविलें. दोघांनाहि पत्रें लिहिण्याची प्रेरणा एकाच दिवशीं झाली. त्यापूर्वींचीं तुझीं दोन्ही पत्रें पोंचलीं. हृदय भरून आलें. मनाला पुष्कळच वेदना झाल्या. आपली भेट झाली असती तर खरोखरच बरें झालें असतें. भेटीचा योग आला नाहीं याबद्दल आतां विलक्षण हळहळ वाटते.

तुझ्या प्रकृतीविषयीं फार काळजी वाटली. मुली, स्नेहानें स्नेह वाढतो. आमची बबी आहे, बेबी आहे, इतर मुली आहेत, त्यांत तूंहि सामील झालीस. माझें सारें कुटुंब स्वायत्त आहे. त्या कुटुंबांतील माणसांना माझा लळा आहे, मला त्यांचा आहे. यासारखें दुसरें भाग्य नाहीं, दुसरें सुख नाहीं. माझा कांहीं विशिष्ट सांप्रदाय नाहीं, कांहीं कार्य-योजना नाहीं. म्हणून फक्त वात्सल्य, नुसतीच ममता, मी अगदीं उधळू शकतों.

एकान्तांत फार आत्मपरीक्षण करूं नये. स्वतःच्याच का होईना, पण दोषांचें चिंतन सतत करूं नये. चिंतनानेंच ' चित्त ' बनतें. दोषांच्याच चिंतनानें चित्त दूषित होतें. आत्मनिंदेंतून ' ग्लानि ' उत्पन्न होते आणि शेवटीं विषाद निर्माण होतो. गुणहि देवाला अर्पण करावेत आणि दोषहि त्यालाच ' निवेदन ' करून मोकळें व्हावें. बेटा, प्रार्थनेंत शक्ति कोणाच्या नाहीं? शक्ति तळमळींत असते. मार लागला कीं आपण किंकाळी फोडतों, ती आई-ला ऐकूं येते. अंतःकरणाच्या व्यथेंतून जी किंकाळी निघते ती देवाला ऐकूं गेल्यावांचून रहात नाहीं. संताच्या प्रार्थनेंत जितकी शक्ति आहे, तितकीच पामराच्या प्रार्थनेंत आहे. पाप्याच्या प्रार्थनेंत तर वेदनेचें सामर्थ्य असतें. तूं निरागस व निष्पाप आहेस. तुझ्या वेदनेंत निरपराधी तळमळीचें पावित्र्यहि आहे.

रडायला आलें म्हणजे अगदीं धाय मोकलून रडून घ्यावें. भारावलेलें मन

हलकें होतें. पण धीर मात्र सोडूं नकोस. ' कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे ' हे चरण मनांतल्या मनांत घोळून घोळून म्हणावे. सामर्थ्याची प्रचीति येईल.

मोकळेपणानें मला लिहीत जा. आपली प्रकृति सांभाळ. हेळसांड होऊं देऊं नकोस. वाटेल तेव्हां माझ्याकडे ये. मी असेन तेथें यायला हरकत नाहीं. आपण जाऊं तेथें आपलें माहेरच आहे.

' न मे भक्तः प्रणश्यति ' ही प्रतिज्ञा भगवंतानें केली आहे. ' समर्थासी लाज आपुल्या नांवाची. ' तो तुझा सांभाळ करील. रूपें तर त्याला डुकरापासून नरोत्तमापर्यंत हवीं तीं घेतां येतात. कळावें हा आशीर्वाद.

स्नेहांकित,
दादा

## समर्पणाचें विज्ञान

३-१२-४९

माझ्या मुली,

तुझें आगगाडींत लिहिलेलें कालचें पत्र आज आतां संध्याकाळीं हातीं आलें. पत्त्यावरील अक्षर पहातांच हृदय उचंबळून आलें. तुझें पत्र एकटें नाहीं आलें. तें आपल्याबरोबर बबनचें कार्डहि घेऊन आलें. थोरल्या वहिणीचें शील पत्रानेंहि कायम राखलें. तुमची आठवण मला प्रतिक्षणीं येतच होती. पण बबन–बेबी यांना एकमेकांची सोबत असल्यामुळें त्यांच्यापेक्षां तुझी आठवण विशेष येत होती. शिवाय तूं जवळजवळ उतारवयांत लाभलेली कन्यका असल्यामुळें माझ्या सगळ्या अपत्यांत तुझें स्थान अपूर्व व अद्वितीय आहे. अर्थात् तुझी आठवण किती येत असेल याची तूंच कल्पना कर. माझें मन सारखें तुझ्याबरोबर प्रवास करीत होतें. रात्रींदेखील तूं मला हांक मारते आहेस असा स्पष्ट आवाज ऐकूं येत होता. आज पहांटे उठल्याबरोबर तुझी

तार हातीं आली आणि आतां हें पत्र आलें. किती किती बरें वाटलें म्हणून सांगूं ?

पण तुझ्या पत्रांतील उद्वेगाचा व निराशेचा सूर पाहून मात्र चित्त व्यथित झालें. बेटा, माझ्याजवळ तुला मन:समाधान लाभेल, शरीरस्वास्थ्यहि कायम राहील अशा अपेक्षेनें तूं आली होतीस ना ? मग तुझी प्रकृति बिघडली आणि शारीरिक अस्वास्थ्याचा परिणाम थोडासा मनावरहि एकाद्या वेळीं झाला असला, तर त्याची लाज तुला कीं मला ? त्यांत अपयश तुझें कीं माझें ? तूं धाकटी आहेस ना ? तूं माझी मुलगी आहेस ना ? मग स्वत:कडे दोष घेण्याचा मोठेपणा तुला कशाला हवा ? जो मोठा असेल त्याची जबाबदारीहि मोठी. तेव्हां तूं आपल्या मनाला मुळींच कांहीं लावून घेऊं नकोस. तूं मुलगी म्हणून माझ्याकडे आलीस. त्यांत कसलें आलें आहे यशापयश ? त्यांत लाज कसली आणि उद्वेग कशाचा ? असें बिघडलें तरी काय ? पुन्हां माझ्याजवळ ये, सुखानें व बिनदिक्कत रहा, मी सांगेन तें काम कर. त्यांत अडचण कोठें आहे ? उगीचच वैतागूं नकोस, बाळ ! मी तुला जवळ ठेवूं शकलों नाहीं यांत वास्तविक माझें अपयश आहे. वैताग व अनुताप मला वाटायला हवा. तूं आपली एवढीशी असून उगीचच आपल्यावर सर्व ओढून घेतेस ! ‘लहानपण बरवें देवा’ चा धडा गिरव !

तूं म्हणतेस, तूं मला त्रास दिलास, दुरुत्तरें बोललीस, अपमान केलास—मला यापैकी कांहींच कसें कळलें नाहीं ? मांजराचे दांत जसे पिलाला बोंचत नाहींत, त्याचप्रमाणें पिलाचीं नखेंहि मांजराला रुतत नाहींत. तूं काय मला ओरबाडलेंस ? माझ्या अंगावर कोठें बोचकारे उमटलेले दिसत नाहींत. माझ्याशीं काय औपचारिक शिष्टाचारानें वागणार होतीस ? मोकळी वागणूक कशाला म्हणतात मग ? व्यर्थ आपल्या जीवाचा जळफळाट करून घेऊं नकोस. राग, संत्रास, उबग माझ्याजवळ प्रगट करायचा नाहीं तर कोठें करायचा ? अम्मळ शांत चित्तानें विचार कर, म्हणजे तुला कळेल. यांत पातळीचा, लायकीचा किंवा स्वभाव-दोषांचा प्रश्नच कोठें उद्भवतो ? आत्मग्लानीच्या भरांत तोंडाला येईल तें लिहून टाकलें आहेस झालें ; यांतच मला संतोष आहे. मनांत आलें तें लिहून मोकळें व्हावें.

तुझें चित्त विषादानें अवरुद्ध झालेलें होतें म्हणून ता. १ च्या पहांटे मी

जें बोललों त्याचेंहि तुला यथार्थ आकलन झालें नाहीं. "यापुढें तुमच्याजवळ राहूं या म्हणणार नाहीं." या वाक्यांत तुझ्या चित्ताची वेदना सांठवलेली आहे. असा निर्धार करायला तुला सांगितलें आहे कोणी ? भलतासलता निश्चय करायचें कारण काय ? तूं सारें कांहीं माझ्यावर सोंपविणार होतीस ना ? मग आतां स्वतः संकल्प करण्याच्या भानगडींत कशाला पडतेस? पोरी, तूं समर्पणाची कला शीक. समर्पणांत अद्‌भुत शक्ति व विलक्षण आनंद आहे. समर्पणांत सारी अहंता पाण्यांत मिठाच्या खडकाप्रमाणें विरघळून जाते. बापू ज्याला, 'समर्पणाचें विज्ञान' The science of surrender म्हणत असत, तें जीवनाचें एक अनुपम दर्शन आहे. तूं सारें माझ्यावर सोंपवून मोकळी हो. मला तुझ्या मनःस्थितीची पूर्ण कल्पना आहे. म्हणूनच मध्यें लखनौला जाण्याची कल्पना काढली गेली असतां मी तिला विरोध केला. सध्यांच्या तुझ्या मनःस्थितींत तूं अगदीं ज्यावेळीं जसें वाटेल त्यावेळीं खुशाल तशी वाग. ज्यावेळीं व जितके दिवस माझ्याजवळ येऊन रहावेसें वाटेल त्यावेळीं अगदीं बिनदिक्कत ये. त्यांत विचार करण्याचें काडीइतकेंहि कारण नाहीं. तुझी मनोदेवता वांकडा मार्ग कधींच दाखवणार नाहीं.

माझे मुली, मरणाची गोष्ट पुन्हां बोलूं नकोस. जीव वांचविण्याकरितां मृत्यूची कांस धरणें हा देखील मोठा सूक्ष्म व भयंकर स्वरूपाचा पलायनवाद आहे. माणसानें जसें मरणाला भिऊं नये तसेंच जीवनालाहि भिऊं नये. जीवन धीरानें व आनंदानें जगावें आणि गरज पडल्यास मरणहि तत्परतेनें व धैर्यानें पत्करावें; पण मरणाकांक्षिता मात्र असूं नये. गीतेंत ज्याला, 'क्षुद्र हृदय दौर्बल्य' म्हटलें आहे तें हेंच. तें अनार्यजुष्ट आहे, अस्वर्ग्य आहे आणि अकीर्तिकर आहे. माझ्या परिचयामुळें तुला जगण्यांत पुन्हां रुची वाटूं लागली होती असें तूं वारंवार म्हणत आलीस ना ? मग तुला जर पुन्हां मरणाचे डोहाळे होऊं लागले असतील तर त्यांत माझें केवढें भयंकर अपयश आहे बरें ? बाळे, तुला जीवनांत सात्त्विक गोडी वाटूं लागावी ही तर माझी धडपड आहे. तूं माझ्या पदरीं अपयश बांधणार आहेस का ? कोण म्हणतें तूं जगायला लायक नाहींस म्हणून ? जो जो जन्माला आला तो तो जन्माला पात्र आहे, जीवनाचा जन्मसिद्ध अधिकारी आहे. त्यांत तूं तर माझी स्वायत्त

पुत्रिका आहेस. तेव्हां तूं अशी अभद्र वाचा बोलूं नकोस. ती वाणी अभद्रच नव्हे तर अपवित्रहि आहे. ' अपवित्र वाणी नको माझ्या मुखा ! '

जेथील लोकांना आपलें अगत्य असेल तेथेंच जावें ही मर्यादा मी कसोशीनें पाळत आलों आहें. माझ्या कुटुंबांतील मुख्य व्यक्तीला आवडत नाहीं असें दिसून येतांच मी प्रत्यक्ष आईला, बहिणीला, भावजयांना व भावांना देखील न येण्याची अश्रुपूर्ण ने ांनीं व सद्‌गदीत कंठानें विनंती केली. त्यांचा अपमान मला सहन होण्यासारखा नव्हता. आतां मालकिणीला गृहत्याग घडल्यापासून मीहि तुझ्याप्रमाणेंच ' अनिकेत ' झालों आहें. जेथें आपलें ' स्वागत ' तेंच आपलें ' घरटें. ' बाकीच्या साऱ्या ' सराई ' आहेत.

आतां माझ्याजवळ राहण्याविषयीं. तूं माझ्याजवळ राहिलीस म्हणजे मला किती सुख देतेस हें आतां सांगायची गरज नाहीं. तुला तें माहीत आहे. इतरांच्याहि ध्यानांत आलें आहे. प्रश्न माझ्या आनंदाचा नसून तुझ्या प्रगतीचा व उत्कर्षाचा आहे. तूं इतक्या थोर थोर व अधिकारी व्यक्तींजवळ राहिल्यानंतर माझ्यासारख्या यःकश्चित पामराजवळ तुला रहावेंसें कां वाटतें याचें माझ्या मनाला राहून राहून आश्चर्य वाटतें. माझ्या बाह्य व्यक्तित्वाचें कोणाला यत्किंचितहि आकर्षण वाटावें अशी आकृतीच भगवंतांनीं मला दिली नसल्यामुळें शारीरिकतेचा आरोप करावयाची सोयच नाहीं. म्हणून एवढ्या श्रेष्ठ व अधिकारी व्यक्तींच्या सान्निध्यांत राहिल्यानंतर तूं जेव्हां माझ्या सहवासाची आकांक्षा धरतेस तेव्हां तूं उच्च पातळीवरून घसरून खालच्या पातळीवर येत नाहींस ना अशी शंका येऊं लागते. कांहीं काल माझ्यापाशीं राहिल्यानंतर तुझा भ्रमनिरास होईल ही खात्री मला आहे; पण त्या भ्रमनिरासाची भीति मला वाटत नाहीं. परंतु तूं इतक्या आशेनें आणि अपेक्षेनें माझ्याकडे आल्यानंतर तुझा भ्रमनिरास झाल्यावर त्यानें तुझा जो आशाभंग व मनोभंग होईल त्यानें तुझें व्यक्तित्व तर बारगळणार नाहीं ना अशी भीति मनाला अवश्य वाटते. माझ्या सान्निध्यानें तुझी ईश्वरनिष्ठा व आत्मशक्ति कमी न होतां वाढेल का ? माझ्या संसारी व लौकिक वृत्तीचा संसर्ग तर तुला लागणार नाहीं ना ?—अशी भीति माझ्या मनाला वाटते.

तुझ्या ठिकाणीं माझ्यापेक्षां गुणवत्ता कितीतरी पटींनीं अधिक आहे. तुझ्या गुणांचें चीज व्हावें, लोकांना त्यांचा उपयोग व्हावा अशी आकांक्षा तुझा पिता

या नात्यानें मला आहे. तेव्हां तुझ्यामध्यें व्यक्तिनिष्ठेऐवजीं कर्मनिष्ठेचा व सेवानिष्ठेचा विकास व्हावा असें मला साहजिकच वाटतें.

तुझें माझें नातें स्नेहार्जित व स्वयंस्फूर्त असल्यामुळें अधिक उत्कट व अधिक पवित्र आहे. म्हणून मला तुझ्या शरीराप्रमाणें तुझ्या यशाचें रक्षण सर्वतोपरी केलें पाहिजे. दिलीप राजाला जेव्हां तो सिंह म्हणाला कीं, ' दिलीपा, तुझें शरीर मोलाचें आहे, ' तेव्हां दिलीप राजा सिंहाला म्हणाला,

किमप्यहिंस्यस्तव चेन्मतोऽहम्
यशःशरीरे भव मे दयालुः ।
एकान्तविध्वंसिषु मद् विधानम्
पिण्डेष्वनास्था खलु भौतिकेषु ॥

( बा सिंहा, मी वधाला योग्य नाहीं असें तुला वाटत असल्यास माझ्या यशःशरीराची, कीर्तिरूपी देहाची दया येऊं दे. माझ्यासारख्यांना या क्षण-भंगुर देहाविषयीं आस्था वाटणें शक्य नाहीं.)

तुझें शील अगदीं धुतल्या तांदळापेक्षांहि स्वच्छ आहे याचा मला अनुभव आहे. पण तुझें यश देखील तसेंच रहावें याची काळजी मला घेतली पाहिजे. चारित्र्य व सदाचार यांच्याबद्दल तुझा जो लौकिक आहे तो सारखा वाढत कसा जाईल याची दक्षता बाळगली पाहिजे. माझें यश दूषित झालें तर आतां माझ्याजवळ गमवण्यासारखें कांहींच उरलेलें नाहीं. पण तुझ्या लौकिकाला धक्का मात्र लागतां कामा नये. ' पितेव हिते नियुक्ते '– पित्यानें नेहमीं हिताची योजना करावी. तेव्हां तुझ्या हिताचा विचार सतत माझ्या मनांत येत राहणें स्वाभाविकच नाहीं का ? या दृष्टीनें मधून मधून सावध करीत असतो. त्यांत तूं माझ्याजवळ रहाणें वर्ज्य करावेंस अशांतला भाग मुळींच नाहीं. मुख्य गोष्ट प्रांजळपणा व मोकळेपणा आहे. कांहींहि लपवूं नये. गुप्त-पणा हा सगळ्यांत मोठा गुन्हा मानावा. ' Think not because no man sees, such thing will remain unseen ' ही भावना सतत जागृत ठेवावी. परवां ठाकुरबाप्पांचा वाढदिवस झाला. त्या प्रसंगीं बोलतांना बाप्पा म्हणाले, ' मी सरकारी नोकरींत दोनदां लांच घेतली आणि आयुष्यांत

दोनदां परस्त्रीगमन केलें.' पाप वेशीवर टांगलें म्हणजे चिघळत नाहीं. दुसऱ्याची घाण उघड्यावर थुंकूं नये पण स्वतःची लपवूं नये. दोष लोकांसमोर आला म्हणजे तो कमी होण्याचा संभव असतो, गुप्तच राहिला तर सुधारणेची अनिच्छा असते. गुप्तता टाळण्याचा एकच नियम माणसाच्या उन्नतीला पुरेसा आहे. केवढाहि निढावलेला पापी असला, अगदीं 'पापकृत्तम' असला तरी तो उघड्यावर, मैदानावर जगूं लागला म्हणजे सन्मार्गाला लागलाच. तो 'सम्यग्व्यवसित' झाला. 'मग साधुरेव स मन्तव्यः!' तूं आणि मी दोघेहि गृहविहीन आहोंत. मोकळें मैदान हेंच आपलें खरें निवासस्थान. अरण्य किंवा मैदान बाहेर नसतें, हृदयांत असतें. मैदानी वृत्ति व मैदानी जीवन यांत फार मोठें संरक्षण आहे.

समर्पण व प्रांजळपणा हीं दोन व्रतें सर्वस्पर्शी आहेत. समर्पणांत जी सेवा घडते ती कृत्रिम नसते, औपचारिक नसते, अहंभावजन्य नसते. मालकीच्या भावनेनेंहि माणूस सेवा करतें. खिदमतगार आपल्या घोड्याची खिदमत करतो. आपण आपलीं भांडींकुंडीं अगदीं आरशासारखीं स्वच्छ करतों. सामानसुमान अगदीं लख्ख ठेवतों. त्याच्याकरितां कष्ट करतों, झिजतों; पण ती सेवा नव्हे, ती प्रभुत्वभावनेनें केलेली मेहनत आहे. पण आपल्याला जें माणूस आवडतें त्याचें काम करण्यांत आपल्याला आनंद वाटतो. यांत नकळत सेवा घडते व अहंकार विरून जातो. त्या कष्टांतच गोडी वाटते. माणसांचा परस्पर-सहवास असाच कष्टयुक्त आनंदाचा असतो. त्यामुळेंच मला बबन-बेबी व तूं गेल्यापासून क्षणभर करमत नाहीं. खोली कशी भकास व निर्जन वाटते. मग तूं माझ्याजवळ राहून सुख दिलेंस का त्रास दिलास सांग पाहूं ?

पत्र संपण्याचें लक्षण दिसत नाहीं. तुझ्याशीं बोलत बसलों म्हणजे सुमारच रहात नाहीं, आणि पोटहि भरत नाहीं. पण आतां आवरतों. प्रकृतीची नीट काळजी घे. पत्रें पाठवल्यावांचून तुलाच राहवणार नाहीं, तेव्हां तें सांगावयाला नकोच. मी रोज वाट पाहीन.

कळावें, हा आशीर्वाद.

तुझा,
**दादा**

ता. क. :–राहवत नाहीं म्हणून पुन्हां सांगतों. निराशा व वैताग यांना थारा देऊं नकोस. आदर्श सेवा कर. हनुमान जानकीला शोधशोधून निराश होण्याच्या बेतांत आला तेव्हां त्यानें केलेला आत्मबोध लक्षांत ठेव :

अनिर्वेदः श्रियोमूलम्
अनिर्वेदः परं सुखम् ।
अनिर्वेदो हि सततम्
सर्वार्थेषु प्रवर्तकम् ॥

४–१२–४९ : काल हें पत्र रात्रीं बसून लिहिलें. पण तूं कोल्हापूरला पोंचल्याची सूचना आलेली नसल्यामुळें टपालांत टाकलें नाहीं. तूं तेथें नसलीस किंवा जाऊं शकली नाहींस तर घोटाळा व्हायचा. म्हणून तुझ्या पत्राची वाट बघायचें ठरविलें. आज सबंध दिवस तुझ्या तारेची वाट पाहिली; पण व्यर्थ.

मी यापूर्वी पुसा इन्स्टिटयूट पाहिली नाहीं याचें मित्रांना आश्चर्य वाटलें तें साहजिकच होतें. पण माझ्या स्व ावाला मी काय करूं? कुठल्याहि औपचारिक समारंभाला केवळ शिष्टाचारादाखल हजर राहण्याची मला फारशी आवड नाहीं. परिचयाच्या अभावीं कुठल्याहि संस्थेंतील अधिकारी किंवा वजनदार माणसें मला बोलवीत नाहींत संस्थेंतील एकादी अप्रसिद्ध व सामान्य व्यक्ति परिचयाची असते. तिनें बोलावलें म्हणजे मोठ्या आस्थेनें जा ों. त्यामुळें माझ्या परिचयाचें क्षेत्र जरा निराळें पडतें. लहान मामुली माणसांचाच परिचय होतो, पण मामुली माणसांचा स्नेह व अगत्य मामुली नसतें! त्यांत औपचारिकता व थाटमाट कमी असतो, पण जिव्हाळा व वास्तविकता जास्त असते, नाहीं? तुझ्यामुळें माझ्या स्नेहीजनांचें वर्तुळ वाढलें. बोल, तुझ्यापासून मला लाभ झाला कीं माझ्यापासून तुला?

केव्हां केव्हां एकाच वाक्यांत सबंध ग्रंथ सांठवलेला असतो, नाहीं? " यापुढें तुमच्याजवळ राहूं या म्हणणार नाहीं, " या तुझ्या अश्रुपूर्ण वाक्यांत असेंच वेदनेचें ब्रह्मांड एकवटलेलें आहे, नाहीं का? तें वाक्य वाचून माझ्या अंतःकरणाला घरें पडलीं. पुन्हां नकोस असें बोलूं.

तुम्ही गेल्यापासून ही खोली मला तुरुंगाच्या कोठडीसारखी वाटूं लागली.

तूं गेलीस त्या दिवशीं सायंकाळीं सोळकरांकडे जाऊन आलों. अल्पशा परिमाणांत थोर मनें कशीं राहतात याचा त्यांचें कुटुंब म्हणजे एक उत्कृष्ट नमुना आहे. कुटुंबसंस्थेंतील शुचिता व सुभगता यांनीं टिकवलेली आहे. एकट्यानें जेवणें चोरासारखें वाटतें. आणि तुला खरें सांगूं, एकटें जगणेंहि चोरासारखें वाटतें. मला एकटेपणा मुळींच सहन होत नाहीं. माझ्या दृष्टीनें हा कांहीं दोष नव्हे, गुणच आहे. पण या परिवर्तनशील जगांत एकटें रहाण्याचे प्रसंग येतातच. त्यामुळें एकट्यानें रहाण्याची संवयहि केली पाहिजे. ' एकाकी यतचित्तात्मा. ' एकटें रहायचें म्हणजे मन ताब्यांत ठेवावें लागतें, आवरावें लागतें. चारचौघांत तें आपोआपच काबूत रहातें.

तूं आपलें शरीर फक्त कार्यक्षमच नव्हे तर कष्टक्षम बनविलें पाहिजेस हें मी तुला पुन्हां बजावून सांगतों. मुलींचीं शरीरें तकलुपी, नाजुक व लुसलुशीत असतां कामा नयेत. विलासी लोकांनीं आपल्या कामनातृप्तीकरितां तशा प्रकारच्या विलासचतुर ललनांची स्तुति केली असेल. पण ज्या बापाला आपली मुलगी मुलाइतकीच स्वसंरक्षणक्षम व पराक्रमी निपजावी असें वाटत असेल त्याची इच्छा अगदींच निराळी असणार. शरीरांतून रोगाचा समूळ नायनाट झाल्यानंतर व्यायाम, आसनें, घोड्यावर रपेट, धांवणें इ. शारीरिक बलविकासाचीं साधनें जरूर करावीं. चेहऱ्यावर आरोग्याची व शक्तीची टवटवी दिसूं लागायला हवी. चर्येवर करारीपणा, शीलाची व विनयाची शालीनता आणि सौंदर्य यांच्यांत विरोध मुळींच नाहीं. शेक्सपियरच्या Measure for Measure मधील एक वाक्य आठवतें. " The hand that made you fair, has made you good. " ज्या इसाबेलाबद्दल हें वाक्य फकीरानें उच्चारलें त्या इसाबेलाजवळ जेव्हां त्या राज्याच्या सिंहासनारूढ पुरुषानें आपली पापवासना बोलून दाखविली तेव्हां तिनें बाणेदारपणानें उत्तर दिलें, " To see I under sentence of death, the impression of keen whips I would bear as rubies; and go to my death as to a bed that longing I had been sick for, ere I would yield myself to this shame." चारित्र्याच्या पोटीं जन्मणारा हा बाणेदारपणा आणि देखणेपणा, काटक व बलिष्ट शरीर हे

गुण मुलाप्रमाणेंच मुलीलाहि भूषणभूत आहेत. मुलाचें शील हें 'परम् भूषणम्' असेल; पण मुलीचें तर तें जीवन आहे.

स्वतःच्या बाबतींत पापाचा तिटकारा पण दुसऱ्याच्या बाबतींत सहानुभूति व औदार्य हीं शीलाचीं विशिष्ट लक्षणें आहेत. बेटा, सामान्य प्रमादशील व अपराधी माणसांतहि अपार सौजन्य दडलेलें असतें, अव्यक्त साधुत्व असतें. म्हणून जो भौतिक किंवा आध्यात्मिक दृष्टीनें अधिकारी बनला असेल त्याचें सर्वांत मोठें भूषण दया हें आहे.

" Believe me, My lord, no ceremony that to great ones belongs, not the king's crown, nor the deputed sword, the marshal's tranch, nor the judge's robe, becomes them with one half so good a grace as mercy does."

वरील धीरोदात्त भाषण ज्या इसाबेलानें केलें तिच्याच तोंडीं शेक्सपियरनें हे शब्द घातले आहेत. याचें कारणहि तिनें मोठ्या असंदिग्ध शब्दांत सांगितलें आहे.

'Go to your own bosom, my lord, knock there and ask your heart.' अपराध्याला शासन करण्यापूर्वी आपल्या अंतःकरणाचा ठाव घ्यावा, आपलें चित्त तपासावें. मी 'संस्कृती' याच मनोवृत्तीला म्हणतों, स्वतःकरितां न्याय आणि इतरांकरितां क्षमेची प्रार्थना हाच संस्कृतीचा गाभा आहे. मुली, जगांतील सामान्य दोषयुक्त स्खलनशील माणसें शीलवान् व्यक्तींना वचकतात तीं स्वतः पाप करतील; पण चारित्र्यवानाला पापप्रवृत्त करावयाला कचरतील. चारित्र्यवान व्यक्तींना पापाकडे प्रवृत्त करायला अनेकदां चारित्र्याचें सोंग करणारीं माणसेंच मायावी रूपें घेऊन येतात. शेक्सपिअर मोठ्या खोंचदार भाषेंत म्हणतो :

" The cunning enemy of mankind, to catch a saint, with saints does bait the hook''

—दांभिक, धर्मवादी, पुष्पितावाणीनें भुरळ पाडणारें तत्त्वज्ञान सांगणारीं माणसेंच बहुधा सत्प्रवृत्त माणसाला पापात्मक धर्माकडे वळवितात.

शेक्सपीयर कांहीं साधु नव्हता. एक चारित्र्यदोषयुक्त नाटककार. त्यानें कांहीं धर्मग्रंथ लिहायला घेतला नव्हता. पण धर्मग्रंथांत भिन्नधर्मीयांविषयींची

जी तिरस्काराची व द्वेषाची भावना आहे ती त्याच्या ग्रंथांत नाहीं. तो पापाबद्दल तिटकारा उत्पन्न करतो; पण पापी माणसाविषयीं कित्येकदां मोठ्या हळुवार व उदात्त भावना निर्माण करतो. आपल्या पापी नवऱ्याकरितां क्षमा याचना करणारी प्रेमविव्हळ स्त्री म्हणते :

" They say best men are moulded out of faults, and for the most part become much the better for being a little bad."

वाल्याचाच वाल्मीकि होतो ना ? फक्त मनःपूर्वकता व प्रांजलता पाहिजे. वाल्यानें पापेंहि मनःपूर्वक व उघडउघड केलीं. चोरून पाप केलें नाहीं, म्हणूनच वाल्मीकि झाला.

पोरी, दुनिया अशाच लोकांची आहे. अजिबात, सपशेल, सर्वस्वीं दुष्टांची ती नाहीं. दुनियेंत माणसावर प्रेम करायचा संकल्प करून वागायची इच्छा करावी. त्यांत पडेल तें सोसण्याची तयारी ठेवावी. मनांत शंका, किंतु–परंतु, वा–न वा यांना थारा देऊं नये. जें पटेल, प्रशस्त वाटेल तें मनःपूर्वक करावें.

" Our doubts are traitors and make us lose the good we might often win by fearing to attempt it."

अगदीं गीतेची आठवण येते. " संशयात्मा विनश्यति." असंदिग्धता आणि उत्कटता या दोन गुणांनीं विचारांत जीव ओतला जातो. असंदिग्धता हा बुद्धीचा गुण आहे आणि उत्कटता हा हृदयाचा गुण आहे. तुझी बुद्धि माझ्यापेक्षां अधिक तरतरीत व तरल असून तुझें हृदयहि माझ्यापेक्षां ज्यास्त शुद्ध व भावनासंपन्न आहे. म्हणून जे विचार तुला पटतील ते तुझ्या वृत्तींत मुरतील व जीवनांत उतरतील. माझ्या बुद्धीला जे विचार सुचतात ते स्फुरूं लागले म्हणजे ते अधिक उदात्त व समृद्ध स्वरूपांत प्रकट होतील. तुझें पात्र अधिक निर्मळ व सुंदर आहे. त्यामुळें त्या विचारांनाहि शुचित्व–सौंदर्य येईल. माझी प्रतिलिपी तूं व्हावीस अशी क्षुद्र इच्छा मला कशी असेल ? पण ज्या पद्धतीनें विचार करण्याचें वळण तुला लागावें आणि त्या विचारांचा विकास व उन्नति उत्तरोत्तर व्हावी असें मात्र मला अवश्य वाटतें. म्हणून इतका पाल्हाळ केला.

सामाजिक जीवनाला तूं लायक नाहींस असें यानंतरहि तुला वाटेल का ?

सामाजिक जीवनाकरितां ज्या व्यावहारिक तत्त्वज्ञानाचा उपयोग होण्या-सारखा आहे त्याची कल्पना तुला या पत्रावरून येईल.

बेटा, माझ्यापेक्षां सामाजिक जीवनाची योग्यता तुझ्या अंगीं कितीतरी जास्त आहे. तूं सारें कांहीं कर पण वैतागाच्या कल्पनेला थारा मात्र देऊं नकोस.

तुझ्या स्पष्ट व शुद्ध वाणींतून आणि मंगळ कंठांतून निघालेलीं भजनें, स्तोत्रें व उपनिषदें ऐकावयास माझे कान नित्य श्रवणातुर असतात; पण तुझ्या शरीरप्रकृतीकडे पाहून तुला त्रास द्यायला जीव होत नसे. असो.

तुझा
दादा

## शरीरोत्सर्ग व आत्महत्या

१२—१२—४९

प्रिय ताई,

आज गिरिधारीजींना आलेलें तुझें पत्र पाहिलें. अगदीं अक्षरशः काळीज करपलें ! जीव कसा कावराबावरा झाला. हिंदु कोडाची चर्चा ऐकायला सभेंत येऊन बसलों खरा; पण चित्त ठिकाणावर नाहीं. काय होतें तें माझें मलाच कळेना. मुली, अपत्यप्रेम मोठें कठिण आहे. पांखरूं असतों तर उडून आलों असतों. आतां देवाची अनन्यभावें करुणा भाकणें हा एकच मार्ग आहे. त्याच्या करुणेचा प्रत्यय अतिशय निराशेच्या प्रसंगींहि आला आहे. मग याच वेळीं तो अंतर कसा देईल ? ' चालों वाटे आम्ही, तुझाचि आधार ! '

....मृत्यूची भीति पार नाहींशी होणें यासारखें जीवनांत दुसरें सुख नाहीं. मरणाचें भय गेलें म्हणजे जीवन निर्विघ्न व अप्रतिरुद्ध होतें. पण जीवनाविषयीं जर अनास्था किंवा अरुचि उत्पन्न होत असेल तर मात्र तें उफ-राटें शौर्य किंवा मृत्यूची भावना यांचें लक्षण मानावें. बेटा, जीवनावर प्रेत-

कळा येऊं देतां कामा नये, मरणाची सांवली पडूं देतां कामा नये. मरणाचें सारखें भयच वाटत राहिलें तर जीव नकोसा होतो. म्हणून मृत्यूचें भय जिंकणें, म्हणजे 'मृत्युंजय' होणें जरुरीचें आहे.

माणूस 'मृत्युंजय' झाला म्हणजे तो 'इच्छामरणी' होतो. त्याला तो अधिकार प्राप्त होतो. अशा योगमुक्ताला, म्हणजे तारतम्यानें व संयमानें आत्मसमर्पणाकरितां जगणाराला, जीवनमुक्त म्हणत असत. त्याला शरीरोत्सर्गाचा देखील अधिकार असे. शरीराचें प्रयोजन संपलें म्हणजे त्यानें योगमुक्त होऊन देहोत्सर्ग करावा. 'योगेनान्ते तनुत्यजाम्.' तो जिवंत समाधि घेऊं शकत असे. ज्ञानदेवानें, रामतीर्थांनीं व इतर कांहीं जीवन्मुक्तांनीं अशी समाधि घेतली म्हणतात. त्यांना आत्महत्येचें पाप लागत नाहीं. कारण त्यांचें जीवन देहांतिक झालें. जैन मुनीचें, योगिनींचें प्रायोपवेशनहि याच कोटींतलें आहे. सतीच्या सहगमनाविषयीं एरव्हीं माझें मत अनुकूल नसलें तरी तिचा प्राणोत्सर्गहि याच जातीचा मानावा लागेल. एखाद्या महान् ध्येयाकरितां युद्धांत कामास येणें किंवा जीवावर उदार होणें हें जसें पुण्यकार्य आहे तसेंच हें देहविसर्जनहि पुण्यमय आहे.

अन्यायाचा प्रतिकार करण्याकरितां किंवा सेवेकरितां स्वतःचा जीव धोक्यांत घालणें अथवा प्रायोपवेशन करणें सर्वांनींच प्रशस्त मानलें आहे. भरत जेव्हां रामासमोर प्रायोपवेशनाची तयारी करूं लागला तेव्हां रामानें त्याला सांगितलें कीं इतरांच्या शरीराचा घात न करण्याचा संकल्प ज्यांनीं केला असेल अशा सात्विक लोकांचाच तो अधिकार आहे. अर्थात् अहिंसक प्रतिकाराच्या प्रक्रियेंत त्याचा समावेश होऊं शकतो.

त्याचप्रमाणें एखाद्या निधिरक्षकाप्रमाणें ज्यानें ठेव म्हणून सेवेकरितां शरीर वापरलें असेल त्याला शरीर सेवेला निरुपयोगी झालें आणि तें पुन्हां उपयोगी होऊं शकेल असा संभव उरला नाहीं म्हणजे शरीरत्याग करण्याचा अधिकार प्राप्त होतो. पण जोंपर्यंत शरीर दुरुस्त होण्याची शक्यता असेल तोंपर्यंत देवाचें देणें व समाजाची ठेव म्हणून तें मोठ्या सायासानें रक्षिलें व जोपासलें पाहिजे हें उघड आहे. तें कस्पटाप्रमाणें मानतां येणार नाहीं. क्षुद्र कामाकरितां वापरतां येणार नाहीं.

शरीरोत्सर्ग व आत्महत्या यांतील भेद लक्षांत यावा म्हणून हा विस्तार केला तूं त्याचा विचार कर— अर्थात् सवडीप्रमाणें.

बेटा, आपलें हृदय कुठल्या भाषेंत प्रकट करूं? शब्दांत भावनेचें भाषांतरहि नीट करण्याची शक्ति नाहीं. औषध घे. पथ्य सांभाळ. पथ्यांत विश्रांतीहि आलीच. तुझ्या जीवनाकांक्षेकरितां नव्हे, तर आमच्या जीविताचें रान होऊं नये म्हणून. प्रभु आमच्या कळकळीच्या प्रार्थनेचा अव्हेर करणार नाहीं.

माझ्यामुळें का होईना, जी मानवनिष्ठा तुझ्या ठिकाणीं निर्माण झाली तीच मानवनिष्ठा तुला जीवननिष्ठ बनवील असें माझी मनोदेवता सांगते. आणि ती ताईच्या दादांच्या मनोदेवतेची साक्ष आहे! दादांच्या मनोदेवतेचा कौल एकदांचा खोटा ठरेल, पण ताईच्या दादांच्या मनोदेवतेची ग्वाही फोल कशी ठरेल? तूं याच देहीं माझी गंगोत्री होण्याचें कबूल केलें आहेस ना? गंगेप्रमाणेंच अविरत, निरलस, निरपेक्ष लोकोपकार करण्याची शक्ति तुझ्या अंगीं परत आलेली पाहण्याचें भाग्य मला लाभणार आहे. उतार वयांत लाभलेलें माझें लाडकें अपत्य देवानें मला एरव्हीं कशाकरितां दिलें बरें?

ता. क.—

मघां तुला पत्र लिहिलें खरें, पण पोट कांहीं भरलें नाहीं. कितीहि लांबलचक पत्र लिहिलें तरी पोट भरणें शक्य नाहीं. आजारी माणसाला त्रास देऊं नये म्हणतात. पण आपलें माणूस आजारी असलें म्हणजे जीव तेथेंच घिरटया घालतो. शिवाय माझें पत्र हा तुझ्या बाबतींत शुश्रूषेचा एक प्रकार ठरेल याची जाणीव मला आहे. म्हणून पुन्हां लिहायला बसलों. तूं सावकाश वाच.

या खेपेला तुझ्या दुखण्यानें बरेंच उग्र स्वरूप धारण केलें आहे. माझ्या स्थितीची तुला कल्पना आहेच. माझ्यामुळें जर तुझा पुनर्जन्म झाला असेल, तर तुझ्यामुळें मी जीवननिवृत्तींतून पुन्हां जीवनांत प्रवेश केला आणि नवीन रुचि अनुभवूं लागलों. आयुष्याच्या उत्तरार्धाच्या उंबरठयांत परमेश्वरानें माझ्या पदरांत कन्यारत्न आपण होऊन आणून टाकलें. तो करुणाघन माझी वंचना कधीं तरी करील का? त्याच्यावरील विश्वास हाच माझा आधार आहे शरीर रोगजर्जर झालें म्हणजे आपल्यालाच तें नकोसें वाटायला लागतें. एक प्रकारचा कंटाळा व वीट येतो. हें अगदीं साहजिकच आहे.

ज्याला मढ्याप्रमाणें पडून राहण्याची किंवा नुसती चैन करण्यांत आयुष्य उधळण्याची संवय नाहीं त्याला ही बळजबरीची निष्क्रियता मरणाहून मरणासारखी वाटते. तुझ्यासारख्या तल्लख व कर्तबगार मुलीला अंथरुण तिरडीपेक्षांहि भयंकर वाटावें हें भूषणावहच आहे.

पण कांहीं झालें तरी माझ्या मुलीनें आजारापुढें हात टेकतां कामा नये. मरायला तयार होणें निराळें आणि मरणाच्या स्वाधीन होणें निराळें. मरणाला शरण जाण्यांत आत्म्याचा पराभव आहे. हिरमोड कधींहि होऊं देऊं नये. सेवकांचा शिरोमणि मारुतिराया याचा दाखला मागील पत्रांत दिलाच आहे. जेव्हां तो अगदीं टेकीला आला तेव्हां त्या वीर पुरुषाच्या अंतःकरणांत ‘अनिर्वेदः श्रियोमूलम्’ हा मंत्र स्फुरला. ‘अनिर्वेद’ हा पराक्रमी हनुमंताचा बीजमंत्र आहे. तो तुझ्या वृत्तींत बिंबून जीवनांत बाणला पाहिजे.

स्नेहाबरोबर जी काळजी येते तिच्यामुळें जीवनाला सार्थकता व व्यापकता येते. आईला मुलाची काळजी असते म्हणून तिच्या जीवनांत उदात्तपणा येतो. ज्याचा कोणावरच स्नेह नसेल तो निःसंग व निश्चिंत राहूं शकेल. पण मग त्याला आयुष्य हें इब्सेनच्या ‘डॉल्सहाऊस’मधील नायिकेप्रमाणें शुष्क व निरर्थक वाटेल. असें स्नेहहीन जीवन मला तरी अगदीं आळणी व दुर्वह वाटेल. स्नेहाबरोबर येणाऱ्या चिंतेनें जीवन अग्निपूत होऊन तेजस्वी बनतें. तशी चिंता मला तुझ्याविषयीं असूनहि यापूर्वींच तुझ्या आजाराचें उग्र स्वरूप माझ्या ध्यानांत येऊं नये हा दोष माझा आहे.

कळावें, हा आशीर्वाद.

तुझा,
**दादा**

## समत्व म्हणजेच योग

११–६–४९

चि. ताईंना अनेक उत्तम आशीर्वाद.

तुमचें ता. ८।६ चें पत्र आज पोंचलें. पत्ता इंग्रजींत असता तर कदाचित् कमी उशीर लागला असता.

तुमचा व माझा परिचय झाला यांत फक्त तुमचाच लाभ झालेला नाहीं. म्हणूनच मी ' चि. ताई ' असें लिहिलें आहे. त्यांत सारें कांहीं आलें. कोणाचाहि मार्गदर्शक किंवा शिक्षक होण्याची माझी तयारी नाहीं. तें ओझें मला झेंपण्यासारखें नाहीं. माणसाचें प्रेम मला परवडतें. त्याची निष्ठा नाहीं परवडत. विश्वासाला पात्र ठरलों म्हणजे पुरे. स्नेहाचा व विश्वासाचा संग्रह अगदीं निधास्तपणें व प्रयत्नपूर्वक करावा. ज्यांच्याशीं पटत नसेल—म्हणजे मतभेद असेल—त्यांचाहि स्नेह किंवा विश्वास गमावूं नये. म्हणून माझी पहिली सूचना अशी कीं जुने स्नेहसंबंध न तोडतां, नवीन जोडा. जोडणें म्हणजे ' योग. ' यालाच मी जगण्याची हातोटी किंवा जीवनांतील ' कौशल्य ' म्हणतों.

' अध्यात्म ' मला कळत नाहीं. तेव्हां त्याची व्याख्या कशी करतां येणार ? पण गीतेंतील एक वचन आठवतें. ' स्वभावोऽध्यात्ममुच्यते '. अध्यात्म म्हणजे ' स्व–भाव '. ' स्वभाव ' म्हणजे ' स्वत्वभावना ' किंवा आपुलकी. आपुलकीनें माणसाला आनंद वाटतो. जेथें आपुलकी नसेल तेथें ' भीति ' वाटते, ' तिरस्कार ' वाटतो. आपुलकी वाटूं लागतांच प्रीति वाटते व तिटकाऱ्याऐवजीं गोडी वाटूं लागते. प्रेमांत आनंद आहे द्वेषांत अस्वस्थता आहे, दुःख आहे. म्हणून आपण ' भय ' व ' द्वेष ' यांचें निराकरण करूं इच्छितों. ज्याचें आपण निराकरण करूं इच्छितों तो ' द्वेष '; ज्यांत आपल्याला समाधान वाटतें तो ' स्व–भाव '. मी यालाच अध्यात्म म्हणतों. जीवनांत अद्वैताचा अभ्यास याच पद्धतीनें होऊं शकतो. एरवीं ज्ञान मेंदूंत राहील आणि जीवनांत अज्ञान राहील, विकार रहातील.

' समदर्शन ' म्हणजे ' समवर्तन ' नव्हे असा श्लेष कांहीं शास्त्री काढतात. त्यामुळें त्यांच्या दर्शनांत व वर्तनांत मेळ नसतो. दर्शन वर्तनांत न उतरलें तर

तें 'सार्थक' होत नाहीं. शास्त्री दोन 'सत्ता' मानतात. व्यावहारिक सत्तेचे नियम निराळे, पारमार्थिक सत्तेचे नियम निराळे. त्यामुळें व्यवहारांत अगदीं निकृष्ट 'अर्थवादी' वृत्तीचीं माणसेंहि 'परम-अर्था' ची भाषा बोलतात. त्यांत पुनः 'विवर्तवादा' मुळें मोठी सोय झाली आहे. व्यवहार मिथ्या असल्यामुळें व्यवहारांत अधम स्वार्थ–वृत्तीनें वागणारीं माणसेंहि 'परमार्थवादी' ठरतात. म्हणून जें बुद्धींत असेल तें कृतींत आणण्याचा प्रयत्न पाहिजे. विचारांत व कृतींत 'अंतर' नेहमींच राहील, तें रहाणें इष्टहि आहे; पण 'विरोध' मात्र असूं देतां कामा नये. जो विचार जीवनांत दाखल होऊं लागतो तो निष्ठेच्या रूपानें परिपक्व व परिणत होतो.

ज्यांच्या विचारांत व व्यवहारांत विरोध राहतो त्यांच्या जीवनांत असमाधान राहतें. त्या विरोधाचा परिहार करण्याच्या दोन पद्धति प्रचलित आहेत. एका पद्धतीला 'अरण्यवाद' असें म्हणतां येईल. यांत वैताग, उबग, उद्वेग आहे. 'जगाचा त्याग करून अरण्याचें सेवन करावें, हिमालयांत निघून जावें. सदेह कैलासवास पतकरावा. आपल्या कल्पनेच्या एका अव्यक्त सृष्टींत विहार करावा.' जुन्या परिभाषेंत ज्याला 'विज्ञानवाद' म्हणत, त्यांत आणि या 'कैलासवादांत' फारसा फरक नाहीं. दुसऱ्या पद्धतीला 'प्रतिसृष्टिवाद' म्हणूं. तो प्रयत्न विश्वामित्रानें केला. हल्लींचे भौतिकशास्त्रवादी तो करीत आहेत. त्यांत ईश्वराच्या रचनेचा अव्हेर आहे, आणि त्याचा उपमर्द आहे.

मला हे दोन्ही एकटोकी मार्ग मानवत नाहींत. पहिला जीवनपराङ्मुख आहे आणि दुसरा उद्दाम अहंवादी आहे. संपूर्ण सद्गुणी असा आदर्श माणूस शोधण्याचा हव्यास करूं नये. तो प्रयत्न 'परीस' शोधण्यासारखा निष्फल आहे. संपूर्ण दुर्गुणी, शंभर टक्के पापी, असाध्य दुष्ट, या जगांत कोणी नाहीं असा प्रत्यय मनाला आला पाहिजे. आपण स्वतःच (दुर्गुणी) नाहीं तर इतर कोणी कसा असेल, ही खूण मनाला पटावी. म्हणून इतरांची सुधारणा करण्याच्या भरीस पडूं नये. सेवा इतरांची करावी, ती निरपेक्ष करावी म्हणजे स्वतःची सुधारणा होते. अशानें वृत्ति आंबत नाहीं. दृष्टि विटत नाहीं. निराशा हि होत नाहीं. निरपेक्ष स्नेहाला अपात्र कोण आहे ? स्वतःला संभाळावें. इतरांचा संभाळ करायला प्रभु समर्थ आहे.

यावरून आध्यात्मिकतेची माझी कल्पना लक्षांत येईल. 'अर्थ' व 'पर-

मार्थ ' यांत जो विरोध आहे त्याचें कारण एकाचा जो 'स्वार्थ' तोच दुसऱ्याचा 'अनर्थ' अशी स्थिति आहे. यालाच 'स्वार्थविरोध' किंवा हितसंबंधीचा लढा म्हणतात. हीच आर्थिक विषमता. हा 'स्वार्थविरोध' नाहींसा झाला कीं 'समत्व' येईल. समत्व म्हणजेच 'योग', हेंच अध्यात्म.

स्त्री–पुरुषांतील विषमतेचें मूळ 'काम' आहे. आर्थिक विषमतेच्या मुळाशीं लोभ आहे. लैंगिक विषमतेच्या मुळाशीं 'काम' आहे. कामनिरपेक्ष स्नेहसंबंध हा यावरील इलाज आहे. यालाच मी समाजजीवनांतील 'ब्रह्मचर्य' भावना म्हणतों. 'कनक' व 'कान्ता' हे शब्द विकारांचे प्रतीकात्मक आहेत. अशा रीतीनें जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राशीं अध्यात्माचा मेळ घालतां येतो. जीवनाचें अधिष्ठान: अध्यात्म असावें या तुमच्या आकांक्षेची परिपूर्ति यांत आहे. 'भगवंताचें अधिष्ठान' तें हेंच.

तुम्हांला जें वाटेल तें अगदीं मोकळ्या मनानें लिहा. संकोच मुळींच नसावा. मला सुचतील तशीं उत्तरें मी देईन. माझ्यापासून फार मोठ्या बौद्धिक किंवा आत्मिक समाधानाची अपेक्षा राखूं नये. कळावें हा आशीर्वाद.

स्नेहाकांक्षी,
दादा

# मित्र आणि मैत्री

कॉन्स्टिटयूशन हाऊस,
दिल्ली

प्रिय...

तुमचें स्नेहपूर्ण पत्र काल रात्रीं मिळालें. अत्यंत आनंद झाला. खरें म्हणाल तर माझें मन आंतल्या आंत तुमच्या पत्राची वाट पहात असतें. ज्या वस्तूची आपण प्रतीक्षा करीत असतों तिच्या प्राप्तीमुळें होणाऱ्या आनंदाचा अनुभव कोणाला नसतो? प्रतीक्षेमध्यें परितृप्ति आहे. तुमच्या पत्रांत जी ऋजुता

आणि प्रांजळता असते ती चित्ताला एक विशेष प्रकारचा आनंद देते ज्याच्या हृदयांतून मानवी स्नेह आणि सहानुभूति यांची पुनीत धारा अकुंठित गतीनें वहात असते त्याच्या हृदयांत कोणत्याहि फटींतून किंवा छिद्रांतून कसलाहि विकार अथवा अपवित्र भावना प्रवेश करूं शकत नाहीं. आणि जरी तिनें थोडा-फार प्रवेश केलाच तरी त्या वेगवान धारेंत ती टिकूं शकत नाहीं.

तुम्ही लोक म्हणतां कीं माझ्या सान्निध्यांत तुम्हांला सुख व मानसिक स्वास्थ्य लाभतें. हें कसें नि कां होतें याची मला कांहींच कल्पना येत नाहीं. परंतु तुमच्याच अनुभूतीचें प्रत्याख्यान मी कसें करूं? ती खोटी आहे असें कसें म्हणूं?

परंतु एक गोष्ट तुम्हांला मान्य करावीच लागेल. जर तुम्ही मला भला आणि विवेकी माणूस समजत असाल–आणि तुम्ही तसें समजतां हें मला माहीत आहे—तर तुम्हाला हेंहि मान्य करावें लागेल कीं, जे लोक माझा भलेपणा वाढवितील आणि माझ्या विवेकाची अभिवृद्धि करतील अशाच व्यक्तींची संगत मी धरीन. आणि मग मी ज्यांच्याशीं मैत्री ठेवतों त्यांच्याकडून मलाहि खूप लाभ होतो हेंहि तुम्हांला मान्य करावें लागेल. आणि जर तुम्ही मला आपल्यापेक्षां जास्त बुद्धिमान समजत असाल तर स्नेही निवडण्यांत मी तुमच्यापेक्षां जास्त सारासार विवेक वापरतों हें तुम्हांला कबूल करावें लागेल. म्हणजे तुम्ही जितका चांगला स्नेही निवडाल त्याहून कितीतरी अधिक चांगले स्नेही मी निवडीन. तेव्हां आतां बोला, कुणाचा जास्त फायदा होतो? तुमचा कीं माझा? कृतज्ञ मी झालें पाहिजे कीं तुम्ही?

जे लोक मला निरंतर खालीं ओढण्याच्या प्रयत्नांत असतील अशाच सगळ्या लोकांना आपल्याभोंवतीं गोळा करण्याइतका मूर्ख मी आहें असें तुम्ही खास समजत नसाल. मी तसें केल्यास माझ्यांत नि माझ्या मित्रांत कायमचा 'गजग्राह' (रस्सीखेंच) चालत राहील. मी वर उठण्याचा प्रयत्न करीन आणि ते मला खालीं ओढण्याची धडपड करतील. किंवा मला वस्तुतः पतनच हवें आहे आणि त्या कामीं मला मदत करणारेच माझे मित्र आहेत. इतका मी नादान आहे असें मानावें लागेल. तुम्ही कोणत्याहि बाजूनें विचार करा, माझे मित्र तुमच्या मित्रांपेक्षां चांगले आहेत याच निष्कर्षावर तुम्हांला यावें लागेल.

ताईचें मनःस्वास्थ्य ठीक आहे. तिची ईश्वरावर निष्ठा आहे. तोच सर्वांचा रक्षक नि पालक आहे. सामान्य माणसांच्या या संसारी जगांत ती कुठेंतरी टेकण्यासाठीं स्थान पहात होती. ज्या ठिकाणीं आपली वृत्ति आणि चिरसंचित सिद्धान्त न सोडतां राहतां येईल असें स्थान तिला हवें होतें. अशा प्रकारचा पिता ती शोधत होती. तिला एखादा आध्यात्मिक किंवा दार्शनिक प्रकाश नको होता. तशा प्रकारच्या प्रकाशाच्या शोधांत ती असती तर इतर कुठेंहि गेली असती, निदान माझ्याजवळ तरी फिरकली नसती. या भूमीवर विचारण्यासाठीं तिला एका पार्थिव, लौकिक, अगदीं सामान्य अशा आसऱ्याची जरूर होती. मी तिला भेटलों. तिचा पिता होण्याचें कबूल करून मी तिच्यावर कांहीं उपकार थोडाच केला आहे ? तिनें मला आपला पिता बनविण्याची इच्छा बाळगली. मी काय करणार ? पृथ्वीवर पाय ठेवण्यासाठीं ती एक पार्थिव आधार शोधत होती. तो आधार मी बनलों आहें एवढेंच. माझ्या आणि तिच्यांतील परस्पर वात्सल्याचा हा अनुबंध तुमच्यासारख्या आत्मीयांच्या सद्भावनेनें उभयकल्याणकारीच होईल.

तिची प्रकृति मात्र ठीक नाहीं. तिचें शरीर भोगायतन नाहीं, सेवायतन किंवा साधनायतन आहे. ऐतरेयोपनिषदांत अशना आणि पिपासा यांना आयतनाच्या रूपानें शरीर देण्यांत आलें. मग काय विचारावें ? एक जीव दुसऱ्याचें अन्न बनला आणि सर्वत्र मत्स्य न्यायाचें साम्राज्य सुरू झालें. परंतु, सेवापरायण व्यक्तींना देखील हनुमानाप्रमाणें वज्रदेहाची आवश्यकता असते. सेवकांमध्यें हनुमान ' मुकुटमणि ' आहे. म्हणून मी ताईला सांगितलें आहे कीं, " स्वतंत्रपणें सेवाक्षम बनण्यासाठीं तूं कांहीं दिवस शरीर 'शुश्रूषे 'मध्यें घालव. हेंहि एक साधनेचेंच अंग आहे. " ती उद्यां जात आहे. तिच्याबरोबर तिच्या स्नेहायत्त पित्याचें वात्सल्यपूर्ण हृदय आणि त्याच्या वात्सल्य-प्रेरित प्रार्थना जात आहेत. ज्या दिवशीं अधिक आणि अविरत सेवाक्षम शरीराच्या कांतीनें माझ्या हृदयाला प्रमुदित करीत माझी बाळ आपल्या बुद्धीनें व कलेनें जनताजनार्दनाची आराधना करील त्या दिवशीं मी स्वतःला कृतार्थ समजेन. तिला केवळ आपल्याजवळ ठेवून घेऊन काय करूं ? मी परीस थोडाच आहें ? जुनें लोखंड मात्र अवश्य आहें. परंतु त्याच्यावरहि गंज चढण्याची शक्यता असतेच. लोकांना वाटत होतें कीं मुलगी माझ्याजवळ राहून कोणत्याहि

बाह्य उपचारांशिवाय बरी होईल. ही समजूत चुकीची ठरली. तें बरेंच झालें. एका बाबतींत तरी भ्रमपरिहार झाला. भ्रमपरिहार होण्यांत उभय पक्षांचें हीत आहे.

तुमच्या एका वाक्यानें माझ्या हृदयांत अढळ स्थान प्राप्त केलें आहे. तुम्ही नेहमीं म्हणत असतां, 'दादा! मी निष्क्रियपणें दुःखें नि संकटें पहात राहूं शकत नाहीं.' बस्स. हीच चारित्र्याची गुरुकिल्ली आहे. ही व्याकुळता, ही तळमळ, ही उत्कंठा, परमेश्वराचें वरदान आहे. 'नारद देखा विकल जयन्ता। लागि दया कोमलचित्त सन्ता।'–अपराधी, उपद्रवी, नीच जयन्ताची 'कोमलचित्त' नारदाला दया आली. संत आणि असंत यांच्यांतील अंतर तें हेंच. परमेश्वरानें तुम्हांला सद्भावनांनीं कांठोकांठ भरलेलें, सस्कारप्रचुर हृदय दिलें आहे. सहृदयता हें सेवाधर्माचें मूल आहे. तुम्ही धाडलेल्या सुंदर कवितेंतहि हीच मुख्य भावना आहे. महाभारतामध्यें युधिष्ठिराला असेच प्रश्न विचारून विचारून विदुरानें आणि इतर महात्म्यांनीं त्याला प्रबोध केलें आहे. त्याचप्रमाणें प्रश्नांच्या रूपानें तुमच्या या कवितेंत सिद्धान्त–निरूपण आहे. सहृदयता, सहानुभूति आणि सहयोग यांची भावना त्यांत ओतप्रोत आहे. म्हणूनच तर ती तुम्हांला इतकी आवडली. मलाहि ती फार आवडली.

ववन तुमच्यावर बेहद्द खूष आहे. ती म्हणतो कीं तुम्ही जणूं कारंजींच उडवीत असतां. विषमतेमध्येंहि चित्ताची समता ढळूं न देणें ही कांहीं मामुली करामत नाहीं. परंतु तुम्हां लोकांत आणि आम्हां लोकांत एक मूलभूत फरक मात्र अवश्य आहे आम्ही अगदीं पार्थिव आहोंत—याच मर्त्य लोकांतील जीव! तुमचा रथ जमिनीच्या थोडासा वरून–अंतराळांतूनच—चालत असतो. तरीहि आम्ही तुमचे स्नेहभाजन आणि विश्वासपात्र बनूं शकलों आहोंत ही ईश्वराची कृपाच आहे म्हणूनच मी म्हटलें कीं, 'ताईला मी काय सांभाळणार?' जी ईश्वराला शरण गेली तिचा सांभाळ करण्याची फुशारकी मारणें म्हणजे ईश्वराचा निरादरच करण्यासारखें आहे. तुमचा नि तिचा स्नेह व विश्वास ही आमची अमूल्य संपदा आहे.

—स्नेहाधीन,

दादा

# तूं बंड करणार आहेस ना?

१३९ कॉन्स्टिटयूशन हाऊस
नवी दिल्ली

चि.....ला अनेक उत्तम आशीर्वाद.

तुझें ता ७।९ चें पत्र काल दुपारीं पोंचलें. माझ्या नेहमींच्या रिवाजाला अनुसरून कालच तावडतोब उत्तर लिहायला बसणार होतों.

तुला ज्या व्यथा होत असतील त्यांची कल्पना मी करूं शकतों. आपण संक्रमणकालांत आहोंत. जुनीं मूल्यें, जुन्या प्रतिष्ठा, गडबडून ढांसळत आहेत. नवीन मूल्यांची व नव्या प्रतिष्ठांची स्थापना करायची आहे. जडयंत्रवादी व प्रतिवर्तनवादी (Behaviourist) यांनीं माणसाला यंत्राधीन व बाह्य तंत्राधीन कल्पिलें होतें. या यांत्रिक व तांत्रिक मनूंतून आपण एका नव्या युगांत प्रवेश करीत आहोंत. या मूल्यपरिवर्तनाची सिद्धि आपल्यापैकीं दरेकाच्या प्रयत्नांवर अवलंबून आहे. यांत किंतीतरी व्यक्तींना आहुतीहि द्यावी लागेल युद्धांत जे कामास येतात तेहि—नव्हे तेच—युद्ध जिंकतात.

या क्रान्तीच्या काळांत तूं स्त्रीच्या जन्माला आलीस हें सद्‌भाग्य आहे. कारण, साधारणपणें स्त्री ही स्थितिवादी असते. क्रान्तीचें नेतृत्व कुठला तरी पुरुष करीत असतो. स्त्री–जीवनाचीं मूल्यें बंडखोर स्त्रियांनाच बदलावीं लागतील. पुरुषापेक्षां स्त्रीच्या बाबतींत परिस्थिति अधिक प्रतिकूल व विषम आहे. पण ताई, परिस्थिति जितकी प्रतिकूल तितकाच पराक्रमाला वाव अधिक नाहीं का? आधीं तूं स्त्री झालीस, त्यामुळें एक नैसर्गिक प्रतिकूलता जन्म-प्राप्तच आहे. स्त्रीचें शरीर नाजूक असतें ही दुसरी प्रतिकूलता. एरव्हींच तें इतरांच्या अभिलाषेचा विषय असतें, त्यांत जर देखणें असलें तर मग विचारायलाच नको! एक एक गुण माणसाचें अवसान खचविणारा आहे. पण त्यामुळेंच पराक्रमाला अधिक अवसर नाहीं का?

तूं बंडखोर आहेस ना? मग बंड कशांत आहे? जो शरीरानें दुबळा असेल त्याला स्वतंत्र जीवनाचा अधिकार नाहीं, त्यानें स्वायत्त जीवन–सिद्धीची आकांक्षा धरूं नये, स्वेच्छेनें जगण्याची अभिलाषा करूं नये, असा परंपरेचा दण्डक आहे. या परंपरेच्या विरुद्ध बंड करायचें आहे. स्त्री ही शरीरानें

दुबळी, तकलुपी व नाजूक आहे म्हणून या बंडाचें नेतृत्व वास्तविक तिच्याकडेच गेलें पाहिजे. तो तिचाच अधिकार आहे.

आज कुटुंबाचा पालनकर्ता, रक्षियता व भर्ता पुरुष आहे. पण कुटुंबांतील कर्ता पुरुष आज शरीरानें सगळयांत सुदृढ व बलवान् असतो असें थोडेंच आहे ? बहुधा तो अशक्त, रोगट व जराजर्जरहि असतो. तरी त्याचें नेतृत्व आपण मान्य करतों. तथापि एकंदर समाजव्यवस्थेच्या मुळाशीं शक्तीच्या प्रतिष्ठेची भावना दडलेली असते. शरीरबल हें जीवनाच्या पात्रतेचें अंतिम गमक नव्हे हें तत्त्व प्रस्थापित करणें रूपवान्, बुद्धिमान् व यौवनसंपन्न ध्येयवादी आणि पराक्रमी तरुणींचेंच काम आहे! हें ध्येय काय कमी स्फूर्तिदायक आहे ?

आजपर्यंत स्त्री व पुरुष आपापल्या खुराडयांत रहात होतीं. आपापल्या स्त्रीत्वाची व पुरुषत्वाची जाणीव विसरून एकमेकांच्या सान्निध्यांत रहाण्याचें त्यांना वळणच नाहीं. स्त्री ही पुरुषाच्या सान्निध्यांत एक तर आप्तरक्षणाच्या वृत्तीनें वागते किंवा त्याच्या अनुरंजनाच्या वृत्तीनें तरी वागते. बरोबरीच्या नात्यानें वागण्याची तिला संवय नाहीं. म्हणूनच पुरुषालाहि नाहीं. जी स्त्री स्त्रीत्वाची जाणीव विसरून स्वाभाविक मोकळेपणानें वागते तिची वृत्ति मुलखावेगळी वाटावी हें साहजिकच नाहीं का? आपली दृष्टि शुद्ध असावी. दृष्टि शुद्ध असली म्हणजे पाऊलहि बहुतेक सरळ पडतें. 'दृष्टिपूतं न्यसेत् पादम्.' पाऊल शुद्ध दृष्टीनें पाहून टाकावें, दृष्टि शुद्ध असली म्हणजे दर्शनहि स्वच्छ असतें. looking चा outlook शीं हा असा संबंध आहे. दृष्टि हें प्रकाशाचें तत्त्व आहे. नित्य प्रकाशांत जगावें म्हणजे जीवन उज्ज्वल होतें. अंधार टाळावा, गुप्तता टाळावी, म्हणजे तमोगुणाची बाधा होत नाहीं, काळोखी चिकटत नाहीं. जीवनाची उज्ज्वलता व प्रांजळता डोळयांत उमटते ! डोळे हे अन्तःकरणाचे आरसे आहेत. उपनिषदांत इन्द्र विरोचनाला म्हणतो, 'हा जो डोळयांत पुरुष दिसतो' तो पहा. विरोचनाला रहस्य उमगलें नाहीं. पण डोळा स्त्रीचा आरसा आहे, हें खरें.

The light of the body is the eye.

Therefore, when thine eye is single thy whole body is also full of light, but when thine eye is evil, thy body

also is full of darkness. Take heed, therefore, that the light which is in thee, be not darkness. If thy whole body be full of light, having no part dark the whole shall be full of light, as when the bright shining of a candle doth give the light.

निर्मल चारित्र्याचें तेज व मांगल्य दृष्टींत प्रकट होतें आणि साऱ्या जीवनाला प्रकाशित करतें. " नानाछिद्रघटोदरस्थितमहादीपप्रभाभास्वरम् !" ख्रिस्ताच्या वरील शब्दांत व या वाक्यांत कितीतरी साम्य दिसतें !

बेटा, हा मार्ग मृत्यूला किंवा काळाला शरण जाण्याचा नाहीं, कालगती-ला प्रतिरोध करण्याचा आहे. काळ हें जसें जीवनाचें अपहरण करणारें तत्त्व आहे, त्याचप्रमाणें तें जीवनपोषक तत्त्वहि आहे. त्याच्या आघातांना धीरोदात्तपणें तोंड दिलें म्हणजे तोच काळ मरण न देतां शरण देतो, माणसाला नवें व दिव्य असें अमर जीवन देतो. ज्याच्या वृत्तीला ध्येयनिष्ठेचे बळकट पंख फुटलेले नसतील त्या क्षीण हृदयाच्या, अल्पप्राण जीवांना कवि म्हणतो :

Spread no wings
For Sun–ward flight; thou soul with unplumed vans
Sweet is the air and safe and known
The homely levels, Only strong ones leave
The nest each makes his own.
Live–ye who must–such lives as live on thee;
Make golden stairways of your weakness; rise
By daily sojourn with these phantasies.

ज्यांना 'रथांना पंख नाहींत' त्यांनीं आपल्या अनेक दुबळ्या वृत्तींच्या जिन्यावरच चढत रहावें, स्वतःचें घरटें तयार करण्याच्या भरीस पडूं नये !

तूं म्हणतेस ना कीं चढण मोठी बिकट आहे. पण कवि म्हणतो ती स्फूर्तिदायक आणि तरतरी आणणारीहि आहे :

Manifold track lead to yon sister–peaks,
Around whose shows the gilded clouds are curled
By steep or gentle slopes the climber comes

Where breaks that other world.

Strong limbs may dare the rugged road which storms

Soaring and perilous, the mountain's freast;

The weak must wind from slower ledge to ledge with many a place of test.

काटक शरीराच्या व कणखर वृत्तीच्या लोकांनीं खडतर वाटेनें तुफानाला न जुमानतां डोंगराच्या माथ्यावर चढावें ! अशक्तांनीं विश्रांति घेत घेत वर चढावें ! एक मार्ग संयमनिष्ठ गृहजीवनाचा आहे, दुसरा ब्रह्मचारिणीचा आहे. तूं निवड केलेली आहेस. 'तब रोना क्या रे ?' काळ हा तुझा सहाय्यक व पुरस्कर्ता बनेल. या अर्थानें त्याच्या कुशींत तुला निवाड्याचें स्थान मिळेल ! तो मृत्यूचा प्रतिनिधि म्हणून तुझ्या पुढें उभा रहाणार नाहीं.

तुला जें वाटतें, जें सुचतें तें लिहून टाकतेस हेंच योग्य आहे. मी त्याचा सहृदयतेनें विचार करतों. रुक्ष चिकित्सा करीत नाहीं. व्यक्ति म्हणजे कांहीं निर्जीव समस्या नव्हे. मला व्यक्तीचा विचार निष्ठुर वैज्ञानिकाच्या भूमिकेवरून करतां येत नाहीं. वैज्ञानिकाच्या दृष्टीनें व्यक्तीचें महत्त्व एका परमाणूपेक्षांहि कमी असेल; रजःकणाइतकेंहि नसेल. परमार्थवादी माणसाला व्यक्तीची जीवनज्योत म्हणजे a tiny glow, a feeble & uncertain flicker, एक चिमुकली चमक, क्षणजीवी व थरथरणारी ज्योत वाटत असेल, पण तिचें भावनात्मक मूल्य त्रिभुवनापेक्षांहि अधिक आहे. शुष्क बुद्धिवाद हा बाह्य वस्तुनिष्ठ व विषयनिष्ठ असतो. त्याला सारें ज्ञान परोक्ष होतें. हृदयाला सहानुभूतीमुळें प्रत्यक्ष अपरोक्षानुभूति होते. म्हणून व्यक्तीचा विचार मी हृदयनिष्ठ भूमिकेवरून करीत असतों. लोक म्हणतात, तुला माणसाची परीक्षा नाहीं. मी म्हणतों, मला माणसांची परीक्षा करायचीच नाहीं. मी कांहीं परीक्षक किंवा न्यायाधीश नाहीं. मी सोबती व सहयोगी आहे. जो माझ्यावर माणसाची परीक्षा नसल्याचा आरोप करतो त्याची तरी परीक्षा मला आहे, असें तो मानतो का ?

कळावें, हा आशीर्वाद.

तुझा,

**दादा**

# कुटुंबनिष्ठेचें अधिष्ठान

१३९ कॉन्स्टिटयूशन हाऊस
नवी दिल्ली, २७–८–४९

प्रिय गंपू,

तुझें पत्र आतांच पोंचलें. एखाद्याचें जीवन योगमय असतें, एखाद्याचें प्रयोगमय असतें. योगमय जीवनांत नेमकेपणा व मोजकेपणा असतो. प्रयोगांतहि योजना असते; पण शाश्वती कमी. स्थैर्य कमी. शेवटीं तेंच अंगवळणीं पडतें. उद्योगाच्या बाबतींत तुझ्या आयुष्यांत एकंदरींत प्रयोगाचा भाग अधिक आहे. यांतहि ईश्वराची कृपाच आहे असें मानलें म्हणजे झालें ! आतापर्यंत कुठलाहि प्रयोग अंगाशीं आला नाहीं. हाहि येणार नाहीं.

बल्ला, तूं व विमल माझ्यापाशीं वाढलांत. बल्ला माझ्यापेक्षां धाकटा खरा; पण मी त्याची मर्यादा वडील भावाइतकी राखली. कौटुंबिक कर्तृत्वांत त्याचें तेंच स्थानहि आहे. मी त्या मानानें अंमळ बेजबाबदार आणि कांहींसा मुलखावेगळा. पुण्यश्लोक तीर्थरूप बाबासाहेब निवर्तल्यानंतर तुझ्या आयुष्यांतील महत्त्वाचीं स्थित्यंतरें माझ्याच विद्यमानें झालीं. प्रचंड यश नाहीं मिळालें पण आपलें इमान व मर्यादा शाबूत ठेवण्याइतकी मजबूत दानत देवानें नेहमीं दिली हें काय कमी झालें !

आजहि बबी व बाळू यांच्याविषयी जो जिव्हाळा आहे तो तूं व विमल यांच्याबद्दलहि आहे. तुझ्या या नवीन प्रयोगांतहि तुझा माथा नेहमीं उजळ राहो आणि तुझें उखळ नेहमीं पांढरें राहो असा कळकळीचा आशीर्वाद मी तुला देतों. तूं व बल्ला आपल्या पुण्यश्लोक वडिलांचे प्रतिनिधी आहांत. त्यांचें तर्पण तुमच्याच हातून होईल. पू. आईचाहि सांभाळ तुम्ही दोघेंच करीत आहांत. मातापितरांचें ऋण फेडणें शक्य नाहीं; पण तुम्ही त्या दिशेनें प्रयत्न करीत आहांत. तेव्हां तुमच्या प्रयोगाला त्यांच्या पुण्याईचें बळ मिळाल्यावांचून कसें राहील ? तुमचें यश व तुमचें ऐश्वर्य हेंच माझें समाधान व माझें भूषण नाहीं काय ?

पू. आईचें जीवन दिवसेंदिवस क्षीण होत आहे हें मलाहि आढळून आलें. माणूस म्हातारें झालें म्हणजे तें नकोसें होतेंच असें नाहीं. त्याचें जितकें वय

असेल तितके दिवस त्याचा सहवास लाभलेला असल्यामुळें पुष्कळदां तें जास्तच हवेंसें वाटतें. आईचें आयुष्य संपत आलें असेल; पण तिचा जिव्हाळा मात्र क्षीण झालेला नाहीं. मालकिणीचें भविष्य ठरून गेल्यासारखेंच दिसतें! तिच्याविषयीं लिहूं लागलों किंवा बोलूं लागलों म्हणजे भाषाच खुंटते. हृदयाची गति मोठी विलक्षण आहे. कित्येकदां भावनांच्या उद्रेकामुळें तें ओसंडून भाषेच्या रूपानें वाहूं लागतें. कित्येकदां गोठून, थिजून स्तब्ध होऊन जातें. मालकिणीच्या बाबतींत तसें झालें आहे. तिच्याविषयींची वेदना माझ्या प्रकृतीचेंच अंग बनली आहे. गोपू तिची सर्वतोपरी काळजी घेतोच. तुझेंहि लक्ष असावें.

तूं मूळतापीला अष्टमीकरितां जाऊन आलास हें ठीकच झालें. परमपूज्य भाऊसाहेबांचें स्मरण मला जन्माष्टमी व आचार्य (शंकराचार्य) जयंती या दोन प्रसंगीं हटकून होतें. या वर्षी अष्टमीला मथुरेला जाण्याचा योग होता आणि मथुरा ही श्रीकृष्णाची जन्मभूमि असल्यामुळें परंपरागत संस्कार उद्भुत होऊन तेथें जाण्याचा मोहहि झाला होता. पण मग तो बेत रहित केला. अर्थापेक्षां नीतिधर्म श्रेष्ठ मानणें आणि देशापेक्षांहि देव मोठा मानणें हीं दोन तत्त्वें माझ्या विचारांत व जीवनांत प. पू. भाऊसाहेबांच्या कृपेमुळेंच मुरलीं. म्हणून गीताकार व भाष्यकार यांच्या जयंतीच्या दिवशीं मला त्यांची आठवण येते, आणि मी अगदीं भक्तिभावानें त्यांना वंदन करीत असतों.

तूं जाण्यापूर्वी माझी तुझी भेट होणार नाहीं; पण तुझ्या निमित्तानें तरी एका अन्य प्रान्ताविषयीं आपुलकी वाटेल. तेथेंहि 'आपलें घर' आहे ही भावना राहील. प्रांतावादाची भयानक लाट उसळण्याचीं लक्षणें दिसत असतांना हें कांहीं कमी किंमतीचें समाधान नाहीं.

तुझा,

# कौटुंबिक भावनेचा विस्तार

प्रिय. . .

तुझें ता. १४ चें पत्र पोंचलें. फार बरें वाटलें. आजकाल सकाळच्या प्रहरीं गवतावर दहिंवर पडलें म्हणजे तें मोत्यासारखें चमकूं लागतें. शब्दांचेंहि तसेंच आहे. शब्दांना टवटवी भावनेनें ओथंबलेल्या अन्त:करणाच्या ओलाव्यानें येत असते. एरव्हीं अगदीं मोत्यासारखें अक्षर असलें तरी त्यांतील शब्द अगदीं निर्जीव वाटतात.

तुझ्या पत्रांत तूं आपलें अंत:करण खुलें केलें आहेस. स्नेहाचा हा स्वभाव आहे कीं तो हिणकस केव्हांच नसतो. माणसाला माणसाच्या जवळ आणणें हें त्याचें सहजकार्य आहे. दोन माणसांना जवळ आणणारी वस्तु अशुचि किंवा असुंदर कशी असूं शकेल ? तूं स्नेहभावानें लिहिलें आहेस. म्हणूनच तें वाचून मला इतकें समाधान वाटलें. अत्यंत अधम व टाकाऊ माणसें म्हणून जग ज्यांचा अव्हेर करतें त्यांच्याहि बाबतींत माझा असा अनुभव आहे कीं त्यांचा स्नेह सत्पुरुषाच्या स्नेहाइतकाच मधुर व कल्याणकारक असतो. अमृत फक्त सोन्याच्या भांड्यांतच तेवढें अमरत्व देणारें असतें असें थोडेंच आहे ? पानाच्या द्रोणांतून आपण अमृत प्यालों तरी अमरत्वाची कांति येईल.

मला मानसपुत्र नाहींत. तुमच्या ठिकाणीं कांहीं मी पुत्रत्वाची कल्पना केलेली नाहीं. मी माझ्या स्नेहानें तुमचें पुत्रत्व संपादन केलेलें आहे. तेव्हां तें मानसिक नाहीं; स्नेहार्जित आहे. आणि म्हणूनच आतां तें मला सोडून देतां येत नाहीं.

मी तुझ्या लग्नाला आलों असतों. मध्यें कांहीं वर्षे लग्नकार्यांना जायचेंच नाहीं असें मी ठरविलें होतें. लग्नसमारंभांत अवास्तव खर्च करून नसतें वैभवप्रदर्शन करण्याची व कर्जबाजारी होण्याची जी दुष्ट संवय आपल्या समाजांतील लोकांना जडूं लागली होती, तिचा आपल्यापुरता प्रतिकार म्हणून मी हें धोरण स्वीकारलें होतें. आपल्या आप्तेष्टांच्या व जातीच्या लोकांच्याच लग्नांना जाण्याचा प्रसंग येत असे तें मला मानवण्याजोगें नव्हतें.

आतां माझ्या कुटुंबांत अक्षरश: सर्व धर्मांचीं, सर्व प्रांतांचीं व सर्व जातींचीं मुलें—मुलगे आणि मुली—सामील झालेलीं आहेत. त्यामुळें लग्नांना हजर न राहण्याचा पूर्वीचा आग्रह सोडून दिला आहे. तुझ्या लग्नाला येणें मला आवडलें असतें. तूं म्हणतोस ना कीं माझ्या घरीं तुम्हां सगळ्यांना घरच्या-सारखेंच वाटतें म्हणून ! तुला व तुझ्यासारख्या अनेक मुलांना माझें घर जर हक्काचें ठिकाण वाटूं लागलें तर माझ्या ऐश्वर्याला व भाग्याला कांहीं पार राहील काय ?

कौटुंबिक भावनेचा विस्तार हें मी आपलें जीवितकार्य मानलें आहे. त्यांत मला लांबीरुंदीपेक्षांहि खोलीची चाड अधिक आहे. अजस्रतेपेक्षां उत्कटतेवर अधिक भर आहे. अलीकडे तुझ्या पत्राच्या सांच्याचींच कितीतरी पत्रें माझ्या नातलगांचीं व तुझ्याप्रमाणेंच माझ्याशीं ज्यांनीं स्नेहानुबंध जोडलेला आहे अशा स्वायत्त आप्तांचीं येत असतात. मला धन्यता वाटते कीं यापेक्षां अधिक देवाजवळ मी मागितलेलें नाहीं.

चि. सौ. आशालता ही तुझ्या जीवनांत नवीन आशाच नव्हे तर नवीन प्रकाशहि आणील अशी मला उमेद आहे. आज तुझ्या जीवनांत प्रवृत्ति पुष्कळ असली तरी प्रकाशाचा अभाव आहे. त्यामुळें अंधारांत चौखूर उड्या मार-णाऱ्या शिंगराप्रमाणें तुझें विक्रीडित सुरू आहे. त्याला कौटुंबिक स्नेहाचें अधिष्ठान लाभलें म्हणजे इष्ट तें वळण लागेल अशी आशा मी करतों तुझ्या पत्नीच्या नांवांतील 'लता' या शब्दापेक्षां 'आशा' या शब्दावर माझा विशेष जोर आहे. लता नाजुक असते, परोपजीवि असते. तिला आधार लागतो. आशा ही पराभूताला धीर देते. खचणाराला सांभाळते. नामोहरम झालेल्यांना पुन: उद्योगाला प्रवृत्त करते. तुझा विवाह तुझ्या जीवनांत नवीन स्थित्यंतराचा प्रवर्तक ठरो अशी मी प्रार्थना करतों.

स्नेहांकित,

**दादा**

# प्रेमाची गति अगाध आहे !

भाई गिरिधारीजी,

तुमचें पत्र वेळेवर मिळालें होतें. जरा निवांतपणें बसून उत्तर लिहावें असा विचार होता. नागपूरला वेळ मिळूं शकला नाहीं. यामुळे तुम्हांला उत्तर लिहिण्याची इच्छा कार्यान्वित होऊं शकली नाहीं. इंग्रजींत अशी म्हण आहे कीं, इच्छा हे जर घोडे असते तर माणूस दिवसभर त्यांच्यावर बसून रपेट करीत राहिला असता. इच्छा हे घोडे झाले नाहींत हें बरेंच झालें.

मनुष्य स्वादिष्ट पदार्थ जास्त खातो हें तुम्हांला मान्य आहे ना ? अजीर्ण हें बहुतेक स्वादिष्ट पदार्थांमुळेंच होत असतें. जो पदार्थ माणसाला आवडतो. त्याचे दोन घांस जास्तच तो खातो. त्याचप्रमाणें स्तुति ही माणसाला आवडते आणि तीच तुम्ही मला खायला घालतां. तुमच्या वहिणीनें जरासें अपथ्य केलें तर तुम्ही तिच्यावर किती रागावतां ! परंतु प्रेमातिरेकानें मला मात्र अपथ्य खाऊं घालण्यांत तुम्ही मुळीच मागेंपुढें पहात नाहीं. प्रेमाची गति अगाध आहे. स्नेहाबरोबर विवेकहि राहूं लागला तर कोणत्या कुरूप मुलाची आई आपल्या मुलावर प्रेम करील ? प्रेमाला विवेकाचें वावडें आहे. म्हणून जगांत बऱ्यावाईट सर्वांना प्रेम मिळतें. आम्हांला तुमच्या विवेकाशीं कर्तव्य नाहीं. आम्ही तुमच्या स्नेहाचे भुकेले आहोंत.

परवां तुमचा फोन आला. त्यावरून तुमची तब्येत ठीक नसल्याचें समजलें. थोडीशी काळजी वाटूं लागली. तुम्हांला आजारी पडण्याचा हक्क नाहीं. शुश्रूषा करणारे जर आजारी पडूं लागले तर आजाऱ्यांचें काय होणार ? एखादे दिवशीं थर्मामीटरलाहि ताप यायचा ! तसें झालें म्हणजे अनवस्था प्रसंगच ओढवायचा ! तेव्हां सावधान ! पुन्हां अशी चूक करूं नका. आजाराला थारा देऊं नका. नाहींतर तो तुमची पाठ सोडणार नाहीं. मोठे मोठे चांगले लोकहि सज्जनाची संगत सोडत नाहींत. तुमच्याजवळ राहायला मिळाल्यावर आजार इतर फडतुस माणसांचें दार कशाला ठोठावील ? मी त्याच्या बाबतींत जरा बेपर्वा असतों यामुळें तो भूमिगत ( अंडरग्राउंड ) होतो.

'कल्याण' मधील लेखांत अध्यात्माची थोडीशी चर्चा करीत आहें. ती आतां पुष्कळ दिवस पुरेल. पत्रामध्यें त्याची चर्चा करीत नाहीं. मी कांहीं दररोज पक्वान्न खाणाऱ्यांपैकीं नव्हे. कधींमधीं सणावारीं थोडाबहुत स्वाद चाखतों. जास्त अध्यात्मचर्चा करूं लागलों तर माजूम खाल्ल्यासारखी स्थिति होईल माझी. या जगाची शुद्धच राहाणार नाहीं. इतक्या लौकर जगांतून कूच करण्याची माझी इच्छा नाहीं. तुम्हां लोकांचा स्नेह अध्यात्माहून कमी मधुर आहे काय ?

एव्हांना तुम्ही अगदीं खडखडीत बरे झालां असाल अशी आशा आहे. झऱ्याचें पाणी जितक्या लौकर गढूळ होतें, तितक्याच लौकर तें निवळतें. त्याचा वेगच त्याच्या निर्मळतेचें कारण असतें. आणि वेग हें तर तुमच्या प्रकृतीचें वैशिष्टच आहे. तर मग तुम्ही आजाराला कसा थारा द्याल ?

नवी दिल्ली, तुमचा स्नेहाकांक्षी,
५-१०-४९ दादा

## वस्तु हरवण्याचे फायदे

प्रिय...,

तुमचें कार्ड येऊन दोनतीन दिवस झाले. त्याचें उत्तर द्यायला मला जरा वेळ लागतो आहे असें पाहून ताईनें माझ्यामागें सारखा तगादा लावला. पाठच्या बहिणीपेक्षां जास्त ती तुमचा कैवार घेते. मी उत्तर लिहिणारच होतों; पण म्हटलें, जरा सावकाश लिहूं ! पण ताई कशाला ऐकते ?

सहवासानें न कळत वळण लागतें हा अनुभव नवा नाहीं. सहवासानें आपला गुण अथवा अवगुण दुसऱ्याला बेमालूमपणें लावण्याची कला मला खूप साधली आहे. तेव्हां तुम्ही कल्याणच्या स्टेशनवर आपलें बोचकें विसरलांत हें वाचून जुन्या लोकांना जो 'पुत्रजन्मसम: किल' आनंद होत असे

तसा मला झाला. आतां माझ्या स्वायत्त पुत्रांत तुमची गणना करायला हरकत नाहीं. वस्तु हरवणें आतां माझ्या अंगवळणीं पडलें आहे. तरी पण दर पाळीला वस्तु हरवली म्हणजे पुष्कळच हळहळ वाटते. जगांत असतील नसतील त्या सर्व गुणांचा आरोप हरवलेल्या वस्तूंवर करण्याची माणसाची प्रवृत्ति मोठी प्रबल असते. वस्तु हरवली म्हणजे तिचें महत्त्व जाणवायला लागतें. इंग्रजींत म्हण आहे, A cow knows the value of her tail only when she loses it. घरांत आपण वडिलांना, आईला, बायकोला— सगळ्यांना 'मी मेल्याखेरीज माझी किंमत तुम्हांला कळायची नाहीं!' हे शब्द उच्चारतांना कितीदां तरी ऐकतों. विरहानें ज्याप्रमाणें प्रेमाची तीव्रता वाढते त्याचप्रमाणें वस्तूच्या वियोगानें तिच्याविषयींची आवड अधिकच तीव्र होते. म्हणून वस्तुवियोग हा देवाचा प्रच्छन्न आशीर्वादच मानावा.

दुसराहि एक मोठा फायदा आहे. प्रिय वस्तूचा वियोग वारंवार होऊं लागला म्हणजे मनाला वस्तुवियोगाचा सराव होतो. आणि अशा रीतीनें एक प्रकारची अनासक्ति मनांत रुजूं लागते. शीतोष्ण सुखदुःखाप्रमाणें वस्तू-देखील आगमापायिनी आहेत, ही गोष्ट मनावर बिंबते. आणि मग घटकाभर हळहळून चित्त स्वस्थ होतें. पुनः गंमत अशी कीं नवीन वस्तु विकत घेण्याची संधी व सबब मिळते. कांहीं बाबतींत माणूस मोठा अहंकारी असतो. आपण कुठलाहि जिन्नस कारणावांचून घेतों हें कबूल करण्याची त्याची तयारी नसते. म्हणून मनांत ठसलेली वस्तु विकत घेण्याकरितां तो उगीचच सबबी शोधीत बसतो. मला ही वस्तु उगीचच घ्यावीशी वाटते हें कबूल करण्याइतका प्रांजळपणा लहान मुलाप्रमाणें त्याच्या ठिकाणीं नसतो. तेव्हां वस्तु हरविणें ही प्रौढ व पोक्त माणसाच्या अहंकारी वृत्तीला एक सुसंधिच आहे. तुमच्या परड्या हरवल्या म्हणून आतां नवीन विकत घेण्यास कारण झालें. काश्मीरी सँडल्स पूर्वींपेक्षांहि जास्त तऱ्हेदार व छानदार विकत घेण्याचा सुयोग तुम्हांला आमच्या नागपूर मेलनें प्राप्त करून दिला याबद्दल तुम्ही तिच्या नांवानें एक नारळ फोडला पाहिजे. तुम्ही माझ्याजवळ राहून माझ्यापासून यदृच्छा प्राप्त अपरिग्रहाची दीक्षा घेण्यांत जी तत्परता दाखविली तिच्याबद्दल मी तुमचें मनःपूर्वक कौतुक करतों. हें लोण तुम्ही मत्स्यगंधेपर्यंत पोंचविलें म्हणजे अवघाचि संसार सुखाचा झाला!

मी आलों नाहीं म्हणून मत्स्यगंधेला वाईट वाटलें हें वाचून मला फार समाधान वाटलें. कारण मी यावें अशी उत्कंठा तिला नसती तर तिला वाईट वाटलेंच नसतें. तेव्हां तिची ती उत्कंठा थोडी अधिक तीव्र झाली तर त्यांत नुकसान कुणाचेंच नाहीं. तिनें वाटल्यास माझ्यावर रागवावें. तो हक्क तिला आहे.

कळावें हा आशीर्वाद.

नवी दिल्ली, तुमचा,<br>
९-१०-४९ दादा

## रात्रीचा विमान-प्रवास

प्रिय ताई,

परवां दिल्लीहून निघण्यापूर्वी एक पत्र तुला पाठविलेंच आहे. दिल्लीहून रात्रीं ११-५० ला विमानानें रवाना झालों.

खिडकीजवळच्या जागा साऱ्या अरसिक लोकांनीं पटकावलेल्या होत्या. विमानांत बसल्याबरोबर हीं सारीं माणसें खुशाल पेंगायला लागलीं आणि लौकरच झोंपण्याच्या तयारीलाहि लागलीं. मग खिडकीजवळ बसायची हौस तरी कशाला? बाहेर अगदीं काळाकुट्ट अंधार होता; तरीपण डोळे मिटल्यानंतरच्या काळोखांत आणि डोळ्यांनीं दिसणाऱ्या अंधारांत फरक असतोच ना! डोळे मिटल्यानंतर दर्शनाचा अभाव असतो; डोळे उघडे ठेवल्यानंतर दिसणाऱ्या अंधारांतहि—अंधाराचेंच का होईना, पण—दर्शन असतें; आणि अंधाराचें दर्शन हें अज्ञानाच्या जाणिवेइतकेंच उपयोगी असतें. अंधाराचें दर्शन आणि अज्ञानाचा बोध यांत प्रकाशाचें तत्त्व अनुगत आहे. म्हणून खिडकीजवळ बसून अंधाराची गम्मत पहावी असें मनांत होतें. पण मनोरथांत बसून नेहमींच सहल करतां येत नाहीं. अंधार अगदीं स्पष्ट

दिसत होता. अगदीं आकाशव्यापी अनंत अंधार. पण हा 'अंधतम' किंवा अप्रकाश मात्र नव्हता. एखाद्या रहस्यवादी कवीच्या गूढ काव्यासारखा तो मनोवेधक वाटत होता. आमचें विमान मात्र अंधारांत चांचपडत नव्हतें. गूढवादी कवीच्या प्रतिभेप्रमाणें त्या दशदिशांना व्यापणाऱ्या अंधारांतून तें निश्चित वेगानें व निश्चित मार्गानें निश्चित मुक्कामाकडे चाललें होतें. देशाच्या आजच्या परिस्थितींत आपल्या पुढाऱ्यांनाहि अशीच निश्चित दृष्टि लाभली तर काय बहार होईल !

दिल्ली शहर मोठें नयनमनोहर दिसत होतें. शहर नव्हे; दिव्यांच्या वर्तुळाकार, अर्धवर्तुळाकार, लांबसडक, नागमोडी, धनुष्यकोन अशा अनंत प्रकारांच्या व आकृतींच्या रांगा त्या अंधःकाराच्या महासागरांत दिसत होत्या. सभोंवारच्या आकाशांतील ताऱ्यांपेक्षां खालच्या आकाशांतील हे तारे अधिक दैदीप्यमान दिसत होते. समुद्र अगदीं प्रशांत असतांना कार्तिक मासांत भाविक कुलांगनांनीं कौशल्यानें सोडून दिलेल्या दीपदानाच्या दिव्यांची आठवण मला झाली. त्या अंधारांत आपल्या नागपूरचे सारे दोष पोटांत घालण्याची शक्ति असल्यामुळें दिल्लीइतकेंच नागपूरहि नयनमनोहर दिसत होतें. अंधारांत साऱ्या शहरांतील भेद पार गडप होऊन जातात. एक प्रकारचें अभावात्मक ऐक्य भासूं लागतें. अमावास्यादेखील पूर्णिमेइतकीच रम्य असते. अंधाराचेंहि सौंदर्य पाहण्याची दृष्टि लाभली म्हणजे विषम प्रसंगांतहि आशेची प्रभा दिसूं लागते. ही दृष्टि तुझ्या दादाला लाभेल का ?

तीनच तासांचा हवाई प्रवास होता. मौज वाटली. थंडी भयंकर होती. पण थंडी आणि अंधार यांचें साम्राज्य बाहेर होतें. आणि आंत थंडीनें सुखावह वाटणारी ऊब व अंधःकारामुळें कमी तीव्र भासणाऱ्या प्रकाशाचा गोडवा होता. बाहेर अनियंत्रित निसर्ग, आंत सुनियंत्रित कला. त्या घनदाट अंधःकारांत त्याच्याहिपेक्षां काळे ढग आयुष्यांतील समस्यांप्रमाणें दृष्टीपुढें तरंगतांना दिसत. सर्वत्र पसरलेल्या काळोखांत हे आणखी काळे ढग असल्यामुळें तो काळोख कमी निबिड वाटत होता. आयुष्यांत समस्या आल्या म्हणजे एकंदर आयुष्य समस्येसारखें वाटेनासें होतें. अंधारांत देखील केवढा भव्य आशय भरलेला आहे नाहीं ? अशा रीतीनें त्या अफाट अंधःकारांत

तरंगत असतांना कोणाची आठवण झाली असेल सांग पाहूं ? तूं म्हणाली होतीस ना कीं विमानाच्या प्रवासाचा अनुभव नाहीं म्हणून ?

विमानांतून रात्रीं प्रवासाचा अनुभव घडावा अशी योजना नव्हती. माझ्या आयुष्यांत एकंदरींत योजनेचा भाग कमीच. त्रास, कष्ट व दुष्कृत्यें यांच्या बाबतींत टाळण्याचें धोरण पाळतों. भोग, मौज व कर्तव्य यांच्या बाबतींत 'अयाचित' वृत्तीनें वागतों. मिळेल तो भाग स्वीकारावा पण मानवेल त्यापेक्षां अधिक घेऊं नये. 'उदरपात्र' असावें. पोटांत मावेल तेवढेंच आणि मानवेल तेंच घ्यावें. त्यामुळें हळहळ, मळमळ व हावरेपणा यांची बाधा होत नाहीं. हिंदु कोडावर भाषण करण्याची फार इच्छा होती. अध्यक्षांकडे दोनदां चिठ्ठी पाठविली, चारदां उभा झालों; पण माझ्याकडे 'दृष्टिक्षेप' करण्याची त्यांना गरज वाटली नाहीं. त्या न केलेल्या व्याख्यानानेंहि माझें समाधानच झालें.

जो तो तुझ्या प्रकृतीची चवकशी मोठ्या आस्थेनें करतो; हकीगत ऐकून खिन्न होतो; पण हताश कोणीच होत नाहीं. अगदीं अमावास्येच्या अंधारांतहि विमान बिनचूक मार्गानें चाललेंच कीं नाहीं ?

कळावें, हा आशीर्वाद.

धनतोली, नागपूर. तुझा,
१७-१२-४९ दादा

# प्रेमाबाईच्या आश्रमांत

प्रिय बच्चू,

माझें परवांचें कार्ड पोंचलेंच असेल. परवां सकाळीं आम्ही १० च्या मोटारनें येथून निघालों आणि १०-५० ला सासवडला पोंचलों. भवानीपेठ मोटार स्टँडवर आम्ही बरोबर आठ वाजतां गेलों. दोन तास नुसतीच प्रतीक्षा करावी लागली. तरी आमच्या बाबतींत मोटारच्या एजंटाची अगदीं खास मेहरनजर होती. नाहींतर आणखी तिष्ठत बसावें लागलें असतें.

रस्ता एकंदरींत फारसा रम्य नाहीं. नाहीं म्हणायला आपल्या नागपूर-वऱ्हाडच्या मानानें या भागात हिरवळ थोडी जास्त आहे. खुद्द नागपूरला हिरवळ कांहीं कमी नाहीं. हजारों पहाडांवरून नागपूरचें दृश्य पाहिल्यास सारें शहर झाडांचेंच असावें असा भास होतो. तरीपण एकंदरींत हा प्रदेश त्या मानानें कमी रुक्ष. पण डोंगर मात्र थेट मराठी थाटाचे. उघडे, बोडके, रखरखीत, खरे खडतर ! पुणें-सासवड हा भाग इतिहासप्रसिद्ध आहे. तल-वारबहाद्दर मराठ्यांच्या पराक्रमाची, मर्द मावळ्यांच्या समरकर्मांची, आणि मराठी मुत्सद्यांच्या बुद्धिकौशल्याच्या करामतीची ही रंगभूमि ! सासवड तर पडक्या व पडायला आलेल्या साध्यासुध्या पेण भक्कम वाड्यां-चेंच गांव आहे. प्रसिद्ध मराठी मुत्सद्दी सखाराम बापू यांचाहि वाडा येथें आहे. तेव्हां मराठी मुत्सद्यांच्या डोक्यांप्रमाणें सासवडच्या घाटालाहि कावे असावेत हें स्वाभाविकच नाहीं काय ? हे कावे फिरकीच्या जिन्याप्रमाणें अगदीं वाटोळे नाहींत-नागमोडी वळणाचे आहेत त्यामुळें घाट वनश्रीहीन असला तरी सौंदर्यहीन नाहीं. यतिराज कामतसाहेबांच्या मोटारसारथ्याची या घाटांत गमतीची परीक्षा झाली असती !

एकंदर प्रदेशाप्रमाणेंच प्रेमाबाईच्या आश्रमाचें निवासस्थानहि प्रेमा-बाईंच्या शीलाला शोभण्यासारखेंच आहे. त्यांचा आश्रम एका जुन्या व भव्य वाड्यांत आहे. अगदीं स्मशानवासी शंकराला शोभण्यासारखा वाडा ! पण तो अगदीं स्वच्छ ठेवला जातो. प्रेमाबाईंच्या वृत्तीची भव्यता, शुचिता व स्वच्छता त्या वाड्यांत जणूं उमटलेली दिसते. त्याच्या साधेपणावर त्यांच्या

कडक वैराग्यवृत्तीची छाप असली तरी कठोरतेची छटा मात्र दिसत नाहीं. शिस्त आहे, कडकपणा आहे, पण नीटनेटकेपणाहि आहे. तूं म्हणशील प्रेमाबाई आणि नीटनेटकेपणा ? पण मी म्हणतों तें अक्षरशः खरें आहे. शृंगारपटु बाईला शोभणारा नट्टापट्टा किंवा छानछुकीची टापटीप तेथें नाहीं, पण नीटनेटकेपणा आहे. प्रेमाबाईंची प्रखर तेजस्विता हें त्यांचें वज्रकवच आहे. त्याचे खालीं त्यांचें मानवप्रेमानें भरलेलें हृदय आहे. त्यांच्या बाबतींत हा स्नेह व्यक्तिनिष्ठ नाहीं; म्हणूनच तो त्यांच्या व्रतनिष्ठेला पोषक ठरतो. शिबिरांतील स्त्रियांना त्यांचा आधार वाटतो. त्यांच्याविषयीं प्रेम, आदर वाटतो. आणि वचकहि वाटतो. अशी ही शिबिराची प्रखर तत्त्वनिष्ठ संचालिक आहे. तिला जनसंग्रहाची कलाहि त्याचमुळें चांगली साधते. सासवडच्या घाटासारखे कावे त्यांच्या बुद्धीला नाहींत किंवा त्यांच्या स्वभावाला तशीं नागमोडी वळणेंहि नाहींत. बुद्धि स्वभावाप्रमाणेंच तल्लख आहे, पण सरळ आहे. तेजस्वितेंत आतिथ्याचा सुगंध आहे.

आम्ही आश्रमांत ता. २७ ला ११ वाजतां पोंचलों. आणि आज १२-४५ ला तेथून निघालों. इतक्या अवधींत मी सुमारें दहा तास बडबड केली असेल ! ता. २७ ला दुपारीं ३ ते ५, पुन्हां रात्रीं प्रार्थनेनंतर तासभर; ता. २८ ला सकाळीं ९ ते ११, दुपारीं ३ ते ४-३०, पुन्हां संध्याकाळीं फिरण्याच्या वेळीं सुमारें अर्धा तास, आणि रात्रीं प्रार्थनेनंतर पाऊण तास; आज सकाळीं पुन्हां दोन तास. अगदीं कान किटून गेले असतील त्या बापड्यांचे. मला त्यांची दया येत असे. पण तिकीट घेऊन सिनेमाला गेल्यानंतर फिल्म रद्द असली, झोंपेचें खोबरें होत असलें, डोळ्यांवर ताण पडत असला तरी पैसे वसूल करण्याकरितां शेवटपर्यंत बसून राहणें हें पवित्र कर्तव्यच नाहीं का ? म्हणून मीहि आपल्या कर्तव्यबुद्धीला जागलों. आणि अगदीं ओ येईपर्यंत कंटाळवाणीं भाषणें त्यांच्या डोक्यांत कोंबलीं ! आवाज मुळींच लागला नाहीं. वाक्यें ठसठशीत व रेखीव उतरलीं नाहींत. भाषाहि नेहमीसारखी सुबोध, शानदार व ओघवती आली नाहीं. ती वृत्तीच आली नाहीं. तीन वर्ग स्त्रियांच्या प्रश्नाला दिले आणि तीन हिंदु-मुसलमानांच्या प्रश्नाला.

भाई आज ११ ला सासवडला आले. त्यांचा आणि माझा स्नेहसंबंध

प्रसिद्धच आहे. त्यांची भेदक व विदारक बुद्धिमत्ता, अविचल निष्ठा, करारी व बाणेदार वृत्ति, कर्तृत्वशक्ति व कार्यनिष्ठा इत्यादि गुणांविषयीं मला फार आदर वाटत असतो. वजाजवाडींत धोत्रे-धर्माधिकारी यांची दुक्कल टीकेच्या व कौतुकाचाहि विषय होती. अण्णा सहस्रबुद्धे आल्यानंतर आमचें त्रिकूट झालें होतें. १९१५ सालीं मी भाईबरोबर पुण्यामुंबईकडे आलों होतों. त्याच वेळीं त्यांच्याबरोबर सासवडलाहि गेलों होतों. भाईंच्या ठिकाणीं निर्दोष रसिकता व विनोदप्रियता भरपूर आहे. ते आपल्या सुरेल व ठसकेदार आवाजांत गद्य किंवा पद्य वाचून दाखवूं लागले म्हणजे माणूस अगदीं गार होतो. भाई सासवडला अगोदर आले असते तर सासवडला वेळ मजेंत गेला असता, फार दिवसांनीं त्यांचा सहवास घडला असता. मला तेथें जरा एकटेंच वाटत होतें, परिचय कोणाशींच नव्हता. प्रेमाबाई नित्य कार्यमग्न व कार्यरत. नाहीं म्हणायला बोरडीचे मुकुंदराव सावे, चिंतामणशास्त्री जोशी ही मंडळी होती. पण अजून त्या मंडळींत फारसा मिसळलों नव्हतों. काल फिरतांना कांहीं भगिनींचा थोडासा परिचय झाला. थोडीफार चर्चाहि झाली. एकंदर शिबिरांत आलेल्या स्त्रिया निष्ठावान्, जागरूक, जिज्ञासु व सुबुद्ध दिसल्या! आपण ली हंटबरोबर 'May their tribe increase'–त्याची 'बिरादरी' वाढो–अशी प्रार्थना करूं या! कांहीं प्रौढ वयाच्या स्त्रियांच्या कर्तृत्वाची हकीकत ऐकून फार समाधान वाटलें.

आज दुपारीं एकला निघून दोनला येथें आलों. नागपूरच्या मानानें येथें व सासवडला उन्हाळा नसल्यासारखाच आहे. उन्ह देखील मिळमिळीत, मुर्दाड! रात्रीं तर आम्हीं अगदीं खुशाल खोलींतच झोंपतों आणि वर पुन्हां उत्तर रात्रीं पांघरूण घेतों. उद्यां व परवां पुण्यालाच राहूं. नंतर एक दिवस माथेरानला जाऊन येऊं म्हणतों. पुढें साधल्यास मुंबई, नाशिक, त्र्यंबक आणि परत. पण हा फक्त विचार आहे. निश्चित कार्यक्रम नव्हे.

पुणें,
२९-५-४७

तुझा,
**दादा**

# कॉंग्रेसनिष्ठ तरुणांच्या संघटना

प्रिय . . .

तुमचीं दोन्ही पत्रें काल एकदम पोंचलीं. आधीं कामाच्या गोष्टी लिहून टाकतों. नंतर वैयक्तिक बाबी.

वयपरत्वें सभासमारंभांच्या बाबतींत माझ्या वृत्तींत फरक पडला असेल. परिषदा व संमेलनें भरवायला जो खटाटोप व यातायात करावी लागते ती करण्याची धमक अंगीं नसल्यामुळेंहि एक प्रकारची अप्रवृत्ति त्या बाबतींत असेल. हीं सारीं कारणें सूक्ष्म रूपानें माझ्या वृत्तीच्या मुळाशीं नसतीलच असें नाहीं. पण प्रचाराच्या दृष्टीनें सामुदायिक लोकमत संघटित करणें किंवा लोकांमध्यें आपलें वजन वाढविणें असे दोनच उपयोग आज सभा-संमेलनें व परिषदा यांसारख्या प्रवृत्तीचे होऊं शकतात असें मला वाटतें तुम्हांला स्वतःचें महत्त्व वाढवावयाची बुद्धि नसावी असें मी मानतों तेव्हां तरुणांचें मन संघटित करावयाचें हा एकच उद्देश तुमच्या मनांत असूं शकतो.

आज अनेक राजकीय पक्ष आहेत. त्या सर्वांचीं तरुणांकरितां निरनिराळीं संघटनें आहेत. त्यांच्यासमोर निश्चित उद्देश, निश्चित धोरण व निश्चित कार्यक्रम आहेत. त्यामुळें त्यांचें काम सुरळीतपणें व अव्याहतपणें चालू शकतें.

इतर कांहीं स्वतंत्र संघटनेंहि आहेत. त्यांच्यांत एकवाक्यता नाहीं तीं सारीं कमीअधिक प्रमाणांत कॉंग्रेसनिष्ठ आहेत. पण त्यांच्यासमोर निश्चित ध्येय, धोरण व कार्यक्रम नसल्यामुळें त्यांच्या चळवळीला कांहीं मुद्दा नाहीं. कोठेंच टोंक नाहीं. अणकुची नाहीं. या अभावात्मक परिस्थितीचें पर्यवसान परस्पर अविश्वासांत व वायफळ विवादांत होतें. अशा परिस्थितींत परिषदा व संमेलनें यांपासून कांहीं फलनिष्पत्ति होईल असें मला वाटत नाहीं. तुम्ही एकत्र जमून काय ठरविणार, काय करणार, हें तुमच्या मनांत अगदीं स्पष्ट आहे का ? तरुणांवर कोणाची 'पकड' असावी हा मुद्दा महत्त्वाचा नाहीं; तरुणांवर कशाची पकड असावी हा मुद्दा महत्त्वाचा आहे. विचारांच्या अस्पष्टतेची व बौद्धिक अनिष्ठेची घनदाट छाया मला सर्वत्र पसरलेली दिसत आहे.

मुख्य प्रश्न निष्ठेच्या दृढतेचा व असंदिग्धतेचा आहे. पुढील हिंदुस्थानचें

चित्र डोळ्यापुढें स्पष्ट पाहिजे. त्याच्या साधनांचाहि मनांत निश्चय पाहिजे. मग त्यांत विकल्प उत्पन्न होतां कामा नये.

तरुणांच्या, विद्यार्थ्यांच्या, किसान–कामगारांच्या कांहीं संस्था आपल्या हातीं घेऊन व हातीं ठेवून काम पुढें चालविलें पाहिजे असा तुमचा विश्वास दिसतो. कांहीं ठिकाणीं काँग्रेस संस्थेच्या कामांतहि सक्रिय लक्ष घालण्याचें धोरण तुम्ही स्वीकारलेलें आहे. आणि हें सारें तुम्ही स्वयंप्रेरणेनें व आत्म-प्रत्ययानें केलेलें आहे. या सर्व संस्थांच्या तंत्राच्या मर्यादा अर्थातच, अल्प-प्रमाणांतच का होईना, तुम्हांला पत्कराव्या लागल्या आहेत. तुमचा आवेश, उत्साह व तारुण्योचित अस्वस्थता यांना कोठें तरी वाव मिळायलाच हवा होता. तुम्ही जें केलेंत त्यांत अस्वाभाविक किंवा गैर असें कांहींच नाहीं.

पण यांत मी कोठें बसतों हें मला कळत नाहीं. तुम्हांला प्रेरणा माझ्या-पासून मिळाली असेल. माझ्या विचारांपैकीं तुम्ही जे विचार आत्मसात् केले त्यांच्याप्रमाणें तुम्ही अगदीं प्रामाणिकपणें वागत असाल. पण हा सारा पुरुषार्थ, ही सारी प्रवृत्ति, तुमची स्वयंप्रेरित व स्वायत्त आहे हें तुम्हांला भूषणावह आहे.

मी फक्त विचार करूं शकतों व विचारप्रदान करूं शकतों. नेतृत्व माझ्या ठिकाणीं नाहीं. हा एका दृष्टीनें जसा माझा मूलभूत दोष आहे, तसाच दुसऱ्या दृष्टीनें मूलभूत गुणहि आहे. माझ्या ठिकाणीं नेतृत्व असतें तर तुमची संस्था माझें उपकरण झाली असती, माझें धोरण, माझ्या कार्य-योजना, माझें राजकारण सारें कांहीं तुम्हांला अमलांत आणावें लागलें असतें. मीं तुम्हांला त्यापासून अलिप्त ठेवलें, तुमच्यावर नेतृत्व न लादतां तुम्हांला आपला उपयोग करूं दिला. मला वाटतें, मी पितृत्वाची जबाबदारी पार पाडली. आणि त्याची मर्यादाहि संभाळली. तुमच्या स्वतंत्र संसारांत ढवळाढवळ न करितां आपल्या मगदुराप्रमाणें मदत केली. आजहि माझी तीच भूमिका आहे.

काँग्रेसशीं किंवा इतर कुठल्याहि संस्थेशीं संबद्ध व्हायचें नाहीं असें धोरण तुम्ही स्वीकारलें. तें पाळायला तुम्हांला मी आपल्या परीनें मदत केली. आजहि तुम्ही स्वतंत्र आहांत. यांत परकेपणा कोठें आहे? यांत स्वतंत्र कर्तृत्वाला वाव आहे. माझें पितृत्वहि तुमचें स्नेहार्जित व स्वायत्त आहे.

नैसर्गिक पितृत्वासारखें तें कांहीं अनिराकरणीय नाहीं. तें कायम ठेवणें सर्वस्वीं तुमच्या मर्जीवर अवलंबून आहे. मी तुमचा इन्कार केलेला नाहीं, करणार नाहीं. तुम्ही स्वतंत्र बाण्याचीं कर्तीसवरतीं मुलें आहांत, इतकेंच मी मानतों. तुमचें स्वातंत्र्य हिरावूं इच्छित नाहीं, स्वतःचेंहि गमावण्याची वृत्ति नाहीं. मला वाटतें, यांत पोरकेपणा कोठेंच नाहीं. उलट स्वातंत्र्यपोषक वात्सल्याचा गोडवा आहे. तुमच्याविषयींचा माझ्या मनांतील जिव्हाळा व कौतुक यत्किंचित्‌हि कमी झालेलें नाहीं. माझ्या शरीराच्या रोमरोमांतून तुमच्या कल्याणाकरितां प्रार्थना सतत निघते.

घरांतहि मी हीच मर्यादा पाळतों. मुलें काय करतात याची चवकशी करीत नाहीं. त्यांना सल्ला हवा असल्यास, मदत लागल्यास, गैर कांहीं नसलें तर मदतहि देतों. एरव्हीं सल्ला देतों. त्यांनीं म्हटलें कीं तुमच्या ब्रीदाला बट्टा लावण्यासारखें कांहीं करणार नाहीं, तर विश्वास ठेवतों. पण त्यांच्या उद्योगांत मदत करतोंच असें नाहीं. पण ही झाली सामान्य संसारांतील नीति. तुमचा व माझा संबंध व्यावहारिक नाहीं. निराळ्या भूमिकेवरील आहे. हृदयाचा व बुद्धीचा आहे. म्हणून तुमच्यावर अधिक विश्वास टाकतों. तुम्ही म्हटलें कीं, 'तुमच्या तत्त्वाला बाध येण्यासारखें आम्ही कांहीं करणार नाहीं' तर एकदम विश्वास ठेवतों. मतभेद किंवा कृतिभेद दिसून आला तरी तुम्ही आपल्या समजुतीप्रमाणें प्रामाणिकपणें योग्य तेंच करीत असाल इतका विश्वास ठेवतों. तुमचीं हृदयें माझ्यापेक्षां अधिक ताजीं, शुद्ध आणि उत्साही असल्यामुळें कदाचित् माझीच मति मलिन झाली असेल किंवा विरली असेल अशीहि प्रामाणिक शंका मनाला शिवून जाते. तुमच्या भावनेवर व अंतःकरणप्रवृत्तीवर इतका अलोट विश्वास ठेवतों. त्यामुळें मी तुम्हांला अंतर देईन असें मुळींच मानण्याचें कारण नाहीं. याचा अर्थ नेहमीं तुमच्या कला-प्रमाणें वागेन असा मात्र नाहीं. मी आपलें मत लादणार नाहीं एवढें मात्र खास.

आतांपर्यंतच्या अनुभवावरून एक गोष्ट ध्यानांत आली आहे. मुलांना वाटतें कीं आपण जें करतों त्याला जर बापानें पाठिंबा दिला नाहीं तर तो आपल्या कर्तव्याला चुकला. बरोबरीच्या सोबत्यांना वाटतें कीं आपल्या पुढाऱ्यानें शक्ति स्वतःची वापरावी आणि अक्कल आमची वापरावी. माझा आग्रह इतकाच असतो कीं मलाहि माझी अक्कल थोडी थोडी वापरूं द्यावी

म्हणजे ती वाढेल. तुम्हांला जें असें वाटतें कीं तुम्ही एकटे आहांत, तुमच्याकडे कुणाचें लक्ष नाहीं, तें बरोबर नाहीं. तुम्ही आपल्या कार्याचा व्याप जितका वाढवाल आणि जितकी गुंतागुंत वाढवाल तितकी धमक तुमच्या अंगीं आहे. असें मी धरून चालतों. म्हणून तुमच्या आड न येतां मी आपल्या शक्तीच्या व विवेकाच्या मर्यादेंत तुम्हांला बिनदिक्कत मदत करायला तत्पर असतों.

या देशांत अलीकडे संस्था इतक्या वाढूं लागल्या आहेत कीं मला बरीच धास्ती वाटूं लागली आहे. सुदैवानें त्यांच्यापैकीं फार थोड्या संस्था प्रत्यक्ष कार्य करतात म्हणून खैर आहे. सर्वच पक्षांना देवानें कार्यप्रवृत्त होण्याची दुर्बुद्धि दिली तर जीवनाच्या दरेक क्षेत्रांत किती अखिल भारतीय कुरुक्षेत्रें निर्माण होतील याचें चित्र डोळ्यांपुढें उभें राहिलें म्हणजे घेरी येते. दरेक संस्थेच्या कार्यक्रमांत आदिवासीयांची उन्नति व लिपिसुधारणा यासारख्या सांस्कृतिक कार्यक्रमापासून तों दिल्लीचें तक्त काबीज करण्यापर्यंतचे सारे कार्यक्रम प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें समाविष्ट असतात. या सर्व संस्था जर खरोखर अविरोधी भावानें काम करूं लागल्या तर एकेकीच्या वांट्याला एकेक गांवदेखील येणार नाहीं. आणि इतकें अल्पक्षेत्र मिळाल्यावरहि जर कार्यस्फूर्ति शिल्लक राहिली तर सगळ्या देशाचा उद्धार हां हां म्हणतां होईल. एकाच ध्येयाच्या व धोरणाच्या अनेक संस्था एकाच क्षेत्रांत कार्य करीत असलेल्या आढळतात. त्या परस्परपोषक होण्याऐवजीं त्यांच्यामध्यें स्पर्धा व एकमेकींचा पाडाव करण्याची वृत्ति अधिक दिसून येते. अशा स्थितींत जर त्या एकमेकींच्या वाटेला न जातां काम करूं लागल्या तर एकेक लहानसें खाचर घेऊन संस्थानिकाची ऐट मिरविणाऱ्या लुटूपुटीच्या संस्थानिकांसारखी त्यांची स्थिति होईल. म्हणून संस्थाविसर्जनाचा कार्यक्रम हा मला एक महत्त्वाचा कार्यक्रम वाटतो.

माझ्यापुरता मी तो पाळला आहे. आपल्या प्रांतांत मी निव्वळ एक व्यक्ति होतों आणि व्यक्तीच आहें हें तुम्हांला माहीत आहे. मी कुठल्याहि संस्थेचा किंवा पक्षाचा प्रतिनिधी मानला गेलों नाहीं. माझें धोरण पुष्कळसें व्यक्तिनिष्ठच होतें आणि आहे. कुठल्याहि राजकारणाच्या किंवा इतर कार्याच्या दृष्टीनें माणसें गोळा करण्याचा उद्योग मी केलेला नाहीं. ही मर्यादा मी बुद्धिपूर्वक मानली व पाळली. राजकारणांत माणसाचें लक्ष

तात्पुरत्या कार्यसिद्धीकडे अधिक असतें. त्याला जीवनाच्या शाश्वत मूल्यां-पेक्षांहि तात्पुरत्या कार्यसाधक युक्तीचें व पवित्र्याचें महत्त्व अधिक वाटतें. शाश्वत स्नेहसंबंधांपेक्षां त्याला राजकीय ऋणानुबंधांची किंमत जास्त भासते. म्हणून त्यांच्या संघटनेंत हिरीरी असते, अभिनिवेश असतो. आणि तात्पुरती ताकदहि असते. माझी ती भूमिकाच नव्हे. म्हणून मी कुठल्याहि संस्थेशीं फार समरस कधीं होऊं शकलों नाहीं.

तुमच्यापुढें आपलें आत्मनिवेदन करण्याकरितां हें सारें लिहिलेलें नाहीं. त्यांत हेतु आहे. तुम्ही किती प्रमाणांत व कुठल्या मर्यादेंत माझ्या-पासून सक्रिय सहाय्यकाची अपेक्षा राखूं शकाल हें तुमच्या लक्षांत यावें या हेतूनें इतकी लांबण लांवली आहे. तुमच्या परिषदेला हजर राहण्याची व तुम्हांला जी जी मदत लागेल, अर्थात् सल्लामसलत व विचार यांच्या रूपानें, ती सर्व करण्याची माझी तयारी आहे. फक्त कुठल्याहि संस्थेशीं किंवा चळवळीशीं माझें नांव संबद्ध व्हावें इतकें मला नको आहे.

या पाळीला तब्येतीनें बराच त्रास दिला हें खरें आहे. शरीर आपल्याला प्रिय आहे त्या अर्थी त्याचाहि थोडाफार जुलूम सहन केलाच पाहिजे. मीं शरीराला कधीं तुच्छ मानीत नाहीं. आणि जगणें मला आवडतें हें तुम्हांला माहीत आहे. तेव्हां माझी वृत्ति मरणोन्मुख होणें शक्य नाहीं. शरीराची शक्य ती सर्व निगा राखतों. तुमच्यापैकीं कुणी यऊन आणखी काय करणार आहे? मला शुश्रुषेची गरज नाहीं. लागेल ती मदत करायला श्रीपाद आहेतच. तुमचा जिव्हाळा व तुमची आस्था या दोन रसायनांचा उपयोग नेहमींच होतो. तेव्हां तुम्ही काळजी करूं नये. शरीर शाबूत ठेवण्याचा प्रयत्न करीन.

तुम्ही आपली प्रकृति अवश्य संभाळा. तुमच्यांत माझा जीव गुंतलेला असतो. तुमच्या साऱ्या शुभाकांक्षा, सदुत्साह व पराक्रमाची हौस यांची मला मनापासून कदर वाटते.

आणखी काय लिहूं? पुष्कळच लिहिलें. आतां आवरतों. कांहीं अधिक-आगळें असल्यास मनाला लावून घेऊं नये. आपुलकीच्या मोकळेपणानें लिहिलें आहे.

नवी दिल्ली स्नेहांकित,
११-९-४९ दादा
४ स्ने. झरे

# फक्त हेतु शुद्ध व उदात्त असणें पुरेस नाहीं

प्रिय....

श्री. . .यांचें व तुझें ता. ११–१०चें पत्र पोंचलें.

तुमच्या पत्रांत जीवनांतील रोजच्या व्यवहारांत समोर उभे राहणारे प्रश्न असतात. म्हणून त्या पत्रांचीं उत्तरें चटकन् देणें सोपें नसतें. त्यामुळें उत्तर द्यायला उशीर होत आहे, याबद्दल तुला वैषम्य वाटणार नाही अशी आशा आहे. तुमच्या पत्रांचीं उत्तरें द्यायला उशीर लागला तरी त्यांतील कामांच्या बाबतींत जें काय करणें शक्य असतें तें. मी ताबडतोब करीत असतों. इतरांच्या प्रयत्नांना जसें यश येतें तसें व त्या प्रमाणांत माझ्या प्रयत्नांना येत नाहीं याला माझ्या स्वभावांतील दोष आणि माझ्या वृत्तीच्या मर्यादा कारण आहेत. त्या मर्यादा विचारपूर्वक स्वीकारलेल्या असल्यामुळें त्यांचें उल्लंघन करणें मला परवडणार नाहीं.

आज सहज गमतीखातर जुने उतारे चाळीत असतांना बर्नार्ड शॉचें खालील वाक्य आढळलें. 'लबाड माणसावर कोणीहि विश्वास ठेवीत नाहीं ही कांहीं त्याला होणारी खरी शिक्षा नव्हे. त्याला इतर कोणावर विश्वास ठेवतां येत नाहीं ही वास्तविक भयंकर शिक्षा आहे.' वाक्य अंतःकरणाला जाऊन भिडलें. संशय हा मनाला जडणारा अत्यंत दुर्धर व्याधि आहे. ज्याला तो जडला त्याच्या यातनांना सीमाच उरणार नाहीं. ज्याला कोणावरच विश्वास ठेवतां येत नाहीं त्याचें जीवन असह्यच होणार नाहीं का? जिकडे तिकडे त्याला संभाव्य मित्रांऐवजीं संभाव्य शत्रूच दिसतील, कोणाच्याच मांडीवर डोकें ठेवून निजण्याचें महद्भाग्य त्याला कधींच लाभत नाहीं. शत्रुत्वभावनेनें व्यापलेल्या या विश्वांत त्याला थारा नाहीं. सारें जीवनच एका प्रचंड विभीषिकेचें कराल रूप धारण करून त्याला खायला नाहीं का धावू लागणार? म्हणून माणसांवर विश्वास ठेवून प्राणास मुकण्याची तयारी ठेवणें श्रेयस्कर आहे असा माझ्या मनाचा निश्चय झालेला आहे.

तूं म्हणशील, हें 'तत्त्वज्ञान' आहे! 'पोकळ तत्त्वज्ञान' म्हणून माझें म्हणणें उडवून देतां येणार नाहीं. मागें एकदां 'केसरी' नें गांधी व टिळक

यांच्यांतील भेदाचें विवेचन केलें होतें. त्यांत केसरीकारांनीं असें म्हटलें होतें कीं "गांधींबद्दल त्यांच्या शत्रूंना संशय व धाक कधींच वाटला नाहीं, टिळकांचा मात्र त्यांना नेहमीं वहीम व वचक असे. शत्रूदेखील गांधींच्या मांडीवर डोकें ठेवून खुशाल निजूं शकत असे. पण टिळकांबद्दल मात्र त्याला अशी खात्री कधींच वाटली नसती." 'केसरी'नें टिळकांची प्रशंसा करण्याच्या हेतूनें हें सारें लिहिलें होतें. पण ज्या गांधींना व्यवहारशून्य, राजकारणविमुख, गैरवाकबगार मानण्यांत आलें, त्यानेंच दक्षिण आफ्रिकेंत व हिंदुस्थानांत अपूर्व राजकीय यश मिळवून दाखविलें. तेव्हां मी म्हणतों हें फक्त 'तत्त्वज्ञान' आहे, व्यवहारांत त्याचा कांहीं उपयोग नाहीं, असें म्हणूं नकोस. प्रामाणिकपणा, सरळपणा, औदार्य या गुणांचा नित्याच्या व्यवहारांत कांहींच उपयोग नसेल तर त्यांचा उपयोग आहे तरी कोठें? अरण्यांत हिंस्र श्वापदांशीं वागतांना किंवा निर्जन एकांतांत काळ कंठीत असतांना या गुणांना कांहीं अवसर तरी राहील ? हे सामाजिक गुण नित्य व्यवहारोपयोगी नसले तर ते हवेत तरी कशाला? राजकारणांत व व्यापारांतदेखील प्रामाणिकपणा, सचोटी व सौजन्य यांना स्थान आहे ही गांधींची शिकवण आपण आपल्या मगदुराप्रमाणे गिरविली पाहिजे असें मला वाटतें. माझी ही भूमिका मी सांगितल्यानंतरहि ज्यांना माझ्याबरोबर काम करावेंसें वाटतें, तीं माणसें माझ्या भूमिकेसह माझा अंगिकार करतात असें मी कां समजूं नये ?

फक्त हेतु शुद्ध व उदात्त असणें पुरेसें नाहीं. तो हेतु साध्य करून घेण्याचे मार्गहि चांगले व उदात्त असले पाहिजेत ही मर्यादा बापूंनीं घातलेली आहे. साधनशुद्धीची मर्यादा इतरांनीं स्वीकारली आहे किंवा नाहीं याचा विचार करण्याचें प्रयोजन आपल्याला नाहीं. आपण ती मर्यादा स्वखुषीनें व समजून संवरून स्वीकारलेली आहे. तेव्हां तिचें पालन करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. यांत यशापयशाचा विचार गौण आहे. गुंडगिरी, धाकदपटशा, दमदाटी व फसवेगिरी या उपायांची सरशी होत असलेली पाहून आपण आपली मर्यादा सोडतां कामा नये. या दृष्टीनें तुम्ही विचार करावा आणि या बाबतींत माझी संकल्पशक्ति व निष्ठा वाढविण्यास हातभार लावावा ही माझी अपेक्षा आहे. तुमच्या अंगीं माझ्यापेक्षां कर्तबगारी व

उत्कटता अधिक आहे. माझें म्हणणें जर तुमच्या गळीं उतरलें तर तुमच्या ठिकाणीं अचाट पराक्रमाची धमक असल्यामुळें तुम्ही लोक–जीवनांत हां हां म्हणतां क्रांति घडवून आणाल. माझ्या शक्तीचे जे मूलस्रोत आहेत ते कायम राहिले तर माझा तुम्हांला उपयोग होईल. ते झरेच जर आटले तर मी निष्प्राण व निःसत्त्व होईन.

तुमचा व माझा स्नेहसंबंध असल्यामुळें वरील मर्यादेंत मी तुमची शक्ति वाढविण्याचा प्रयत्न अवश्य करीन. त्याकरितां जी योजना व जें संघटन करावें लागेल तेंहि आपण करूं. वरिष्ठांकडून उसनें बल मिळवून उसनें जीवन जगणें मला कमीपणाचें वाटतें. आपण आपल्या बळावर टिकूं शकलों तर टिकूं, एरव्हीं नामशेष होऊं. त्यांत वावगें काय आहे ? स्वराज्य मिळविण्याच्या उद्योगांतच आम्ही कामास येऊं असें आम्हाला वाटत होतें. पण ईश्वरकृपेनें स्वराज्य मिळाल्यावरहि आम्ही जिवंत आहों हें अनपेक्षित आयुष्य देवाचा प्रसाद आहे. तेव्हां क्षुद्र कारणाकरितां त्याचा उपयोग होऊं नये अशी वृत्ति आहे. तुम्ही माझे सोबती व सहयोगी आहांत. माझा संभाळ जर तुम्ही न केलात तर एकाकी आणि असहाय मी काय करूं शकणार आहें बरें ?

माझा आणखी एक मोठा दोष आहे. मला माणसें आवडतात. त्यांच्या संगतीची व सहवासाची नित्य उत्कंठा असते. पण ज्या माणसांच्या भेटीला व्यावहारिक किंवा अवांतर महत्त्व असतें, त्यांची भेट घेण्याच्या बाबतींत मी फार भिडस्त आहें. तें काम मला मोठें जड वाटतें, अगदीं जिवावर येतें. म्हणून थोरामोठ्यांशीं माझा परिचय फारच अल्प आहे. त्यांच्याकडे जाण्यास मला संकोच वाटतो. थोर व सत्तारूढ माणसांची भेट घेण्याची व त्यांची मर्जी संपादन करण्याची कला ज्यांना साधलेली असते त्या दरबारी माणसांचे गुण माझ्या अंगीं नाहींत. म्हणून इतरांना जीं कामें सहज करवून घेतां येतात तीं मला करवून घेतां येत नाहींत. माणसाच्या भेटीचें जेथें स्नेहाव्यतिरिक्त दुसरें मूल्य असेल तेथें त्या भेटीचा मोह आवरणेंच मला इष्ट वाटतें. वृत्तीच्या इतक्या प्रतिकूलतेंतून मला गांठीभेटी घेण्याची मनाची तयारी करावी लागते. कर्तव्य म्हणून मी भेटी घेतों व भेटलों म्हणजे जरूर तेवढें सगळें स्पष्टपणानें बोलतोंहि. हा माझा स्वभाव नव्हे.

तुझा व माझा परिचय जरी राजकारणामुळें झालेला असला तरी आता तो राजकारणावर अवलंबून नाहीं. स्नेहाच्या बाबतींत मी व्यक्तिनिष्ठ होतों व आहें. तुला मी मुलगा मानलें ही गोष्ट व्यक्तिगत आहे. उद्यां तुझें राजकारण बदललें किंवा माझा तुम्हांला उपयोग उरला नाहीं तर तुम्ही भिन्न राजकीय गटांत जाल. पण त्यामुळें माझ्या स्नेहांत अंतर पडणार नाहीं.

स्नेहाकांक्षी,

**दादा**

## राजकारण हें असें आहे

१९–८–४९

प्रिय...

तुमचें खुल्या दिलाचें व स्नेहपूर्ण पत्र पोंचलें. त्यांत जिव्हाळा आहे, कळकळ आहे आणि मनमोकळेपणा आहे. मला तें फार आवडलें–अगदीं मनापासून ! कुढया, आंतल्या गांठीच्या व खवचट माणसापेक्षां मला प्रांजळ, खरीं खडतर व फटकळ माणसें आवडतात. त्यांच्या मनाचीं दारें मोकळीं असतात. म्हणूनच जेव्हां तुम्ही माझ्या अतिशय विरुद्ध होतां त्याहि वेळीं मी मनांतून तुमच्यावर कधींच रागावलों नाहीं.

मित्रत्वाच्या अधिकारानें कांहीं लिहिणें म्हणजे उपदेश करणें नव्हे. आणि मला उपदेश करण्याचा अधिकार तुमचा नाहीं असें कोण म्हणतो ? कांहीं गोष्टी मला कळतात. कांहीं तुम्हांला कळतात. तुम्ही नेहमीं निरक्षर व निर्धन अशा लोकांमध्यें राहतां व वावरतां. तुमचा अनुभव माझ्यापेक्षां मोठा व महत्त्वाचा आहे. म्हणून त्या बाबतींत मला धडे देण्याचा तुमचा हक्क आहे. तुमच्या मुलाला व बायकोला कांहीं गोष्टी तुमच्यापेक्षां जास्त समजतात. त्या बाबतींत तुम्हांला दोन गोष्टी सांगण्याचा त्यांना अधिकार आहे. माझ्यावरील तुमच्या स्नेहामुळें व विश्वासामुळेंच इतकें स्पष्ट लिहिलेंत ना ?

तुमच्या स्नेहाची व विश्वासाची कदर मला इतरांच्या स्नेहापेक्षां व विश्वासा-पेक्षां कमी नाहीं. उद्यां कांहीं कारणांमुळें पुन्हां तुम्ही मला विरोध करूं लागलांत तरी माझ्या व्यक्तिनिष्ठ स्वभावाला अनुसरून माझ्या मनांत किंतु येणार नाहीं.

एक शिक्षित शहाणपण असतें आणि एक अशिक्षित चातुर्य असतें. शिकलेल्या माणसाचें ज्ञान पुष्कळदां उसनें असतें; पुस्तकांतून घेतलेलें असल्यामुळें 'सेकंड हँड' असतें. आणि त्यामुळेंच पुष्कळदां निःसत्त्वहि असतें. अशिक्षितांच्या ज्ञानांत पॉलिश, चकाकी, भपका कमी असेल, पण कित्येकदां तें भरीव, वास्तविक आणि उपयुक्त असतें. म्हणून तुमच्या म्हणण्यांतलें तथ्य व सार यांचा मी अव्हेर करीन असें मनांत आणूं नका.

तुम्ही खुल्या दिलानें लिहिलेंत. मीहि आज मुळींच आडपडदा न ठेवतां आपली भूमिका प्रांजळपणानें आणि विनयानें सांगणार आहें.

लहानपणीं शाळेंत मी स्वतः उनाड किंवा व्रात्य नव्हतों. पण नेहमीं व्रात्य व उनाड मुलांच्याच संगतींत राहात असें. त्यांनीं माझी कधीं टिंगल केली नाहीं. त्यांच्यावर माझें वजन असे. मी त्यांच्या उमेदवारीवर व दिलदारी-वर फिदा असें.

त्यांच्याजवळून मी दिलदारी शिकलों. माणसांवर विश्वास ठेवण्याची हिम्मत माझ्यामध्यें भरपूर आहे. मला मुत्सद्याचा सावधपणा व हिशोबी-पणा रुचत नाहीं. जोखीम पत्करूनहि मी माणसांवर विश्वास टाकतों.

पण याला दुसरीहि बाजू आहे. त्यामुळेंच मला कुठल्याहि माणसाबद्दल वैर वाटत नाहीं. आजचा विरोधक उद्यांचा सहाय्यक होऊं शकतो या निष्ठेनें मी वागतों. माणूस आपल्या मित्रांशीं कसा वागतो यांत त्याची परीक्षा नाहीं. तो आपल्या प्रतिपक्षीयांशीं कसा वागतो यांतच त्याच्या सौजन्याची कसोटी आहे. मी जीवेंभावें मैत्री करूं शकतों, पण मनःपूर्वक द्वेष करूं शकत नाहीं. जो आपल्या प्रतिपक्षीयांना मनांतून हलकट, दगलबाज व दुष्ट मानीत असेल तो त्यांच्याशीं मनःपूर्वक समेट करूंच शकत नाहीं. म्हणून आपण तेवढे भले आणि आपले प्रतिपक्षी सारे बुरे अशी वृत्ति माझ्या ठिकाणीं उत्पन्न होत नाहीं. आणि क्वचित् प्रसंगीं झाली तरी ती टिकत नाहीं. त्याचमुळें तुम्ही माझ्याविरुद्ध होतां तेव्हां तुमच्याविषयीं माझ्या मनांत द्वेष उत्पन्न झाला नाहीं

आणि तुमचा नायनाट व्हावा अशी दुष्ट बुद्धि देवानें मला होऊं दिली नाहीं· आज जे माझ्याविरुद्ध आहेत त्यांच्याविषयींहि माझी हीच वृत्ति व दानत आहे म्हणून तुम्हाला माझ्या विरोधांत पुरेशी तीव्रता व जोम भासत नाहीं.

हा राजकारणी माणसाचा स्वभाव नव्हे हें मी जाणतों. राजकारणी माणसाचें मित्रत्वहि प्रखर व उत्कट असावें लागतें आणि शत्रुत्वहि तितकेंच तीव्र व मनापासूनचें असावें लागतें. मित्रांची पाठ राखणें व प्रतिपक्षीयांना नामोहरम करणें हीच त्याची नीति असते. पण मी तर आजच्या प्रतिपक्षीयांना उद्यांचे मित्र मानणारा पडलों त्यामुळें मला मैत्री मनःपूर्वक करतां येते पण हिरीरीनें द्वेष करता येत नाहीं. माझ्या प्रकृतींतच हा दोष आहे. त्याला माझा नाइलाज आहे. तुम्हांला माझ्या वर्तनांत ज्या उणीवा भासतात त्यांचें मूळ माझ्या या स्वभावदोषांत आहे.

मी माणसाला मदत निरपेक्ष बुद्धीनें करीत असतों. माणसें जोडण्याच्या हेतूनें मी त्यांना मदत करीत नाहीं. त्यांत माणुसकीचा उपमर्द आहे. गरजवंताच्या गरजेचा फायदा घेण्याची वृत्ति माणुसकीला शोभत नाहीं. म्हणून मदत करितांना मी माणसामाणसांमध्यें फार फरक करीत नाहीं. ज्या माणसांना मी ओळखतों किंवा जीं माणसें माझ्याबरोबर राहतात त्यांच्याविषयीं मला माहिती व खात्री असते. त्यामुळें त्यांच्याकडे माझा साहजिकच कल असतो. त्यांच्या बाबतींत मी जाणूनबुजून पक्षपातहि करतों.

एका मर्यादेपलीकडे मी माझ्या विवेकावर दुसऱ्याच्या भीडमुर्वतीचें दडपण पडूं देत नाहीं. म्हणूनच दुसऱ्याला गळ घालतांना किंवा भीड घालतांना त्याच्या विवेकबुद्धीवर आक्रमण होऊं नये याची मी काळजी घेतों. त्यामुळें मी कितीहि कळकळीचा प्रयत्न केला तरी कांहीं कामें होतात आणि कांहीं होत नाहीत.

याचा एक परिणाम आणखी होतो. जीं माणसें इतरांचीं कामें बिनदिक्कत करून देतात तीच माणसें माझ्यावर आपल्या खरेपणाची छाप पाडण्याकरितां माझ्या समोर नैतिकतेचा व सार्वजनिक जीवनाच्या पावित्र्याचा आव आणतात. माझ्यावर छापबीप नाहीं पडत; पण मी निरुत्तर मात्र होतों. माझीं कामें कां होत नाहींत याचें हें रहस्य आहे.

कामें झाल्यामुळें जीं माणसें जवळ येतात त्यांचीं नऊ कामें झालीं आणि

दहावें न झालें तरी तीं फुटून निघतील. अशा रीतीनें जनसंग्रह करणें मला साधलेंहि नाहीं आणि आवडलेंहि नाहीं. आपल्या माणसांना संभाळावें, त्यांना मदत करावी, त्यांच्याकरितां तुटून पडावें हें मला कळतें. पण सार्वजनिक जीवनाच्या मर्यादा संभाळून जर हें सारें केलें तरच सार्वजनिक जीवन शक्य होईल; एरव्ही नाहीं.

मी उच्च पातळीवरून बोलतों हा सवंग आक्षेप कृपा करून तुम्ही करूं नका. मी तुम्हांला आपल्या बरोबरीचे मानतों. माणसें या नात्यानें आपली पातळी समान आहे. फक्त संस्कारांमुळें वागणूकींत फरक दिसतो. हें मी वरपांगी बोलत नाहीं. माझी तशी श्रद्धा आहे.

या सर्व कारणांमुळें मी राजकीय नेतृत्वाला नालायक कसा आहे हें तुमच्या लक्षांत येईल. म्हणून माझ्या धोरणांतहि प्रभावक्षमता आणि क्षिप्र परिणामकारकता येत नाहीं. माझ्या प्रतिपक्षीयांत जो आवेश, झुंझारपणा व पक्षाभिनिवेश आहे तो माझ्या ठिकाणीं नाहीं. मला तो नकोहि आहे.

आश्वासनांच्या बाबतींत तुमचा इषारा अगदीं योग्य आहे. मी काम करून देण्याचें आश्वासन कोणालाच देत नसतों प्रयत्न करण्याचेंच आश्वासन देत असतों. तरीपण आपलें काम होईलच असा ग्रह लोकांचा होतो. त्यामुळें त्यांची निराशाहि होते. या बाबतींत मी अधिक काळजी घेईन. करीन त्यापेक्षां कमी बोलेन.

माझ्या स्वभावामुळें व शक्तीच्या मर्यादेमुळें तुमची कुचंबणा होते व तुम्हांला त्रास होतो, याची मला जाणीव आहे. तुम्ही आपुलकीनें व मोकळ्या मनानें वेळोवेळीं मला सावध केलें, तर मी सुधारण्याचाहि प्रामाणिकपणानें प्रयत्न करीन. मला तें न साधलें तरी तुझ्या स्नेहाचें मी चीजच करीन. कळावें, हा नमस्कार.

स्नेहाकांक्षी,

**दादा**

# सत्ता व मान्यता यांचा स्वभाव

२७-८-४९

स. न. वि. वि.

तुमचें पत्र पोंचलें. मलाच पत्र लिहिण्याचें तुमच्या मनांत आलें यांत तुम्ही नकळत माझा बहुमान केला. स्वत:च्या गतायुष्याचा पुढील आयुष्यांत सुधारणा किंवा परिवर्तन करण्याच्या दृष्टीनें विचार करणें फार उपयुक्त रतें. त्या दृष्टीनेंच तुम्ही आपली कहाणी थोडक्यांत मला निवेदन केलीत असें मी मानतों. माणसाला आपलें हितगुज कोणाजवळ तरी व्यक्त करावेंसें वाटतें. त्यांच्या-जवळ तो आपलें हृद्गत सांगतो तें माणूस तेवढ्यापुरतें तरी त्याला जगांतील इतर माणसांपेक्षां जास्त जवळचें व महत्त्वाचेंहि वाटत असतें हें स्पष्टच आहे. म्हणून माझा बहुमान केलात असें जें मी म्हटलें तें औपचारिक नव्हे.

तुमच्या आणि माझ्या भूमिकेंत फरक आहे. तुम्ही घरंदाज, सुखवस्तु मालगुजार घराण्याच्या संस्कारांत वाढलां. मीहि सुखवस्तु, गर्भश्रीमंत मालगुजारांच्या घरांतच जन्मलों व वाढलों. पण लहानपणापासूनच सत्ता व मालकी यांचा तिटकारा माझ्या मनांत उत्पन्न झाला. उलट माझ्या घरांतील इतर माणसांना लोकांवर सत्ता गाजविण्याची व हुकूम चालविण्याची उप-जतच आकांक्षा होती. गांवांत आपला दरारा असावा, गडी माणसें, आप्त-इष्ट, सर्व आपल्या कह्यांत असावेत, अशी सामान्यत: त्यांची वृत्ति. मी हिला मालकीची वृत्ति असें म्हणत असतों. माझ्या घराण्यांत आणि माझ्या नातलगांत या वृत्तीचींच माणसें अधिक आहेत. हुकमत व सत्ता नसली तर आपण निर्माल्यवत् बनून जाऊं ही समजूत त्यांच्या हाडींमाशीं खिळलेली आहे.

या वर्गांतीलच तुम्ही आहांत. म्हणून तुमचा सार्वजनिक जीवनांत प्रवेश निवडणुकींच्या द्वारें झाला. सत्ताकांक्षा म्हटली कीं तेथें चुरस, हिरीरी, इरेस पेटणें इत्यादि प्रकार आलेच. इभ्रत व जय यांच्यावरच सगळा भर असतो. त्यामुळें मग साधनांच्या बाबतींत सूक्तासूक्ताचा विधिनिषेध रहात नाहीं. काय वाटेल तें होवो, प्रतिपक्षाचा पाडाव केलाच पाहिजे हा एकच ध्यास चित्ताला लागलेला असतो. त्यामुळें तुमचा संबंध तशाच प्रकारच्या लोकांशीं यावा हें साहजिकच नव्हतें काय? सत्तेच्या लढ्यांतहि इमानाची व दिल-

दारीची मर्यादा पाहिजे हें मला मान्य आहे; पण युद्ध, इष्क आणि राजकारण या क्षेत्रांत माणसाला भान रहात नाहीं आणि विवेक सुचत नाहीं. माझें म्हणणें इतकेंच कीं या क्षेत्रांत आलेल्या अनुभवानें घटकाभर मन खट्टू झालें तरी हिरमोड होतां कामा नये.

तुम्हांला काय सांगूं ? इंद्रसभेंत सत्ता नांवाच्या परीचा उल्लेख नाहीं. पण मला असें वाटतें कीं ती इंद्राच्या दरबारांतील प्रमुख अप्सरा आहे. माणसाला आपल्या नादीं लावायला ती केव्हां कुठल्या मायावी रूपानें नटूनथटून येईल तें सांगणें कठीण आहे. आम्ही कधीं इंद्रलोकाची इच्छाच धरली नाहीं यामुळें तिच्या आहारीं जाण्याचा प्रश्नच उत्पन्न झाला नाहीं. पण ज्यांनीं सत्तेची वाजवी अथवा योग्य आकांक्षा धरली त्यांच्या चारित्र्याचें व इमानाचें दिवाळें वाजवायला अनेक सिद्धींचें सोंग घेऊन ही मायावीण आल्यावांचून राहात नाहीं.

या दृष्टीनें तुम्ही आपल्या गतायुष्याचा विचार करा. सत्ता व मान्यता यांचा स्वभाव स्वतःच्या सावलीसारखा आहे. जो त्यांच्यामागें धांवतो त्याच्या त्या पुढें धांवतात. त्यांच्याकडे जो पाठ वळवितो त्याच्यामागें त्या लागतात. म्हणून तुम्हांला सत्ताप्राप्तीचा अचूक मार्ग जर माझ्यापासून शिकायचा असेल तर बेदरकारपणें तिच्याकडे पाठ वळवायला शिका. ' न मागे तयाची रमा होय दासी. '

तुम्हा त्रिवर्गांचा स्नेह हा माझ्या गेल्या तीन वर्षांतील आयुष्यांतला फार मोटा लाभ आहे असें मी मानतों. कुठल्याहि साहसाला अथवा दुःसाहसाला न डरणारा ..... मी तर्जनी दाखविल्याबरोबर गप्प बसतो. तुम्ही आपला सगळा जळफळाट माझ्याजवळ व्यक्त करून शेवटीं निर्णय मझ्यावर सोपवितां आणि श्री. .... माझ्यासमोर बोलत नाहींत. या सर्व गोष्टींची माझ्याजवळ कदर नाहीं असें समजूं नका. पण तुमचा हा विश्वास ज्या तत्त्वाच्या बळावर मी संपादन करूं शकलों तेंच तुमच्या आणि माझ्या दोघांच्याहि शक्तीचें शाश्वत अधिष्ठान आहे. म्हणून मला असें वाटतें कीं जें वाहून गेलें तें पाणी मानावें आणि जी उरली ती गंगा समजावी. माणसाची दृष्टि आणि पावलें पुढल्या बाजूलाच असावीत.

मजवरील तुमच्या स्नेहांतून जर मी तुमचा विश्वास संपादन करूं शकलों

तर तुम्हांला व मला दोघांनाहि एकमेकांच्या वागणुकींतूनच मार्गदर्शन लाभेल. माझें मार्गदर्शन तुम्हांला लाभेल आणि तुमचें मला लाभणार नाहीं असें जर तुम्ही मानाल तर आपलपोटे व अन्यायी ठराल. कांहीं प्रसंगीं तुमच्या मनाची प्रतिक्रिया माझ्या मनाच्या प्रतिक्रियेपेक्षां अधिक सरस व शाबूत असण्याचा संभव राहील. अशा वेळीं तुमच्या वृत्तीपासून व वागणुकीपासून अगदीं न कळत मला बोध मिळेल. कांहीं बाबतींत तुमचा अनुभव माझ्यापेक्षां अधिक मोठा आणि अधिक खोलहि असूं शकेल. तो मला अवश्य मार्गदर्शक ठरेल. मी कांहीं राजकारणांत शिक्षक किंवा मार्गदर्शक म्हणून आलों नाहीं. तुमचा सोबती व स्नेही म्हणून आलों आहें. उद्यां दुर्दैवानें कारणपरत्वें तुमचा आणि माझा मतभेद झाला तरी माझ्या प्रामाणिकपणाविषयीं आणि दानतीच्या शाबूतपणाविषयीं मनांतून तुम्हांला संशय येऊं नये इतकी कमाई करून ठेवण्याचा माझा प्रयत्न आहे.

कळावें. कृपालोभ कायम ठेवावा.

स्नेहाकांक्षी,
**दादा धर्माधिकारी**

# राजकारणांत स्त्रीचें स्थान

१५-७-४९

विनयपूर्वक व स्नेहपूर्वक न. वि. वि.

आज स्वातंत्र्यप्राप्तीचा दुसरा वाढदिवस आहे. तुम्हांला पत्र पाठविण्याची कल्पना कालपासूनच मनांत घोळत होती. पत्र लिहिण्याचें कांहीं खास प्रयोजन किंवा सामान्यहि कारण आहे असें नाहीं. पण केव्हां केव्हां आपण उगीचच पत्रें लिहितों कीं नाहीं ? माणसें एकमेकांच्या घरीं सहज भेटायला जातात. त्यांतलाच हा प्रकार समजा. हें पत्र मी अगदीं विनाकारण लिहीत आहें.

तीन वर्षांपूर्वी मी निवडणुकीच्या राजकारणांत पाऊल टाकलें. तुताऱ्या व पडघम वाजवून मित्रांनीं माझ्या आगमनाची द्वाही मिरविली ! मी अगदीं मोकळ्या मनानें सांगितलें कीं हें माझें काम नव्हे, मला हें साधायचें नाहीं. तीन वर्षे झालीं. मी मोठा यशस्वी किंवा प्रभावक्षम ठरलों असें मुळींच नाहीं. माझ्या स्वभावदोषांमुळें व उणीवांमुळें मला यशापेक्षां अपयशच अधिक उदात्त व उज्ज्वल असें आलें. राजकारण शुद्ध करण्याचा रिकामा तोरा मी कधींच मिरविला नाहीं. तें काम माझ्या आटोक्यांतलें नाहीं याची जाणीव मला होती व आहे. पण एका पातळीच्या खालीं मात्र उतरलों नाहीं असा दावा मी नम्रपणें करूं शकतों.

राजकीय हेतूनें माणसें जमविण्याचें व संभाळण्याचें वळण मला नव्हतें. तें मला कितपत साधलें तें सांगतां येणें कठीण आहे. पण माणसें मिळविण्याच्या व संभाळण्याच्या उद्योगांतहि एका मर्यादेचें उल्लंघन मी सहसा केलें नाहीं असें क्षम्य अभिमानानें म्हणूं इच्छितों.

हें चऱ्हाट वळण्याचें कारण ?–कारण आहे. पर्वताप्रमाणें अकम्प्य आणि समुद्राप्रमाणें खोल अशा उदात्त व निरपेक्ष निष्ठेचे स्नेहीजन जर मला लाभले नसते तर राजकारणाच्या दंगलींत राहून मला मर्यादा सांभाळतां आली नसती. ज्या हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या अनन्य सौजन्याच्या स्नेहाच्या व विश्वासाच्या भरवंशावर मी निर्धास्तपणें आपल्या वृत्तीची व धोरणाची मर्यादा पाळूं शकलों त्यांच्यामध्यें तुमचें स्थान माझ्या अंत:करणांत फार मोठें आहे.

स्त्री ही माता या नात्यानें निरपेक्ष व नि:स्वार्थ असते. घरांत कुटुंबिनी या नात्यानेंहि तिचा त्याग व सहनशीलता प्रशंसनीयच असते. पण घराबाहेर मात्र ती अलंकारप्रिय आणि वैभवप्रदर्शनाकांक्षिणी असते. ती स्वत:ला एक भूषण व शोभेची वस्तूच मानते असा भास होतो. त्यामुळें तिचें पुरेसें कौतुक किंवा चीज झालें नाहीं तर ती आपला रुसण्याफुगण्याचा व संतापण्याचा परंपरासिद्ध हक्क गाजवल्यावांचून राहात नाहीं.

याला कांहीं ‘ सन्माननीय अपवाद ’ आहेत. अशा अपवादभूत स्त्रियांच्या सानिध्यांत स्त्री–पुरुष–भेद भावनेंतील अनिष्ट अंशाचा विसर पडतो. बरोबरीच्या नात्यानें आणि समान भूमिकेवरून त्यांच्याशीं वागतां येण्याची सोय

असते. त्यांच्या कणखर समंजसपणावर, भक्कम व्यवहारज्ञानावर आणि मनाच्या थोरपणावर विसंबून राहतां येतें. अशा अपवादात्मक स्त्रिया राजकारणामध्यें इतर क्षेत्रांच्या मानानें कमी प्रमाणांत आढळतात. कारण राजकारणांत लौकिकाची चाड असलेल्या सत्ताप्रिय स्त्रियाच अधिक येतात आणि सत्तेकरतां झुरतांना त्या आपल्या सर्व स्त्रीसुलभ अस्त्रांचा प्रयोग करण्यास कमी करीत नाहींत. या अस्त्रांत मी फक्त जळफळणें, चिडणें, संतापणें, फणफणणें अशा क्रोधात्मक आयुधांचाच समावेश करतों.

इतरांनीं माझ्याजवळ आपापली महत्त्वाकांक्षा व्यक्त केली, ती मी पूर्ण करूं शकलों नाहीं, तेव्हां त्यांचा विरसहि झाला. पण तुम्ही कधींच सत्तेचा किंवा मान्यतेचा हव्यास धरला नाहींत. उलट मलाच तुम्हांला एकाद्या प्रसंगीं आग्रह करावा लागला. तुमच्या सौजन्याची व शालीनतेची माझ्या मनावर छाप पडली. राजकीय जीवनांत श्री..व श्री..यांनीं सहोदर भावांपेक्षांहि अधिक शर्थीनें माझी पाठ राखली. आणि तुम्ही सहोदर भगिनीपेक्षांहि जास्त आत्मीयतेनें माझ्याशीं जुळवून घेतलेंत. या स्नेहाचा व विश्वासाचा मोबदला कांहीं असूंच शकत नाहीं. आणि उतराई तरी कोण कसा होणार ?

स्वातंत्र्यदिनाच्या पवित्र दिवशीं अनेकविध भावनांचा चित्तांत उद्रेक झाला. त्यांत तुमच्याविषयीं ज्या पवित्र भावना मनांत आल्या त्या शब्दांत सहज उतरल्या. यापेक्षां अधिक या पत्राचें प्रयोजन नाहीं.

तुमच्या स्नेहाला व विश्वासाला पात्र राहण्याचा प्रयत्न सतत करीन. भगवंताची कृपा असली म्हणजे झालें.

तुमचा,
स्नेहांकित बंधु,
**दादा**

# जातिवादाची लाट उसळणार काय ?

प्रिय... १–९–४९

तुम्ही मला आपुलकीनें व श्रद्धेनें पत्रें लिहून माझा खरोखरच गौरव केलात. मला अत्यंत धन्यता वाटते. तुमची आपुलकी व विश्वास असाच कायम राहो एवढीच इच्छा आहे.

ज्या जातींनीं पूर्वी सत्ता व मान्यता यांचा उपभोग घेतला त्यांना आतां त्याचें प्रायश्चित्त भोगावें लागत आहे. ही कालगति आहे. तेव्हां तुम्ही किंवा मी किंवा आपल्यासारखे इतर लोक केवळ जातीमुळें लोकांच्या अनादराला पात्र झाले तर त्यांत नवल वाटण्याचें कारण नाहीं. आला दिवस कितीहि मोठा, कंटाळवाणा किंवा दुःखद असला तरी तो जातोच. थोडीशी कळ सोसण्याचाच काय तो प्रश्न आहे. तुम्हांला त्याची भरपूर संवय झालेली आहे.

जातिवादाची लाट उसळण्याचीं लक्षणें स्पष्ट दिसत आहेत. सुदैवानें आज तुम्हांला जातीचा फायदा मिळण्याची सोय नाहीं. त्यामुळें सेवेचा मार्ग अधिक प्रशस्त होईल. यांत विषाद वाटूं देण्याचें कारण नाहीं. तुमच्या जातींत न मोडणारीं सेवापरायण, प्रामाणिक, न्यायप्रिय व कर्तबगार माणसें जर सत्तारूढ झालीं तर त्यायोगें कल्याणच होणार आहे. या देशांत जातिवाद फार दिवस टिकणार नाहीं याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

युद्धकला जाणणारे लोक असें सांगतात कीं जे युद्धांत कामास आलेले असतात त्यांनींच वास्तविक जय मिळविलेला असतो. माळा इतरांच्या गळ्यांत पडतात हें अगदीं खरें आहे. त्या युद्धांतील मृत्यूपेक्षां अज्ञात व उपेक्षित जिणें जगणें अधिक जड आहे. पण स्वराज्याचा व लोकशाहीचा पाया रचण्याकरितां असा जिवंत मृत्यूहि पत्करावा लागेल. तो पत्करण्याची बुद्धि व शक्ति देवानें आपल्याला द्यावी. यांत विषादाचें व निराशेचें कारण नाहीं. उलट उत्साह व संतोषच वाटावा.

तुमच्या सोबत्यांचा निर्व्याज स्नेह व विश्वास आजहि तुम्हांला उपलब्ध आहे हें थोर भाग्य आहे. तो संभाळतां आला म्हणजे सार्थक झालें. कांहीं स्पष्ट सूचना करायच्या असल्यास अवश्य कराव्यात. मला फार बरें वाटेल. कृपालोभ असावा.

स्नेहाकांक्षी,

दादा

# केरसुणी आणि क्रांति

गोपुरी (नालवाडी)
वर्धा
२३-१२-४९

प्रिय ताई,

कालचें पत्र मिळालें असेलच.

श्री .... चें पुन: पत्र आलें. म्हणतात, 'तुमच्या लेखांमुळें तर अनेक तरुण मंडळींना तुम्हांला पाहण्या-भेटण्याची फार उत्कंठा लागलेली आहे.' माणूस जात्याच स्तुतिप्रिय असतो हें खरें असलें तरी सुसंस्कृत माणसाच्या स्तुतिप्रियतेलाहि मर्यादा असते हें देखील खरें नाहीं का? ज्यांना माझे लेख आवडले ते जर मला भेटले तर त्यांना आनंदच होईल अशी खात्री नाहीं. उलटच प्रकार होण्याचा संभव अधिक. पण तरुण मंडळींना मला भेटण्याची इच्छा आहे एवढें कारण मला तिकडे यायला लावायला पुरेसें आहे. मी खात्रीनें आलों असतों, परंतु यावेळीं माझ्या जीवाची अक्षरश: 'कुतरओढ' चाललेली आहे. मी नसलों म्हणजे इकडच्या सोबत्यांना आपण असहाय्य असल्याचा भास होतो. जवळ जवळ रोज कोठें तरी जावें लागतें. भाषणें करून करून तोंड विटून गेलें अगदीं. काल रात्रीं वर्ध्याला सफाई-समितीनें माझें 'केरसुणी व झाडू' या विषयावर व्याख्यान ठेवलें. आणि झाडूचा क्रांतीशीं अनुबंध मला दाखवावा लागला! आहे कीं नाहीं फटफजिती?

केशवसुतांना रांगोळींत महान् 'आशय' भरलेला दिसला. बापूंनीं केरसुणींतहि महान् आशय ओतला. त्यांचा पराक्रम अद्भुत आहे. त्यांनीं आम्हांला दिव्य दृष्टि दिली. क्षुल्लक वस्तूंमध्यें दडून बसलेली महानता, क्षुद्रतेंत दडलेली उदात्तता शोधण्याची प्रवृत्ति त्यांनीं निर्माण केली. राजकारणाच्या तीस वर्षांच्या अनुभवांत बापूंनीं दिलेल्या जादूच्या आरशीमुळें मला अधमांतील उत्तम अंशाचें दर्शन झालें. गुणामुळें पुष्कळदां लाभाऐवजीं हानि होते असा समज लोकांत प्रचलित आहे. 'सीध्या सरळ माणसाची दुनिया नाहीं' असें जो तो बोलतो. मला मात्र असा प्रत्यय आला कीं, या दुनियेंत गुणानें हानि कधींच होत नाहीं. आपण संपत्ति किंवा सत्ता यांचा

उपभोग करीत असलों म्हणजे आपल्या त्या पदामुळें अगर स्थानामुळें इतरांच्या मनांत हेवा व ईर्ष्या उत्पन्न होते. हा दोष परिस्थितीचा आहे, गुणाचा नाहीं. गुणांमुळें तो मत्सर सौम्य होतो, द्वेषाची नांगी मोडते.

त्याचप्रमाणें दुसरा एक असा समज आहे कीं लोक आपल्या सौजन्याचा फायदा घेतात. फायदा घेतां येणें हें सौजन्याचें वैशिष्टच आहे. दुर्जनतेचा फायदा घेतां येणें फार कठिण असतें. दुर्जनतेचा फायदा घेतला तरी त्यांत दोष लागतो. फायदा घेणारालाहि तें प्रशस्त वाटत नाहीं. पण सौजन्य हें फायदा घेण्यासाठींच असतें. त्यांत कोणाचीच हानि नाहीं. ज्या सौजन्याचा फायदा वाईट कामाकरितां घेतां येतो तें सौजन्य नसून तो बावळटपणा आहे. म्हणून सौजन्याचा कोणी गैरफायदा घेईल या भीतीनें सौजन्याचा प्रयोगच न करण्याची सावधगिरी मला पटत नाहीं.

मला वाटतें ही भाषाच चुकीची आहे. आपल्या ठिकाणीं सौजन्याचा गुण आहे आणि इतर लोक त्याचा फायदा घ्यायला टपून बसले आहेत असा 'मूढ ग्रह' असणें अत्यंत भयावह आहे. लोक जेव्हां 'मी आतां उरलों उपकारापुरता' अशी भाषा बोलतात तेव्हां तिच्या मुळाशींहि मला दूषित ग्रह दिसून येतो असा ग्रह ज्याला जडला असेल तो विनाकारण अल्पस्वल्प लोकोपयोगी कृत्यांना 'उपकारा'चें नांव देतो, आणि मोकळ्या मनानें जगण्याचें सोडून उपकाराची संधि शोधण्यांत गुंतून जातो. माणसाला एकट्यानें जगण्यांत समाधान न वाटणें हें त्याच्या माणुसकीचें पहिलें लक्षण आहे. दुसऱ्याबरोबर जगण्यांत, खेळण्यांत, खाण्या–पिण्यांत गोडी वाटणें, त्यावांचून बरें न वाटणें हीच माणुसकी आहे. यांत दुसऱ्याच्या उपयोगी पडणें अन्तर्भूतच आहे. ही मानवोचित 'स्पर्शभावना' आपल्या आत्मविकासाला पोषक आहे. उपकारक भावनेची परिणति विकारांत होण्याची भीति आहे. असो.

तूं आपल्या प्रकृतीची काळजी घे म्हणजे मला जास्तींत जास्त संतोष देशील. घाई करण्याचें कारण नाहीं. मी लांब असलों तरी नेहमीं जवळच असतों. या बाबतींत अधिक लिहिण्याची गरज नाहीं. कळावें हे आशीर्वाद.

तुझा,

**दादा**

# या कॉंग्रेसचें होणार तरी काय ?

स. न. वि. वि.

आपलें ता १२–१० चें कृपापत्र पाहून आश्चर्य वाटलें. पण आश्चर्यापेक्षां आनंद अधिक वाटला. आपणांस मलाच पत्र पाठविण्याची कल्पना यावी यांत माझा गौरव आहे. आपल्या या स्नेहवृत्तीविषयीं कृतज्ञता वाटते.

कॉंग्रेस या संस्थेची प्रतिष्ठा कमी कमी होत आहे या गोष्टीची जाणीव मला आहे. याचें मूलभूत कारण माझ्या मतें असें आहे कीं कॉंग्रेस हा आतां एक राजकीय पक्ष झालेला आहे आणि तीहि सत्तारूढ पक्ष आहे. राजकीय पक्षसंघटनेचें वळण या देशांतील लोकांना नाहीं. त्याला पार्लमेंटरी लोकशाहीच्या मनोवृत्तीचा एका ठराविक प्रमाणांत विकास व्हावा लागतो. पूर्वींच्या कॉंग्रेसमध्यें सत्तेच्या राजकारणापेक्षां प्रतिकाराच्या राजकारणाचें महत्त्व अधिक होतें. त्यामुळें त्यागाचा व तितिक्षेचा महिमा होता. आतां आपणच सरकार झालों. प्रतिकार संपला. त्याग व तितिक्षा निराळ्या हेतूंनीं व निराळ्या क्षेत्रांत केली तरच त्यांना अवसर आहे. पण तें वळण अजून लागलेलें नाहीं. गादीवर, खुर्चीवर व सिंहासनावर बसण्याकरितां त्याग नको, तितिक्षा नको; मनुष्यबळ हवें, संघटनाची हातोटी हवी आणि दुसऱ्यावर सरशी करण्याची शिताफी हवी. हे गुण राजकारणपटु व मुत्सद्दी लोकांचे आहेत. ते ज्यांच्या अंगीं असतील त्यांची आज सद्दी आहे. सेवादेखील आज सत्तेची करवली म्हणून मिरवीत आहे. सत्तादेवीच्या स्वयंवरांत सेवेचे कौतुकास्पद व अचाट खेळ ज्याला दाखवितां येतील त्याला ती माळ घालील. पण आडदांडपणानें व बाहुबलाच्या प्रयोगानें तिचें हरण करण्याचा परम्परागत व शिष्टसम्मत अधिकारहि दरेकाला आहे. म्हणून आतां कॉंग्रेसमध्यें पक्षनिष्ठा देखील उरलेली नाहीं. सत्तेच्या स्वयंवरांत निरनिराळ्या प्रतापी उमेदवारांचे गट आपापली व्यूहरचना करून सज्ज बसलेले आहेत. आणि दरेकाचे वैतालिक, भाट, चारण त्यांची बिरुदावलि सांगत आहेत. सारें दृश्यच पालटलें आहे.

सारें राजकारण निवडणुकीच्या अखंड कार्यक्रमांत परिणत झालेलें आहे. अन्तर्गत व बाह्य अशा दुहेरी निवडणुका आळीपाळीनें सारा वेळ व्यापून टाकतात. बाह्य निवडणुकींत बाशिंग बांधण्याचा मान कोणाला मिळावा

हा अन्तर्गत निवडणुकीचा हेतु आहे. निवडणुकींत अप्रशस्त, बेशिस्त किंवा नियमबाह्य कांहींच नाहीं. निवडणुकीच्या खेळांत 'फाऊल' होतच नाहीं. कॉंग्रेस या संस्थेचें अंतरंग व बहिरंग निवडणुकीचें प्रांगण झालेलें आहे. त्यांत जें कराल तें 'सही' आहे, युक्त आहे, 'अलाऊड' आहे. सत्ता काबीज करणें व सत्ता टिकविणें यांतच सर्व पराक्रम सांठविलेला आहे. ही कला ज्याला अवगत झाली तो जिंकतो. इतरांचा टिकाव लागत नाहीं. निवडणुकींत कोणाला तरी सभ्यपणाची चाड असते का? प्रतिपक्षाला येनकेनप्रकारेण परास्त करायचें या एकाच गोष्टीचा ध्यास असतो. त्याचें बदनाम करावें, त्याच्या तोंडांत बोळे घालावे, त्याचें टाळकें सडकावें, त्याला पळवावें, हें सारें नीतिविहित आहे.

पुराणकालीं रणांगणावर एकमेकांच्या विरुद्ध सज्ज होऊन उभे ठाकलेले राजकुलांतील सुसंस्कृत परंपरेंत वाढलेले योद्धे एकमेकांना 'दुष्टा, पापिष्टा, नष्टा, भ्याडा' इत्यादि शेलक्या विशेषणांनीं भूषवीत असत. त्यांचा कित्ता आपण निवडणुकीच्या रणभूमीवर गिरवीत आहोंत. तेव्हां निराळी फळी उभारून तुम्ही या प्रकाराला आळा घालूं शकाल ही आशा फोल आहे. वस्तुस्थिति आहे तशी लक्षांत घेतली म्हणजे यशाची अपेक्षा बेसुमार वाढत नाहीं आणि निराशेचा संभव कमी होतो. एवढ्या एकाच उद्देशानें हा पाल्हाळ केला आहे.

याचा अर्थ आपण हातपाय गुंडाळून गप्प बसावें असा मुळींच नाहीं. अनिष्टाचा प्रतिकार साधेल तेथें अवश्य करावा. पण त्या प्रतिकाराचीं साधनें आधीं निश्चित केलीं पाहिजेत. ज्या अनिष्ट उपायांचें अवलंबन केल्याबद्दल आपण इतरांना नांवें ठेवतों त्या उपायांचें आपण वावडें मानलें तरच आपल्या निराळ्या संघटनेला तात्त्विक भूमिकेचा आधार राहील. एरव्हीं तो सत्ताकांक्षी गटांपैकीं एक गट होऊन बसेल. मला वाटतें, या मुद्याचा विचार गंभीरपणानें व जिव्हाळ्यानें करायला हवा. ज्या माणसांचें सहाय्य आपण मिळवूं त्यांना जर ही गोष्ट व्यवहारविमुख, शुष्क तत्त्वज्ञानाची वाटत असेल, तर कॉंग्रेसमध्यें नवीन जोम व नवीन तेज आणण्याची आपली आकांक्षा व्यर्थ आहे. माझ्या अपयशाचें कारण आतां आपल्या ध्यानांत येईल. इतरांपेक्षां बुद्धि, उद्योगशीलता किंवा तन्मयता माझ्या ठिकाणीं कमी आहे,

असें मला वाटत नाहीं. पण स्वतःपुरती ओढून घेतलेली मर्यादेची रेषा ओलांडण्यापेक्षां मला अपयश पत्करतें. मला त्या अपयशाची खंत वाटत नाहीं. ज्यांनीं माझा पाडाव करण्याचा चंग बांधलेला आहे त्यांच्याशीं वागतांना मला सार्वजनिक जीवनाच्या शाश्वत मूल्यांचें रक्षण करितां आलें तर माझ्या अपयशानें देखील दोघांचेंहि हितच होईल.

आज पुढला विचार करायला फुरसत आहे कोणाला ? " जे 'गद्दीनशीन' व 'कुर्सीनशीन' आहेत ते कुचकामाचे, नादान व नालायक आहेत. त्यांच्या ठिकाणीं आम्ही स्थानापन्न झालों तर देशाचे पांग फिटतील. ते 'शासक' आहेत. आम्ही 'सेवक' आहोंत. त्यांच्या हातीं राजदंड आहे, आमच्या हातीं केरसुणी आहे. त्यांच्या हातीं खड्ग आहे, आमच्या हातीं नांगराचा फाळ आहे."— हें ओरडून ओरडून सांगण्याचा दरेकानें सपाटा चालविला आहे. काँग्रेसच्या बाहेरचे पक्ष तेंच करीत आहेत. काँग्रेसमधील गटांचेहि सारे उद्योग त्याच 'रथनाभी'— भोंवतीं फिरत आहेत. याहून निराळ्या प्रकारच्या आकांक्षेनें व वृत्तीनें प्रेरित झालेली एकादी कर्तृत्ववान् व नित्य क्रियाशील व्यक्तींची फळी जर आपण निर्माण करूं शकलों तर तिच्या नैतिक प्रभावाचा उपयोग होईल.

तीन वर्षांच्या उत्कट अनुभवानंतर मी काढलेले निष्कर्ष हे असे आहेत. आपल्याला जो सात्त्विक उद्वेग वाटला तो मला कळतो. आपण या परिस्थितीच्या प्रतिकारार्थ कांहीं पाऊल उचललें तर वर सुचविलेल्या मर्यादेंत माझा वाटेल तो उपयोग आपण करून घ्यावा. आतां आम्ही दुसरें करायचें तरी काय ? दुसऱ्या कुठल्याहि उद्योगाकरितां नालायक बनून गेलों आहोंत. तसा पद्धतशीर प्रयत्नच केला आहे.

नवी दिल्ली,
१७–१०–४९

स्नेहाकांक्षी,
दादा

# कॉंग्रेस-कार्यकर्त्यांच्या योगक्षेमाचा प्रश्न

प्रिय......

तुमचें ता. २१ चें पत्र परवां पोंचलें. तुमच्या योजनेची संपूर्ण व स्पष्ट कल्पना त्यावरून आली नाहीं.

कॉंग्रेस कार्यकर्त्यांमध्यें जी परस्पर सद्भावाचा अभाव दिसून येतो आणि त्यांच्या ठिकाणीं जो एक प्रकारचा उद्वेग दिसून येतो त्याचें निवारण करण्याकरितां कांहीं केलें पाहिजे हें मलाहि मान्य आहे. पण एक सैल संघटना निर्माण करून हा प्रश्न सुटेल असें मात्र मला वाटत नाहीं. कॉंग्रेस हें आतां सरकार झालें आहे. म्हणून कांहीं कॉंग्रेसवाल्यांना सरकारी अधिकारपदें, नोकऱ्या किंवा सत्ता प्राप्त झाली. ती सर्वांना सारख्या प्रमाणांत प्राप्त होणें शक्य नव्हतें. बरें, ज्यांना प्राप्त झाली तीं माणसें इतरांपेक्षां सरस किंवा योग्यच आहेत असेंहि नाहीं. म्हणून कॉंग्रेसमधील लोकांचा एकमेकांकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलला आणि त्यामुळें इतरांचाहि त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलला. आतां देशभक्ति म्हणून शिल्लक राहिलेली नाहीं. त्याग करायचा तो कशाकरितां हें डोळ्यापुढें स्पष्ट नाही. म्हणून हेवादावा व परस्पर द्वेष माजला आहे.

कांहीं त्यागनिष्ठ व सेवानिष्ठ कार्यकर्ते आहेत; नाहींत असें नाहीं. पण त्यांना समाधानकारक व उपयुक्त काम देऊनच त्यांच्या योगक्षेमाचा प्रश्न सोडवावा लागेल. हें सैल संघटनेनें कितपत साधेल? अशा कार्यकर्त्यांनीं आपापल्या आवडीप्रमाणें वाटेल त्या क्षेत्रांत काम करावें, त्यांच्या चारित्र्याविषयीं व कार्यनिष्ठेविषयीं खात्री असली म्हणजे पुरे. आपण त्यांना मदत करावी, अशीहि योजना असूं शकेल. पण राजकारणांत कार्य करणारांना निःपक्षपात बुद्धीनें ही योजना कशी लागू करितां येईल हा प्रश्नच आहे. सैल संघटन म्हटलें तरी त्याला निष्ठेचा आधार लागेलच.

तुमची योजना फार खर्चाची नसली तरच उपयोगाची आहे. ती जर एक लहान ी परिषदच होणार असली आणि तिच्यापायीं चारपांच हजार रुपये खर्च येणार असला तर तिच्यांत फक्त दारूकाम होईल आणि तें हवेंत विरून जाईल. कांहीं निवडक माणसें बोलावणार असलां तर कदाचित्

कांहीं भरीव योजना निष्पन्न होईल. पुष्कळदां कोणाला बोलावलें आणि कोणाला बोलावलें नाहीं ही देखील फाजील महत्त्वाची बाब होऊन बसते. आणि त्यामुळ त्याला उगीचच गटबाजीचें स्वरूप येतें. काम थोरें, बभ्रा फार आणि विरोधाला उगीच पाचारण अशी त्याची फलश्रुति होते.

या दृष्टीनें विचार करून काय तें ठरवा. ज्या माणसांची खरोखर दृढ निष्ठा असेल आणि ज्यांना लोभाचा फारसा स्पर्श झाला नसेल अशा माणसांचें संघटन करतां येईल. श्री...व इतर मित्र यांनीं तसा प्रयत्न केलाहि आहे. या सर्व प्रयत्नांना निरनिराळ्या आखाड्यांचें स्वरूप प्राप्त होणार नाहीं याची काळजी घ्यावी लागेल.

श्री. ... हि खूपच आहे! शरीर त्याच्या बापाचें आहे काय! मग त्याच्याशीं असा खेळ करण्याचा त्याला काय हक्क आहे? मरणाकांक्षिता हें उफराटें शौर्य आहे.

माझ्या व्यवहारबुद्धीवर तुमचा फाजील विश्वास दिसतो. माझ्या सान्निध्यांत वाढल्यामुळें तुमच्या ठिकाणीं तशी श्रद्धा निर्माण झाली. पण व्यावहारिक योजनांच्या बाबतींत माझी अक्कल फारशी चालत नाहीं, हें अजून कसें तुमच्या लक्षांत आलें नाहीं? कॉंग्रेसनिष्ट कार्यकर्त्यांचें संघटन व्हावें हें मलाहि इष्ट आहे. पण त्या संघटनेचा आधार सत्तेप्रमाणेंच अर्थ हाहि नसावा. योगक्षेमाकरितां आर्थिक पायावर उभारलेल्या संघटनांतून सामर्थ्य व तेज निर्माण झाल्याचा दाखला निदान या देशांत तरी नाहीं. विचार व तत्त्वज्ञान यांच्या पायावर जर संघटन उभारलें तर योगक्षेमाची तरतूद हें त्यांचें आनुषंगिक कार्य राहूं शकेल.

या सर्व मुद्यांचा विचार केल्यानंतर प्रमुख मंडळींना जर अशा प्रकारच्या संघटनांची उपयुक्तता वाटली तर मी नेहमीं तुमच्यांतच आहें. माझा जो काय उपयोग करून घ्यायचा असेल तो जरूर करून घ्या. माझी प्रकृति नेहमींसारखी आहे. तिच्याकडे फार लक्ष दिलें नाहीं म्हणजे तीहि जरा वचकून राहाते.

नवी दिल्ली,
२७-८-४९

स्नेहांकित,
दादा

# काँग्रेसमधील अंतर्गत फाटाफूट

प्रिय..

तुमचें दुसरें पत्रहि पोंचलें. माझ्यावर तुम्ही जो विश्वास व्यक्त केला आहे त्याबद्दल अधिक न बोलणेंच योग्य होईल. त्या विश्वासाला पात्र राहण्याचा मी नेहमीं प्रयत्न करीत राहीन.

काँग्रेसमध्यें सरकारी व बिनसरकारी असे दोन विभाग पडले आहेत हें दुर्दैवानें खरें आहे. याचा अर्थ असा होतो कीं सरकारी विभाग व बिनसरकारी विभाग यांचें एकमेकांशीं कांहीं नातें नाहीं. उलट हे परस्परविरोधी गट आतां परस्परविरोधी पक्षांप्रमाणें काम करणार. म्हणजे बिनसरकारी गट सरकारी गटाची जागा घेण्याचा सतत प्रयत्न करीत राहणार. अर्थातच सरकारी गटाचें बदनाम करतां येईल तितकें करून आपली प्रतिष्ठा वाढविण्याचीहि तो सारखी खटपट करीत राहणार. त्यांत पुन्हां सरकारी गटांत म्हणजे कांग्रेस पार्टींतहि अधिकारारूढ व अधिकाराकांक्षी असे दोन पोटगट असणार. त्यांच्यापैकीं अधिकारारूढ नसलेला आधिकाराकांक्षी पक्ष पुन्हां विरोधी भूमिका स्वीकारील. बिनसरकारी गटांतहि अधिकारारूढ व अधिकाराकांक्षी असे दोन पक्ष असणार आणि त्यांच्यापैकीं अधिकाराकांक्षी पक्ष अधिकारारूढ पक्षाची जागा घेण्याचा अव्याहत प्रयत्न करीत राहणार. सत्तावादी राजकारणाचें हें स्वरूपच आहे.

सरकारी काँग्रेस व बिनसरकारी काँग्रेस असे दोन भेद पडणें संस्थेच्या दृष्टीनें अत्यंत घातुक ठरणार आहे. कारण हे एकाच संस्थेचे दोन भाग आहेत. ज्याप्रमाणें बिनसरकारी विभागानें स्वतःची प्रतिष्ठा वाढविण्याकरितां सरकारी विभागाची प्रतिष्ठा कमी करण्याचा प्रयत्न केल्यास संस्थाच कोलमडण्याची भीति आहे, त्याचप्रमाणें सरकारी विभागानें बिनसरकारी विभागाची उपेक्षा किंवा अवहेलना केल्यास संस्थेची अब्रू धुळीस मिळण्याचा संभव आहे हें विसरतां कामा नये.

याला उपाय एकच. सरकारी व बिनसरकारी विभागांतील अंतर कमी होऊन त्यांच्यांत अभेद स्थापन झाला पाहिजे. म्हणजे एक तर ज्यांच्या हातीं

सरकार आहे त्यांच्याच हातीं प्रांतिक कॉंग्रेस कमेटी पाहिजे किंवा ज्यांच्या हातीं प्रां. कॉं. कमिटी आहे त्यांचेंच सरकार बनलें पाहिजे अथवा दोन्ही पक्षांमध्यें समेट होऊन प्रां. कॉं. कमिटींत आहेत त्यांना सरकार आपलेंसें वाटलें पाहिजे आणि जे सरकारांत आहेत त्यांना प्रां. कॉं. कमेटी आपलीशी वाटली पाहिजे. प्रां. कॉं. कमिटी काबीज करणें किंवा तिच्याशीं समेट करणें हे दोनच मार्ग आहेत. पण जर एका पक्षाला दुसरा पक्ष स्वार्थी, लबाड व विश्वासाला अपात्र वाटत असला तर तडजोड तरी कशाच्या आधारावर व्हावी ? अशा स्थितींत सरकार व प्रां. कॉं. कमिटी एकाच गटाच्या हातांत असणें हा एकच मार्ग शिल्लक राहतो. तुमच्या पत्रांतहि तोच ध्वनि आहे. म्हणूनच तुम्ही आपलें बल दक्षतेनें संघटित करण्याची सूचना इतक्या कळकळीनें केली आहे.

तुमचें म्हणणें अगदीं तर्कशुद्ध आहे. पण माणसाचें जीवन तर्कशास्त्राप्रमाणें चालत नाहीं. तर्कशास्त्राला नीतिशास्त्राचा आधार असला तरच तें हितकारक ठरतें. त्या दृष्टीनें मला जें वाटतें तें तुमच्यापुढें मांडतों.

आपल्या हातीं प्रां. कॉं. कमिटी आली म्हणजे सरकारी व बिनसरकारी विभागांतील भेद व विरोध नाहींसे होतील हें खरें आहे; पण तें घडवून आणण्याकरितां जें जें करावें लागेल तें आपल्या एकंदर वृत्तीशीं व मर्यादेशीं सुसंगत असलें पाहिजे, हेंहि तितकेंच आवश्यक आहे. सरकारी व बिनसरकारी अशा दोन्ही विभागांत एकच गट सत्तारूढ असला तर सत्ताकांक्षी गटहि दोन्ही विभागांकरितां एकच होईल. पण लढा कायमच राहील.

अशा प्रकारचें सत्तेचें राजकारण इतर संस्थांतहि आहे. पण कॉंग्रेसमध्यें आतां फक्त तेवढेंच शिल्लक राहिलेलें आहे. त्यामुळें माझ्या वृत्तीला व नैसर्गिक प्रवृत्तीला तें रुचतहि नाहीं आणि जमतहि नाहीं. आपलें राज्य स्थापन करण्याकरितां सैन्य व मदतगार मिळविण्यासारखेंच हें काम आहे. त्याकरितां साक्षेपी, सावध, कर्तबगार माणूस तर हवाच, पण याखेरीज तो सत्ताकांक्षीहि पाहिजे. वृत्तीनें व गुणानें मी त्या तऱ्हेचा माणूस नाहीं हें तुमच्या लक्षांत आलेंच असेल. आणि त्यामुळेंच मला यावें तसें यश येऊं शकलें नाहीं.

मी विरोधाला जुमानणार नाहीं, धमक्यांना भीक घालणार नाहीं, अप-

यशानें नामोहरम होणार नाहीं; पण एक एक गट उभारणें, संभाळणें आणि त्याच्या बळावर प्रतिपक्षावर हल्ला चढविणें हें मला साधणें कठिण आहे. म्हणूनच तुमची कुचंबणा होते आणि माझीहि होते. मी तुमचा स्नेही व सहाय्यक आहें. पण तुम्हांला जागरूक व विजिगीषु सेनापतीची गरज आहे.

आपलें बळ वाढविण्याकरितां माणसांचा संग्रह करून त्यांचा संभाळ करण्याकरितां सतत जपत राहणें हें इतरांना करतां येतें तसें मलाहि करितां येईल. त्यांत कठिण असें कांहींच नाहीं. पण ज्याप्रमाणें मी निवडणुकीच्या वेळीं कोणाजवळ स्वतःकरितां मतयाचना करायला जाणार नाहीं त्याचप्रमाणें राजकीय हेतु साध्य करण्याकरितां माणसांची मर्जी संपादन करणेंहि मला मानवणार नाहीं. या मर्यादेंत जें साधेल तें साधेल. जें साधणार नाहीं त्याकरितां हळहळणार नाहीं. माझें धोरण फक्त त्यागाचें व तपस्येचें नाहीं. सत्तेची–सरकारी व बिनसरकारी–आकांक्षा न धरणें हाहि त्या धोरणाचा भाग आहे. तें ज्या प्रमाणांत तुम्हांला उपयुक्त वाटेल त्या प्रमाणांत त्या धोरणाचा फायदा करून घेण्याची मुभा तुम्हांला नेहमींच आहे. तुम्ही मला आपला म्हटलेंत, मीहि तुमच्या सेवेला सादर आहें. माझ्या स्वभावाची व गुणांची मर्यादा लक्षांत घेऊन मला संभाळून घेणें तुमचें काम आहे.

काँग्रेसमध्यें वैयक्तिक व गटांचें राजकारण याखेरीज आणखी कांहीं रहावें आणि तेंच मुख्य अंग असावें अशी माझी खात्री झालेली आहे. एका गटाची दुसऱ्या गटावर सरशी म्हणजे गटबाजीचा अन्त नव्हे. ही यादवी काँग्रेसचें 'मुसलक्षेत्र' करील. म्हणून मी मनःपूर्वक व उत्कटतेनें त्या राजकारणांत भाग घेऊं शकत नाहीं, त्याच्याशीं समरस होऊं शकत नाहीं

आपली माझ्यावर कृपा आहे व स्नेह आहे. तेव्हां माझे हे स्वभावदोष लक्षांत घेऊनच आपण माझा उपयोग करून घ्यावा.

तुम्ही सर्वांनीं आपला विरस व उत्साहभंग मुळींच होऊं देऊं नये. माझ्या-मुळें तुमची धडाडी व कर्तबगारी कमी न होतां वाढलीच पाहिजे.

नवी दिल्ली
१–९–४९

स्नेहाकांक्षी,
दादा

# ‘ सातवें दर्शन ’

१३९ कॉंस्टिटयूशन हाऊस
नवी दिल्ली
१५–६–४९

चि. ताईला अनेक उत्तम आशीर्वाद,

तुझें ता. १३ चें पत्र आज पोंचलें. कांहीं दिवस बरोबर रहाण्याचा योग आला म्हणजे एकमेकांपासून फायदा होतोच. ‘ मार्गदर्शन ’ करणें आणि ‘ मार्गदर्शन घडणें ’ यांत फरक आहे. ‘ सूर्य प्रकाशतो ’ हा आरोप आहे. तो फक्त असतो. त्याचें ‘ असणें ’ म्हणजेच ‘ प्रकाशणें ’ आणि प्रकाशणें म्हणजेच ‘ प्रकाश देणें ’. नदी ‘ असते ’ म्हणजेच ‘ जल देते. ’ तसेंच माणसाचें आहे. माणसांना एकमेकांच्या स्नेहयुक्त संगतीपासून मार्गदर्शन लाभतें, त्या मार्गदर्शनांत जबाबदारीची जाणीव नसते आणि ओझेंहि वाटत नाहीं. गम्मत म्हणून एकत्र रहाणें आणि सत्संग करणें यांतली तफावत कमीकमी झाली पाहिजे. म्हणून तुमच्या सर्वांच्या सहवासाचा लाभ मिळाला असता तर मलाहि फायदाच झाला असता. आपल्याला नकळत एकमेकांपासून कांहीं तरी शिक्षण मिळालें असतें आणि अगदीं नकळत तें वृत्तींत बाणलेंहि असतें. ‘ स्नेह ’ हें शिक्षणाचें सर्वांत गुणकारी अनुपान आहे. एक पुस्तक हल्लीं चाळतों आहे, त्यांतलीं दोन वाक्यें मनांत घोळतात, ‘ Man should be the measure of all. On the contrary he is a stranger in the world he has created. ’ विज्ञानाला व अध्यात्माला माणसाच्या बेताचें आणि त्याला अनुरूप जग बनवितां आलें नाहीं. माणसामाणसांतील स्नेहाला व विश्वासालाच तें ‘ सातवें दर्शन ’ होईल.

कळावें हा आशीर्वाद.

स्नेहांकित

## लग्न म्हणजे काय

टिळक राष्ट्रीय विद्यालय,
खामगांव
ता. १३-५-४७

प्रिय.....

मी तुझ्या लग्नाला येऊं शकलों नाहीं याचें तुला मनस्वी वाईट वाटलें असेल, तें अगदीं स्वाभाविक आहे आणि रास्तहि आहे. तूं आपल्या अकृत्रिम व निरपेक्ष स्नेहानें तसा हक्क मिळविला आहेस.

माझ्या दृष्टीनें तुझें लग्न अंमळ अल्प वयांतच झालें. तुझ्या आई-वडिलांनीं इतकी घाई करायला नको होती. लग्नाच्या सोहळ्यांत खूप पैसा खर्च करणेंहि मला आपल्या आजच्या समाजस्थितींत अगदीं गैर व दूषणास्पद वाटतें. त्यामुळें मी बाहेरगांवीं लग्नाला साधारणपणें जात नाहीं आणि कोणाला बोलावीतहि नाहीं.

तरीपण तुझ्या लग्नाला मी येणार होतों आणि येऊं शकलोंहि असतों. याचें कारण तुझा स्नेहसंबंध. तुझ्यासारख्या अल्पवयी व तरुण स्नेह्यांमुळें आतां माझ्या कुटुंबाची व्याप्ति वाढली आहे. या व्यापक कुटुंब-भावनेचा विकास व विस्तार करण्याचा सतत प्रयत्न करीत राहणें मी माझें कर्तव्य मानतों. माझ्या या विशाल कौटुंबिकतेची जोपासना स्नेहसंबंधाचें पोषण व विकास करण्यावर अवलंबून आहे. याच दृष्टीनें केवळ तुला समाधान वाटावें म्हणून मी येणार होतों. पण माझा गैरसमज झाला. लग्न मुलीच्या गांवीं असा माझा ग्रह झाला त्यामुळें मी काल मोकळा असूनहि येऊं शकलों नाहीं.

यावरून मनानें मी तुझ्या लग्नाला हजर होतों हें तुझ्या लक्षांत येईल आणि भावनेला जर बाह्य उपचारापेक्षां जास्त महत्त्व असेल तर माझें हें शरीरानें हजर न राहून हृदयानें हजर राहणें तुला विशेष महत्त्वाचें वाटलें पाहिजे. आईनें ल्हान मुलाला सवंगड्याकडे जाऊं दिलें नाहीं म्हणजे त्याचें सारें, लक्ष, सारें चित्त तिकडे लागलेलें असतें. यांत जास्त गोडी व जास्त

प्रभाव आहे असें नाहीं तुला वाटत ? 'घड देवळांत नि चित्त खेटरांत' असेल तर देवळांतदेखील खेटराचें ध्यान केल्याचें पाप लागतें. उलट, 'चित्त देवळांत नि धड खेटरांत' असेल तर देवाचें ध्यान केल्याचें पुण्य लाभतें. म्हणून मी तुझ्या लग्नाला न येऊन आल्यानें मला दुप्पट श्रेय व तुला दुप्पट समाधान लाभलें पाहिजे.

लग्न म्हणजे गम्मत नव्हे, आईबापांची उत्सवप्रियता तृप्त करण्याचा समारंभ नव्हे; श्रीमंतांच्या मुलांच्या कौतुकाचा प्रसंग नव्हे. तुम्ही श्रीमंतांचीं मुलें कांहीं बाबतींत इतरांपेक्षां अगदीं बथ्थड व अडाणी असतां; पण कांहीं बाबतींत फार हुषार व सज्ञान असतां. स्वतःच्या इस्टेटीचा कारभार सांभाळणें, सत्ता गाजविणें, इतमामानें राहणें इत्यादि गोष्टींचें तुम्हांला बाळपणापासूनच वळण असतें. त्याचप्रमाणें लग्नाच्याहि बाबतींत तुम्ही लौकर शहाणीं होतां. गरीबांच्या बाबतींत लग्न सुलभ नसतें. आर्थिक अडचण पदोपदीं नडते. तुमच्या बाबतींत 'इच्छा–लग्न–योग' असतो. लग्न मर्जीप्रमाणें करतां येतें. म्हणूनच तो खेळ वाटण्याचा संभव आहे. जबाबदारी कांहींच नसल्यामुळें त्याचें गांभीर्य व पावित्र्य यावें तसें लक्षांत येत नसावें.

लग्न गरीबाचें असो कीं श्रीमंताचें असो, त्याच्या बाह्य आकारांत व थाटामाटांत फरक असला तरी स्वरूपांत फरक असण्याचें कारण नाहीं, वैयक्तिक दृष्टीनें तो संयुक्त जीवनाचा आरंभ आहे. 'जसा पति तसें जीवन' हें एकेरी व एकांगी सूत्र आतां विवाहित आयुष्याला लागू होतां कामा नये. 'गृहिणी म्हणजे घर', 'जशी लक्ष्मी तसें घर' हेंहि सूत्र अर्धवट व अनर्थकारक आहे. एकाचें जीवन दुसऱ्याच्या जीवनांत मिसळून गेलें लोप पावलें, हरपलें म्हणजे कांहीं तें समृद्ध व वैभवशाली होणार नाहीं. वेणीच्या दोन पदरांप्रमाणें दोन जीवनें एकमेकांत गुंफलीं गेलीं म्हणजे तो संगम तीर्थराजापेक्षांहि अधिक पुण्यमय व श्रेयस्कर होईल.

लग्न म्हणजे कौटुंबिक जीवनाचा उपक्रम. मुलीचा गृहप्रवेश म्हणजे तुझा गृहस्थाश्रमांत प्रवेश. वैयक्तिक दृष्टीनें दोघांच्याहि संयुक्त जीवनाच्या साधनेचा प्रारंभ आणि सामुदायिक दृष्टचा सहजीवनाच्या प्रयोगाचा 'हरिः ॐ.' दांपत्य-जीवन म्हणजे संयुक्त जीवनाचा निरंतर प्रयोग आणि कुटुंब म्हणजे सहजीवनाची प्रयोगशाळा.

एक नवीन माणूस तुमच्या कुटुंबांत दाखल झालें. बाळपणींचे सारे आप्तत्वाचे व मायेचे संबंध तोडून ती मुलगी तुझ्यावर निष्ठा ठेवून नवीन नातीं जोडण्यास प्रवृत्त झाली. या प्रयोगाचें अधिष्ठान तूं. हा प्रयोग मोठा नाजुक व गंभीर आहे. परंपरागत संस्कारांमुळें मुलीच्या मनाची भूमिका तयारच असते. पण कुटुंबांतील माणसांना तिच्या ठिकाणीं आत्मीयता व जिव्हाळा उत्पन्न करतां आला पाहिजे. परकें माणूस आपलेंसें करून टाकणें ही कला कांहीं सामान्य नव्हे.

एक नवीन मुलगी तुमच्या घरांत आली. आतांपर्यंत सारेच पुरुष तिला परके होते. आतां तूं तिचा झालास. तुझ्या मार्फत कुटुंबांतील इतर पुरुष तिचे स्वकीय झाले. या स्वकीयत्वाच्या भावनेचा अभ्यास व विकास करण्याची शाळा म्हणजे कुटुंब.

अशा रीतीनें कौटुंबिक जीवनाचे अनेक पैलू पाडतां येतील. तुमचें संयुक्त जीवन व कौटुंबिक जीवन प्रसादमय व कल्याणमय होवो अशी प्रार्थना माझ्या हृदयांतून उत्कटतेनें उठत आहे.

मी लग्नाला आलों नसलों तरी तुला जोडप्यानें माझ्या घरीं तुझ्या वडिलांनीं पाठविलें पाहिजे. नाहींतर तेवढ्याकरितां मला तुमच्या गांवीं यावें लागेल.

कळावें.

तुझा
**दादा धर्माधिकारी**

# माझ्या जीवनाचा आधार

गोपुरी (नालवाडी),
वर्धा
२२-१२-४९

प्रिय ताई,

कालचें कार्ड मिळालें असेलच.

तुला माहीतच आहे कीं माझ्या जीवनाचा मुख्य आधार मित्रांचा स्नेहच आहे. जीवनोपयोगी वस्तुच नव्हे तर चैनीचीं उपकरणें देखील मला मित्रांच्या स्नेहामुळें प्राप्त झालीं आहेत. फाऊंटन पेन, घड्याळ इ. वस्तु निरनिराळ्या मित्रांनीं स्वेच्छेनें न मागतां आग्रहपूर्वक दिल्या. अडचणीच्या, संकटाच्या वेळीं मित्र नेहमीं सहाय्याला धांवून आले. शरीर देवानें दिलें आणि त्यानंतर सुहृदांनीं सतत जीवदान दिलें. एका दृष्टीनें मी ऋणजीविच आहें. आप्त व मित्र यांच्या ऋणानुबंधावरच जगलों व वाढलों. मी या शरीराच्या व इतर सर्व साधनांच्या बाबतींत शक्य तों या दृष्टीची मर्यादा पाळण्याचा प्रयत्न केलेला आहे. शरीर जसें दुसऱ्यानें दिलें त्याचप्रमाणें जीवनाची सामग्रीहि इतरांनीं मिळवून दिली. हें ऋणहि धनात्मक आहे. हा ऋणानुबंधहि जीवनाच्या ऐश्वर्याचाच द्योतक आहे. अशी मनोवृत्ति बनलेली असल्यामुळेंच मला स्नेह्यांच्या इच्छेला मान द्यावासा वाटतो. येथें जवळजवळ दररोज प्रवासाची दगदग सोसल्यानंतर बिहार, पंजाब इ. ठिकाणीं जाणें सोपें नाहीं. रोज आगगाडी, मोटार, बोट किंवा विमान आणि रोज व्याख्यानें असा सतत क्रम चालणार. शरीर टिकलें पाहिजे, उत्साहहि टिकला पाहिजे. ईश्वरावरच हवाला टाकणें भाग आहे. त्याच्याच कृपेनें हें सारें जमलें तर जमेल. ज्याचें काम असतें त्याला अगत्य असतें. तो गय करायला तयार नसतो. त्याची स्नेहमूलक निष्ठुरताहि आनंदानें पत्करावी लागते. म्हणून विहारवाल्यांचें निमंत्रण बिनतक्रार कबूल करून मोकळा झालों.

कळावें, हे आशीर्वाद.

तुझा,
दादा

# जीवन-विकासाचीं साधनें

नवी दिल्ली
७-१२-४९

प्रिय ताई,

तुझी तार ता. ५ ला पोंचली. आज तुझें ता. ५ चें पत्र पोहोंचलें.

जावें तेथें जिव्हाळ्याचीं माणसें भेटणें हें कांहीं सामान्य भाग्य नव्हे. बबन लिहितो, 'आम्हांला सर्वच ठिकाणीं उमदीं माणसें भेटलीं.' कौटुंबिक जीवनाची शुचिता व उपयुक्तता यांतच आहे. एरव्हीं कुटुंबेंहि संकुचित जीवनाचीं होतील. तीं समाजजीवनाचे विकासशील घटक बनण्याऐवजीं वैयक्तिक जीवनाला कोंडून ठेवणारे कठडे बनतील. ज्यांचा रक्ताचा किंवा सोयरिकीचा संबंध नाहीं अशा व्यक्तींना अगत्यपूर्वक आश्रय देऊन त्यांचा स्नेह संपादन करणाऱ्या कुटुंबांत विशालता असते. अशीं कुटुंबें जीवन-विकासाचीं सा नें होतात........

कमलावर 'अनंत हस्तें' देतो म्हणतात. त्याचा अनुभव जगांत प्रत्यहीं येतो. कोणी रहायला घर देतो, कोणी फुकट उपचार करतो, कोणी कांहीं, कोणी कांहीं देतो. उणें म्हणून कोणीच पडूं देत नाहीं. हा कमलावराच्याच अनंत हस्तांचा विस्तार नव्हे का? एरव्हीं माझ्यासारख्या दरिद्र्यांचा संसार एक दिवस तरी चालला असता कां? मी मित्रांच्या निरपेक्ष ऋणावर जगलों आहें. या ऋणाची परतफेड होऊंच शकत नाहीं. परतफेड करण्याची गरजहि नाहीं. कृतज्ञता व स्नेह हाच एकमात्र त्याचा मोबदला असूं शकतो. हा ऋणानुबंधच जीवनाला संपन्नता आणतो. असा ऋणानुबंध परिमित करण्याऐवजीं त्याचा विस्तार जितका करतां येईल तितका करीत जावें म्हणून मी तुला लिहिलें कीं 'तो करुणाघन कशाचेंहि उणें पडूं देणार नाहीं.'

मी प्रकृतीकडे दुर्लक्ष करतों हा आरोप खोटा आहे. शरीराचें मी कांहीं कमी चोज पुरवीत नाहीं. कितीहि कुरूप व खप्पड असलें तरी तें मला नकोसें थोडेंच वाटणार? पण जीवनाची जी सरणी मी जाणूनबुजून पत्करली आहे

तिच्या दृष्टीनें शरीराला फार सुखावूं देणें मला परवडणार नाहीं. स्वतःचें अंथरूण व्यवस्थित गुंडाळणें, धोतर, सदरा, नॅपकिन, रुमाल व हिंवाळयांत मोजे रोज धुणें, स्वतःचे जोडे पुसणें व भांडीं स्वच्छ ठेवणें इत्यादि कामें करणें माझ्या अंगवळणी पडलें आहे. त्यांत मला त्रास होत नाहीं, आठवडयांतून एकदोनदां अंथरुणांतील कपडे धुऊन घेतों. परटाकडे देणें मला आवडतहि नाहीं व परवडतहि नाहीं. पायीं चालण्याचा आपला हक्क व आनंदहि त्याचमुळें सोडायला मी तयार नाहीं. बबनला मी म्हणालों होतों ना कीं 'म्हातारीच्या मरणापेक्षां मला काळ सोकावतो याची भीति जास्त वाटते.' जीवनाच्या ज्या मर्यादा विचारपूर्वक आपण स्वीकारल्या त्याच्या आंत शरीर रहावें असा प्रयत्न आहे. खाणें, पिणें, सारें कांहीं त्या धोरणानें करतों. मी शरीराला कदापि छळणार नाहीं व त्याचे हालहि मुळींच होऊं देत नाहीं. पण जो आराम त्याला देत राहण्याची ऐपत नाहीं त्याची संवय त्याला लागूं नये इतकी दक्षता राखतों.

मालकिणीनें अलीकडे जेवण सोडून दिलें आहे. माझी वेदना मी कोणाला सांगूं ? दुनियेच्या दृष्टीनें ती नष्ट झाली असेल. पण मला तिचा विसर क्षणभर तरी पडूं शकेल का? ती वेदना वातावरण व्यापून टाकते.

कळावें, हा आशीर्वाद.

तुझा,

दादा

# माझीं सत्तेचीं विश्रामस्थानें

१३९ कॉन्स्टिटयूशन हाऊस
नवी दिल्ली,
१०-९-४९

अनेक उत्तम आशीर्वाद.

श्रीपादांनीं तुझा निरोप सांगितला. फार समाधान वाटलें. माणसानें स्वतःचें घर मोडून बिऱ्हाड पाठीवर घेतलें म्हणजे तो 'अनिकेत' म्हणजे 'बिन-घराचा' होतो. श्रीपादांच्या उर्दूंत त्याला 'खानाबदोश' म्हणतात. माझें बिऱ्हाड पाठीवर असलें तरी माझ्या ठिकाणीं 'दंश' किंवा 'नांगी' नाहीं. आणि 'खानाबदोश' असलों तरी 'उडाणटप्पू' किंवा 'लोफर' नाहीं. म्हणून कुलीन घरांत मला हक्काचें स्थान मिळावें अशी पात्रता माझ्या ठिकाणीं आहे. अशीं स्नेहसंपादित घरें हींच आतां माझीं सत्तेचीं व हक्काचीं आश्रयस्थानें श्रीपादांमुळें व तुझ्यामुळें असें एक 'आश्रयस्थान' आणखी मला लाभलें. स्वतःच्या स्वतंत्र बिऱ्हाडाचा मोह सोडला म्हणजे जगांत सर्वत्र सत्तेचीं विश्रामस्थानें लाभतात. तुमच्यामुळें माझ्या त्या वैभवांत व आनंदांत मूल्यवान भर पडली आहे. मला धन्यता वाटते !

तुझ्या आमंत्रणांत जिव्हाळ्याबरोबर चातुर्यहि आहे. तुला 'गुप्ती' म्हणून एक कुबडी असते ती माहीत आहे? त्या कुबडीच्या आंत गुप्त 'संगीन' (तरवार) असते. कुबडी विकत घेतली कीं 'गुप्ती' येतेच. दादालाच घरीं ठेवून घेतलें कीं श्रीपाद राहणारच. आंधळ्याला देव म्हणाला, एकच वर माग. आंधळा फार चतुर. त्यानें एकच वर मागितला, 'देवा ! माझा नातू सोन्याच्या ताटांत जेवत असलेला मला डोळ्यांनीं पाहूं दे !' दीर्घायुष्य मागितलें, वैभव मागितलें आणि डोळेहि मागितले ! 'वरहि वरायास पाहिजे समज !' ती तूं भरपूर दाखविलीस !

तुझ्यामुळें श्रीपादांच्या निवासाला 'घर' ही पदवी मिळाली. भाईमुळें तें 'नंदनवन' झालें. तुम्हां दोघांनाहि आशीर्वाद.

स्नेहांकित,
दादा